नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक ०४/१०/२०२१ रोजी दुपारी १२.०५** वाजता महानगरपालिकेच्या मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ८. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ९. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| १०. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ११. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| १२. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| १३. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| १४. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १५. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १६. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १७. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १८. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १९. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| २०. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| २१. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| २२. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| २३. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| २४. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| २५. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| २६. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २७. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| २८. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २९. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| ३१. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| ३२. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| ३३. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| ३४. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| ३५. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| ३६. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| ३७. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३८. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ३९. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| ४०. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| ४१. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ४२. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ४३. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ४४. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ४५. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ४६. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ४७. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ४८. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ४९. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ५०. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ५१. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ५२. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ५३. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ५४. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ५५. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ५६. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ५७. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ५८. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ५९. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ६०. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ६१. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ६२. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ६३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ६४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ६५. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ६६. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ६७. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ६८. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ७०. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ७१. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ७२. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ७३. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ७४. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ७५. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ७६. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ७७. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ७८. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ७९. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ८०. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ८१. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ८२. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ८३. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ८४. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ८५. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ८६. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ८७. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ८८. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ८९. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ९०. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ९१. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ९२. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ९३. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ९४. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ९५. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ९६. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ९७. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ९८. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ९९. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| १००. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| १०१. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| १०२. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| १०३. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| १०४. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| १०५. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| १०६. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| १०७. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०८. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| १०९. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ११०. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| १११. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ११२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ११३. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ११४. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ११५. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ११६. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ११७. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ११८. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ११९. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| १२०. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| १२१. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

**अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| २. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ३. | ५ | अ | रिक्त | |
| ४. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ५. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| ६. | ८ | ब | रिक्त | |
| ७. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| ८. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| ९. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| १०. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| ११. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| १२. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| १३. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| १४. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| १५. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| १६. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| १७. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| १८. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| १९. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| २०. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| २१. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| २२. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| २३. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| २४. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| २५. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| २६. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| २७. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| २८. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| २९. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ३०. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ३१. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ३२. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ३३. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ३४. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ३५. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

**वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.**

**(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)**

**ठराव क्रमांक १७२ :- मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

**अभिनंदन प्रस्ताव**

**लीलाताई चितळे**

नागभूषण फाऊंडेशचा २०२० चा नागभूषण पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या लीलाताई चितळे यांना जाहीर झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**राहुल पांडे**

नागपूरचे वरिष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक तसेच मध्य भारतातील सर्वात मोठे इंग्रजी वृत्तपत्र द हितवादचे शहर संपादक राहुल भालचंद्र पांडे यांची राज्य माहिती आयुक्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**भूपेंद्र पटेल**

गुजरातचे मुख्यमंत्री पदी भा.ज.पा.चे भूपेंद्र पटेल यांची निवड झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**चरणजितसिंग चन्नी**

काँग्रेसचे वरिष्ठ नेते चरणजितसिंग चन्नी यांची पंजाबचे मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**डॉ.उज्जवला चक्रदेव**

नागपूरच्या मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या प्राचार्या डॉ. उज्जवला शिरीष चक्रदेव यांची मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) महिला विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**नरेश गडेकर**

अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मध्यवर्ती मुंबईच्या अध्यक्षपदी नरेश गडेकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौरः- प्रश्नोत्तर का काल शुरु करते है।

**प्रश्न क्र. २७१**:- नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या केंद्रशासन पुरस्कृत "अमृत योजनेंतर्गत" ४२ESR+१GSR+ मुख्या जलवाहिन्याचे प्राकलन व मंजूर DPR संदर्भात प्रश्न

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, उत्तर प्राप्त झाले आहे त्या उत्तरामध्ये माझा उपप्रश्न आहे. अमृत योजने अंतर्गत चे हे जे काम होते हे पहिल्यांदा ३०.१०.२०१६ ला प्रस्तावित करण्यात आले होते. महानगरपालिकेने रिवाईज एस्टीमेट तयार केले होते २२६ कोटीचे, ही गोष्ट खरी आहे काय ?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. यह सही है की पहिला जो डीपीआर डिपार्टमेंट ने भेजा था वह २२६ कोटी का था।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी,उत्तर प्राप्त झाले की रिवाईज डीपीआर जो एमजीपीने तयार केला होता तो २४४ कोटीचा तयार केला होता. प्लस जीएसटी असा २७३ कोटीचा ही गोष्ट बरोबर आहे काय ?

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. हॉ।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, रिवाईज डीपीआर २४४ कोटी प्लस जीएसटी असा २७३ कोटीचा डीपीआर होता त्याच्यामध्ये ४२ ईएसआर आणि वन जीएसआर त्याचे डिस्ट्रीब्युशन मेन आणि फिडरमेन अशा पध्दतीचे काम प्रस्तावित केले होते. हे काम वेप्कार्स जी भारत सरकारची कंपनी आहे. वेप्कार्स कंपनीला कन्सलटंट म्हणून नेमले आणि सोबत कॉन्टॅक्टर म्हणून तो कॉन्ट्रक्ट त्या वेप्कार्स कंपनीला ४२ ईएसआर आणि एक जीएसआर आणि डिस्ट्रीब्युशन मेन तयार करण्यासाठी दिला. मा.महापौरजी, माझा प्रश्न याठिकाणी असा आहे की यापैकी फक्त ११ ईएसआरचे काम प्रगतीपथावर आहे आणि ५ चे काम सुरु व्हायचे आहे. यामुळे जे प्राकलन वाढले जे एस्टीमेट कॉस्ट वाढलेली आहे आता रिवाईज एस्टीमेट कितीचे झाले आहे. वेप्कार्स जे काम देण्यात आले होते त्यामधून ते १६ ईएसआरचे काम ते करुन राहिले आहे आणि फिडरमेन केले मात्र डिस्ट्रीब्युशन लाईनमध्ये त्यांनी अनेक कामे सोडलेली आहेत. त्यांनी सिव्हील कामे केली आणि एसबी पाईपलाईनचे काम केले मात्र डीआयबीचे काम केले नाही ही गोष्ट खरी आहे काय?

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. डिस्ट्रीब्युशन का जो काम है वह ३७७ मिटर मे से ३०३ मिटर हो गया है, फिडर मेन का जैसे जैसे एक एक ईएसआर तयार होंगा, वैसे वैसे ईएसआर लगाये जायेगें। जब मा.सदस्य को उत्तर दिया गया था तब वह काम ३०३ कि.मि. था लैकिन आजकी डेट मे वह काम ३७७ कि.मी. हो गया है।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, ३७७ कि.मी. पैकी ३०३ कि.मी.चे काम झालेले आहे अशा प्रकारचे उत्तर बॅनर्जी मॅडमने दिलेले आहे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. जब उत्तर दिया था तब ३०३ कि.मी. का काम हो चुका था परंतु आज की घडी मे ३२१ कि.मी. का काम हो चुका है।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, एडीपी का काम किया है की डीआय का काम किया है।

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. एसडीपी का काम किया है।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, डीआयबी का कितना काम किया।

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. पुरे शहर मे मिला के १ कि.मी. होगा।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, डीआयबी चा ॲटम हा लॉस्ट चा ॲटम म्हणून ते काम वेप्कार्स कंपनीने केले नाही. सिव्हील कामे केली आणि एसबी पाईपलाईनचे काम केले मात्र डीआय चे काम केले नाही. याचे जे एस्टीमेट रिवाईज झाले त्याचे मधून डीआयबी चा पुर्णचा पुर्ण ॲटम डिलीट करण्यात आला आहे ते आपण लक्षात घेतले पाहिजे.

महापौर:- आपण जो प्रश्न केला आहे त्याच्यावर प्रशासनाने निवेदन करावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. ४३ ईएसआर प्लास वन जीएसआर मे से १६ ईएसआर मे से १६ ईएसआर वेप्कार्स कर रही है और १६ ईएसआर हम खुद कर रहे है, और ११ ईएसआर की जगह अभी तक प्राप्त नही हुई है, जो १६ ईएसआर एनएमसी कर रही है उतना पार्ट और जो नही होने वाला है, उतने पार्ट का ही फिडर मेन वेप्कार्स के पास से निकाला गया है, क्योंकि जो ईएसआर बनायेगें वही फिडर मेन का काम करेगा।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, एस्टीमेट तयार करीत असतांना ते कां वगळण्यात आले आहे. मुळ प्राकलनातून डीआयची क्वॉन्टीटी कां वगळण्यात आली.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. डी.आय. की क्वाँटीटी पुरी तरह से उनके स्कोप से निकाली नही गयी है, वह सिर्फ १६ ईएसआर के साथ क्योंकि ईएसआर जो कंप्लीट करेगा वह ही फिडर मेन करेगा इसलिये सिर्फ उतना ही जो १६ ईएसआर मनपा खुद करने वाली है, यांनी वह १६ ईएसअर का जो लगा हुआ फिडर मेन मे जो डी.आय है उसका ही उनके फिडर मेन से निकाला गया है, फिडरमेन का डीआय पाईप उनको ही करना है।

महापौर:- प्रशासनाने दिलेल्या उत्तराप्रमाणे जे ईएसआर जी कंपनी करेल तीच कंपनी फिडरमेन टाकेल. जेथे वेप्कार्स ईएसआरचे काम करणार आहे तेथेच फिडरमेन टाकेल आणि जे ईएसआर म्युनिसिपल कार्पोरेशन करीत आहे तेवढीच क्वॉन्टीटी त्याच्यातून डिडक्ट केलेली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, हे बरोबर आहे. जे ईएसआर महानगरपालिका करणार आहे त्याचे फिडरमेन महानगरपालिका करणार आहे. परंतु रिवाईज एस्टीमेट झाल्यामुळे जे दर वाढलेले आहे. वेप्कार्स कंपनीवर कोणतीची कार्यवाही प्रशासन प्रस्तावित करीत नाही. जे दर वाढले त्यामुळे हे काम त्यांनी सोडलेले आहे. जे टेंडर होवून राहिले आहे ते अबाऊ येत आहे. २४४ कोटीचे ते प्राकलन असले तरी वास्तविक ते काम ३०० कोटीपर्यंत झालेले आहे. वेप्कार्स कंपनीने डीआय चे काम जर पुर्ण केले असते आणि पाण्याच्या टाकीपर्यंत त्यांनी डीआय टाकल्या असत्या तर आता डीआयचे काम

करतांना लागणारा भुर्दंड तो महानगरपालिकेवर येत आहे. या सर्व बाबींची जबाबदारी वेप्कार्स कंपनी आणि महानगरपालिकेची आहे. याचा संपुर्ण भुर्दड महानगरपालिकेवर पडत आहे. या शहरातील करधारकावर पडून राहिला आहे. जे रेट वाढले आणि जो भुर्दंड वाढला त्याला ही जनता जबाबदार नाही. महानगरपालिका ईएसआरचे काम कां करुन राहिली तर कंपनी करुन नाही राहिली म्हणून महानगरपालिका करुन राहिली की नाही.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. एग्रीमेंट नुसार वेप्कार्स कंपनी कर १ ऑगस्ट २०१८ को एग्रीमेंट हुआ वो एग्रीमेंट के अनुसार हमको वेप्कार्स कंपनी को को तीन महिने के अंदर सारे जो ईएसआर के लॅन्ड थे वो हॅन्डओवर करना था, जो की हम नही कर पाये, आज की डेट मे भी ११ ईएसआर की लॅन्ड अव्हेलबल नही है और जो ईएसआर की लॅन्ड अव्हेलबल थी उतने ही ईएसआर मे वेप्कार्स कंपनी काम कर रही है। जो लॅन्ड दे नही पाये उसमे बहोत दिन गये और रेट जो बढ गये है इसलिये हम उनपर ॲक्शन नही ले सकते है। जो जगह हम को टाईप पे प्रोव्हाईड करनी थी वह हम नही कर पाये।

श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, या पुर्ण प्रोजेक्टचा कंन्सलटंट कौन आहे प्रशासनाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, यह काम का कंसल्टंट मे.डी.आर.ए. कंसल्टंट कंपनी है।

श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, कन्सलटंट ने टंकी कहां बनेगी इसका डीपीआर पहिले तयार किया है क्या ?

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, मुझे जो हिस्ट्री पता चली है, प्रपोजल बहुत जल्दी बनाना था, इसके लिये कंसल्टंट ने सारे ईएसआर प्रपोज किये, लैकिन लेन्ड एक्व्हीझेशन तब हुआ नही था, इसलिये जो टाईम मे लेन्ड मिलना चाहिये था वह नही मिली।

श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, नागपूर शहरात विकास आराखडा तयार झाला जो २००२ मध्ये तयार झाला. २०१६ मध्ये याचा डीपीआर तयार केला. डीपीआरमध्ये शहराचे पाप्युलेशन निश्चित केलेले आहे. त्यामध्ये आपल्या शहराचा लॅन्ड निश्चित झालेला आहे. आपल्या शहराचा विस्तार किती होणार आहे. त्यासाठी कोणकोणत्या सर्विसेस लागणार आहे. पाण्याच्या टाकी किती असल्या पाहिजे हे सगळे निश्चित केलेले आहे तर या १६ वर्षामध्ये काय कार्यवाही केली आहे. टाऊन प्लॉनिंग विभाग आणि आपल्या विभागामध्ये समन्वय नाही आहे. डीपीआर तयार करतो आणि त्याच्या जागेची अव्हेलिबीटी पाहत नाही. जर याच्यामध्ये आपण विलंब केला नसता तर आपल्याकडे किती तरी कोटीची बचत झाली असती. आपण काहीही केले नाही जागेचा डीपीआर तयार करावयाचा तर जागेची ॲव्हेलिबीटी बघणे आवश्यक आहे. सरकारकडून जेवढे अनुदान मिळते तेवढे या विभागातून उत्पन्न

मिळाले असते. या विभागाची ही जबाबदारी आहे. नगररचना विभागाने याच्यामध्ये काय काम केले. यासाठी विलंब कां लागला. डीपीआर तयार करीत असतांना जे क्वॉन्टीटी ,जे नेटवर्क आपण निश्चित केले असेल एखादे लोकेशन धरुन लॅन्ड निश्चित केली असेल तर त्या लॅन्डच्या मालकीची शहानिशा कां करण्यात आली नाही. ११ लोकेशन तर निश्चितच झालेल्या नाहीत त्या जागेची आयडेंटी झालेली नाही. त्या महानगरपालिकेच्या मालकीच्या नाहीत तर आपण एस्टीमेट तयार करुन ही जी प्रोसेस केली ही चुकीची आहे. यामुळे जे मुळ २२६ कोटीचे प्राकलन होते ते ३५० कोटी पर्यंत झालेले आहे. म्हणजे १२५ कोटीचा भुर्दंड या शहरातील जनतेवर बसलेला आहे. सोबतचा जो विलंब झालेला आणि एक प्रस्ताव परत आलेला आहे आणि महानगरपालिकेला हा भार घ्यावयाचा आहे. २००९ पासून २४ बाय ७ योजना अंमलात आणल्या जात आहे आणि वारंवांर अशा पध्दतीचे वाढीव दराचे प्रस्ताव येवून राहिले. याला कुठेतरी ब्रेक लागला पाहिजे. याचे कटआऊट निश्चित केले पाहिजे. २४ आय ७ या योजनेची परिपुर्तता करण्यासाठी लॅन्ड ॲक्वीजेशनची प्रोसेससाठी अधिकचा निधी लागणार आहे. मा.महापौरजी, जी विषयपत्रिका आहे, या विषयपत्रिकेवर पुन्हा एक विषय आला आहे. अतिरिक्त वाढीव खर्च आणि संपुर्ण भुर्दंड या शहरातील नागरिकांवर पडत आहे. यासाठी या शहरातील नागरिक जबाबदार आहे काय ? हे कुणाच्या चुकीमुळे होत आहे. ही जबाबदारी निश्चित केली पाहिजे, ज्या कुणामुळे ही चुक झाली असेल त्या अधिका-यावर ही जबाबदारी निश्चित केली पाहिजे, ज्या कन्सलटंट ला कोटयावधी रुपये देत आहे त्याच्यावर निश्चित केली पाहिजे. कन्सलटंट डीआरए यांची संपुर्ण जबाबदारी संपली असे होत नाही. त्याला कोश्चन करण्याची जबाबदारी सुध्दा आपली आहे. ती जबाबदारी अधिका-याची आहे. ती गोष्ट वेळेवर एक्झक्युट त्याच्याकडून करुन घेणे ही आपली जबाबदारी आहे. लॅन्ड ॲक्वीजेशन केले नाही , हे काम वेळेवर केले नाही म्हणून तो भाग वगळून नंतर कुणाला देवून राहिले. लॅन्ड ॲक्वीजेशन कां झाले नाही, सध्या ॲक्वीजेशनची परिस्थिती काय आहे. याचे सुध्दा उत्तर प्रशासनाला देणे आवश्यक आहे.

श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, ऐसा है कि, जो गुडधे साहब बोल रहे है कि, जो ईएसआर का रेट बडा है, नागपूर शहर मे ईएसआर के लिये जो जगह देनी थी, उस जगह पर लोगो का विरोध और वहां जो ग्राउंड लेव्हल जो ईएसआर के लिये जो मिलना चाहिये, वह ना मिलने के कारण यह हुआ, एनआयटी के चार, पांच टेंडर हो गये है जिसमे ६० प्रतिशत अबाउ करके रेट सीएसआर को दिये गये है, क्योंकि वहां के नागरिको का विरोध होने के कारण ईएसआर बनने मे तकलीफ हुई, यह बात विभाग के माध्यम से मालुम हुई।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- पाइंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, बोरकर साहेब, नागरिकांचा विरोध जो झाला तो ६ जागेसाठी झालेला आहे. सक्करदरा १, सक्करदरा २, नंदनवन १ आणि नंदनवन ३, दिघोरी, भरतवाडा या सहा ठिकाणी लोकांचा विरोध झालेला आहे म्हणून काम सुरु करु शकलो नाही. मात्र इतर कोणत्याही ठिकाणी नागरिकांचा विरोध नाही. याचे नेमके कारण काय?

श्री.तानाजी वनवे:- पाइंट ऑफ इन्फोमेशन  मा.महापौरजी, प्रफुल्ल गुडधे भाऊ यांनी म्हटले, याच्यामध्ये आता आमच्या कडे नंदनवन दर्शन कॉलनीला एक खेळण्याचे मैदान आहे. त्या ठिकाणी सुध्दा यांचे प्लॉनिंग झालेले नाही आहे. त्या ग्राऊंडच्या ठिकाणी खासदार निधीतून ५० लक्ष रुपये खर्च झालेले आहे त्या ग्राऊंन्डचे आरक्षण बदललेच नाही. त्या ठिकाणी टाकी खोदण्यासाठी जेसीपी घेवून आले त्याला लोकांनी विरोध केला. त्याचा असा अनेक ठिकाणी विरोध आहे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे आमच्याकडेही विरोध होत आहे. त्याच्यामुळे यामध्ये महानगरपालिकेचा पैसा जात आहे, नागपूर शहरातील जनतेचा पैसा जात आहे. आणि प्रशासनाच्या या चुकीमुळे हे होत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, माझा प्रश्न आहे ६ ठिकाणी जागेसाठी नागरिकांचा विरोध आहे त्यामुळे त्या टाकीला विलंब होत आहे हे कारण समजु शकतो. परंतु ४२ पैकी अनेक आहेत त्यांचे नाव सांगितले, गिट्टीखदान, खामला, भरतवाडा, नारा, जरीपटका, बस्तरवारी, बिनाकी मंगळवारी, बोरियापुरा,वाटोळा या ठिकाणी जागा उपलब्ध नाही असे आपण सांगितले. ही जागा ॲक्वॉयर करण्यासाठी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे आणि कधी करणार आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.मनोज सांगोळे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी,  माझा प्रभागात नारी या ठिकाणी दोन ईएसआर तयार होणार होते. अनेक वर्षापासून ऐकत आहे आजपर्यंत काम सुरु झालेले नाही. मी जागा दाखवून देतो, खुप जागा अशा आहेत की ज्यावर आक्षेप येवू शकत नाही. मला याबाबतीत कधी विचारणा झालेली नाही. फक्त सांगण्यात येत होते की ईएसआर बांधणार आहे. आमच्या एरियात फुटबॉल ग्राऊंडची साडेचार एकर जागा फक्त १ हजार रुपयोत करोडपती लोकांना दान देण्यात आली आहे. माझी एकच विनंती आहे नागपूर शहरात जागा उपलब्ध आहेत त्या मिळू शकतात त्यावर कार्यवाही करण्यात यावी. मा.महापौरजी, महानगरपालिकेला रेव्हेन्यु येत आहे त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल. त्यातुन पाणी पुरवठयाचे काम होईल यासाठी लक्ष वेधू इच्छितो, धन्यवाद.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, माझा प्रश्न होता. या जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाची काय कार्यवाही सुरु आहे. ते कधी पर्यंत संपणार आहे. कधीपर्यंत जागा उपलब्ध होवून काम सुरु होणार आहे. आपल्याला ४० जागा निश्चित करुन दयाव्या लागतील. मा.महापौरजी, आपल्याला विनंती आहे, याबद्दलचा विस्तृत अहवाल या प्रश्नाच्या संदर्भात प्रशासनाकडून मागविला पाहिजे. एक कार्यक्रम त्यांच्याकडून घेतला पाहिजे. २४ बाय ७ योजनेची अंमलबजावणी आपल्याला करावयाची आहे. ती अंमलबजावणी करण्याकरिता जो वेळ लागतो आहे तो टाळता आला पाहिजे आणि यशस्वीपणे एका टाईमपिरेडमध्ये हा प्रोजेक्ट पुर्ण करणे आवश्यक असल्यामुळे तो करता आला पाहिजे. या करिता प्रशासनाकडून माहिती घेण्यात यावी की या जागा कधीपर्यंत उपलब्ध करुन देणार आहे. तसेच ज्या टाकीकरिता जागा उपलब्ध नाहीत त्या टाकींकरिता पर्यायी जागेबाबत प्रशासनाकडून काय कार्यवाही सुरु आहे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, जो १६ जगह म.न.पा. ईएसआर कर रही है, जिन ६ जगहो के बारे मे मा.सदस्य ने कहां है कि, वहां पर लोगो का विरोध है, इसके अलावा भी बहुत सारे प्राब्लेम थे, जैसाकि, स्कुल की जगह थी, प्ले ग्रांउड थे, जिसके लिये कोर्ट मे जाकर हमने परवानगी ली अभी जो १६ ईएसआर म.न.पा. कर रही है, उसमे से ८ ईएसआर का वर्क आर्डर स्टेज तक आ गया है, और बाकी जो आठ है उनके टेंडर प्रोसेस पुरे हो कर के फायनेंशियल बिट खोलने के प्रोसेस पर हम लोग है।

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, कोर्टाची परवानगी घेतलेली आहे परंतु खेळाचे मैदानच नाही आहे. खेळाच्या मैदानाचे आरक्षण हटलेले नाही तर त्या ठिकाणी परवानगी नसतांना जेसीपी लावून खोदकाम करीत असेल तर ते कितपत योग्य आहे. याला जबाबदार कोण आहे याचे उत्तर पहिल्यांदा देण्यात यावे.

महापौर:- विरोधी पक्ष नेता म्हणतात त्याप्रमाणे कोर्टाने परवानगी दिलेली आहे काय?

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, कोर्टाची अनुमती नाही आहे आणि ज्या ठिकाणी प्लेग्राऊंड आहे त्याठिकाणी हटविण्याचे म्हटले आहे. अनेक ग्राऊंड असे आहेत त्या ठिकाणी ३७ ची कार्यवाही होवून गर्व्हमेंटला प्रस्ताव पाठविला गेला आहे. त्या ठिकाणी बगिचा आहे आणि प्रायमरी शाळा आहे. हायकोर्टाने परवानगी दिलेली नाही आहे अशी माझी माहिती आहे. असेल तर त्याची कॉपी मला ताबडतोब दाखवावी.

महापौर:- सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना कोर्टाच्या आदेशाची कॉपी उपलब्ध करुन दयावी. मा.तानाजी आपल्याला प्रशासनाकडूनआपल्याला रितसर कोर्टाच्या आदेशाची प्रत उपलब्ध होईल.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, जेथे प्ले ग्राऊंन्ड आहे तेथे करण्याची परवानगी यांनी मागितलेली आहे. परंतु जेथे गार्डन आणि प्रायमरी शाळा आहे त्या ठिकाणी करण्यास आदेशात म्हटले आहे काय ? तो आदेश वाचून दाखविण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, वह जो जगह थी वह स्कुल की थी, स्कुल का जो रिझर्व्हेशन था, उसको कंवर्ड करने के लिये ए.डी.टी.पी. ने प्रस्ताव भेजा, फिर वही प्ले ग्राउंड मे ईएसआर के लिये हमने कोर्ट से परवानगी मांगी।

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, उसको शासन ने मंजुरी दी क्या? त्याची कॉपी ही कार्यकारी अभियंता यांना दिलेली आहे. शासनाने अजूनपर्यंत आरक्षण प्ले ग्राऊंन्ड मध्ये करण्याची परवानगी दिलेली नाही.

महापौर:- काय स्टेटस् आहे. प्रशासनाला निर्देश देण्यात येते की विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उचलला आहे त्यांच्या प्रश्नाची संपुर्ण लेखी माहिती त्यांना देण्यात यावी.

श्री मोहम्मद जमाल :- मा.महापौरजी, सर्वप्रथम मैं महानगरपालिका का अभिनंदन करता हुॅं कि, आजसे स्कुले शुरु हो रही है, आज से स्कुल शुरु के बाद दो दिन पहले शिक्षण विभाग मे एक सभा हुई,

स्कुल टिचरो को दो व्हॅक्सीन के बगैर स्कुल के अंदर आने की इजाजत नही दी जा रही है। मुझे इस विषय पर बोलने का कुछ समय दिजीये।

महापौर :- इस विषय से संबंधित विषय होंगा तो आप बोलिये, दुसरा विषय इसमे मत लाईये।

श्री.राजेंद्र सोनकुसरे:- पाईंट ऑफ इनफोर्मेशन मा.महापौरजी, प्रभाग २४ हनुमाननगर झोन अंतर्गत डबर डेकर टाकी आहे त्याबद्दलचे स्टेटस् आता काय आहे ? ती माहिती आपल्या मार्फत प्रशासनाकडून पाहिजे होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, या प्रश्नाला धरुन माझा उपप्रश्न आहे. प्रत्येक टाकीनिहाय स्टेटस् काय आहे याची माहिती देण्यात यावी.

महापौर:- प्रशासनाने निवेदन सादर करावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. मा.सदस्य, श्री सोनकुसरे साहब ने जो प्रश्न पुछा है कि, फिडर ईएसआर की क्या पोजीशन है तो फिडर ईएसआर जो है, उसकी जो मान्यता है, वह स्थायी समिती से मिल गयी है, उसका वर्क आर्डर दो तीन दिन मे हो जायेगा।

महापौर:- प्रफुल्लजी का विषय है जो टोटल ईएसआर है उसमे से कितने ऐसे है जिसके लिए जगह नही मिली, उसमे हमने पर्यायी जगह के लिए विचार किया है क्या?

कार्यकारी अभियंता (श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. ऐसी टोटल ११ जगह है, जो अभी तक नही मिली है, हमने उन जगहो की पुरी हिस्ट्री बनाकर कोर्ट मे सबमिट किया और कोर्ट के सामने जैसा आयजीएमसी है, जीएमसी है, निरी है, पीव्हेकी है जितनी भी ऐसी शासकीय यंत्रणा है, उनको डायरेक्ट कोर्ट से आदेश मिले, इसके लिये हम वकील से बात कर रहे है्।

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, काही ठिकाण असे आहेत, ताजबाग, बिनाकी मंगळवारी, लकडगंज या ठिकाणी बोलाविलेल्या निविदा प्राकलन राशी पेक्षा जास्त राशीच्या प्रापत झालया. (वाचले) मुळ प्राकलन राशीपेक्षा प्राप्त झालेल्या निविदेस मा स्थायी समिती ठराव क्रमांक ६३ दिनांक ०६.०८.२१ अन्वये काम सुरु करण्यास कळविले आहे. ५ टक्के साठी अधिकची रक्कम तो भुर्दंड महानगरपालिकेला भरावा लागत आहे. या ठिकाणी ओंकारनगर टाकी १, २, ला प्राकलन राशी पेक्षा जास्त प्राप्त झाली आहे. सदर काम करण्यास कंत्राटदाराने असमर्थता दर्शविली आहे. या ठिकाणी जागेचा प्रश्न नाही आहे त्या ठिकाणी निविदेची रक्कम अधिक झाली म्हणून त्याने असमर्थतता दर्शविलेली आहे. गिट्टीखदान मध्ये १६ ईएसआर मधील काम करण्यास पत्र दिल्यानंतर त्याने १६ ईएसआरच्या बाबतीतच पत्र दिले म्हणून बाकी १६ ईएसआरची कामे महानगरपालिकेला करावयाची आहेत. (वाचले) मा.महापौरजी, ४२ टाक्यासाठी एकच कारण राहू शकत नाही. वेगवेगळया क्षेत्रासाठी वेगवेगळया जागा निश्चित झालेल्या आहेत आणि त्याची वेगवेगळी कारणे राहू शकतात. ते जनरलाईज करता येणार नाही. मग जागा उपलब्ध आहे काय? जर जागा उपलब्ध आहे तर ती शाळेची

जागा आहे काय? ग्राऊन्डची जागा आहे काय ? गार्डनची जागा आहे काय? डीपी आरक्षणामध्ये ते आहे किंवा नाही आहे. या संपुर्ण बाबीचे उत्तर अपेक्षित आहे. मा.महापौरजी, त्यामुळे कार्यालयाला आदेश दयावे. ४३ टाक्याच्या संदर्भात प्रत्येक टाकीचा स्वतंत्र अहवाल करण्यात यावा.

महापौर:- प्रशासनाला निर्देश देण्यांत येते कि, सन्माननिय विरोधी पक्ष नेत्यांनी सूचित केल्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत त्यांना रितसर उपलब्ध करुन दयावी. त्याचबरोबर मा.सदस्य श्री.प्रफुल्लजी गुडधे यांनी जो प्रश्न विचारले आहे त्याप्रकारचा लिखीत अहवाल श्री.प्रफुल्लजी गुडधे यांना उपलब्ध करुन दयावे हा विषय येथे स्थगित ठेऊन पुढच्या सभागृहात या विषयावर चर्चा करण्यात येईल.

**प्रश्न क्र.२७६**:- नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील सर्व विभाग तसेच सर्व झोन मधील कार्यरत असलेले सहाय्यक आयुक्त हे किती वर्षापासून एकाच ठिकाणी काम करीत आहेत ?

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, मला या प्रश्नाचे उत्तर मिळालेले आहे परंतु उत्तर समाधानकारक नाही. या प्रशासनामध्ये जेव्हा कर्मचा-यांची बदली चा विषय येतो आणि जेव्हा अधिका-यांचा बदलीचा विषय येतो तेव्हा एकच अधिकारी एका ठिकाणी तीन वर्षापेक्षा अधिक काळापर्यंत ते त्या ठिकाणी काम करतात. आपण बाकीच्या लोकांना ३ वर्ष झाले म्हणून त्याची बदली ताबडतोब दुस-या विभागात करण्यात येते. या अधिका-यांची बदली कां करण्यात येत नाही याचे मला उत्तर देण्यात यावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्ष नेता यांनी जो प्रश्न विचारलेला आहे बदलीच्या संदर्भात, मा.महापौरजी, अधिकारी आणि कर्मचा-यांचा बदली करण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. या अनुषंगाने बदली अंतर्गत जी तरतूद आहे त्यामध्ये बदलीचा सर्वसाधारण कालावधी ३ वर्ष असे नमुद केले आहे. प्रशासकीय कामे सुव्यवस्थित व्हावे आणि काही रिक्त पद असेल तर त्या अनुषंगाने बदलीवर मुदतवाढ देण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. प्रशासकीय कामकाम योग्य आणि चांगल्या रितीने व्हावे या अनुषंगाने काही बदल्या ३ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर सुध्दा करण्यात आल्या नाही. त्या पार्श्वभुमीवर प्रशासकीय कामकाजासाठी आयुक्तांना तसा मुदतवाढीचा अधिकार आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, हा आयुक्तांना अधिकार आहे यामध्ये मला काही दुमत नाही. कायद्याच्या नियमाप्रमाणे ते आहे परंतु एकच व्यक्ती एका पदावर वाटेल तितके वर्ष राहतो. एकाच व्यक्तीची एका वर्षात, तीन महिन्यात, सहा महिन्यात त्याची बदली करण्यात येते. प्रशासकीय मर्जीतील अधिकारी असेल तर त्याला कित्येक वर्ष एकाच पदावर ठेवायचे आणि प्रशासनाच्या मर्जीतील अधिकारी नसेल तर त्याची वाटेल त्या ठिकाणी बदली करावयाची ही परंपरा चुकीची आहे. निश्चित रुपाने एकच अधिकारी त्या पदावर कित्येक वर्षापासून आहे त्याची बदली कां करण्यात येत नाही.

महापौर:-प्रशासनाचे या बाबतीत उत्तर अगदी स्पष्ट दिसत आहे.

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने गेल्या अडीज वर्षापूर्वी मी सभागृहात विषय आणला होता. त्यावेळी तत्कालीन आयुक्त यांच्या मान्यतेने तत्काली उपायुक्त श्री.कापडणीस यांनी एक परिपत्रक काढले होते. या परिपत्रकाच्या अनुषंगाने कोणकोणते अधिकारी, कोणकोणते कर्मचारी, मग ते क्लॉस थ्री असो, क्लॉस फोर असो किंवा क्लॉस वन अधिकारी असो. किंवा शासनाद्वारे डेप्युटेड अधिकारी असो. त्या अनुषंगाने एक परिपत्रक काढले होते की ज्या अधिकारी, कर्मचा-यांना ३ वर्षाहून अधिक किंवा ५ वर्षाहून अधिक झाले आहे त्याच्या बदलीच्या संदर्भात परिपत्रक काढण्यात आले होते. या परिपत्रकाचे वाचन व्हावे अशी मा.महापौरजी आपणांस विनंती आहे. दुसरे, या परिपत्रकाच्या अनुषंगाने प्रशासनाने काही डाटा कलेक्ट केला आहे काय? की झोन निहाय कोणकोणते अधिकारी, कोणकोणते कर्मचारी अनेक वर्षापासून एकाच पदावर, एकाच ठिकाणी काम करीत आहेत. या संदर्भात सुध्दा माहिती दयावी अशी विनंती आहे.

महापौर:- प्रशासनाने कृपया उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, बदलीच्या अनुषंगाने दिनांक २२.०५.२०१८ रोजी महानगरपालिकेचे एक परिपत्रक काढण्यात आलेले आहे. त्यामध्ये वर्ग १, वर्ग २ च्या अधिका-यांच्या बदलीकरिता ३ वर्ष नमुद करण्यात आलेले आहे. वर्ग ३ च्या कर्मचा-यांकरिता ५ वर्ष नमुद करण्यात आलेले आहे आणि वर्ग ४ च्या कर्मचा-यांच्या बदलीकरिता ७ वर्ष करण्यात आलेले आहे.

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, जर अशाप्रकारे वेगवेगळया वर्गवारीनुसार आणि कॅटेगिरीनुसार जर झाले आहे तर त्या अनुषंगाने प्रशासनाने त्या संदर्भात किती लोकांची बदली केली आणि त्या संदर्भातील डाटा उपलब्ध आहे काय? डाटा जर जवळ आहे तर कोणत्या झोनमध्ये किती वर्षापासून किती कर्मचारी काम करीत आहेत.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, याच्यामध्ये महानगरपालिकेच्या कर्मचा-यांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे सध्या एकत्रित डाटा उपलब्ध नाही. सध्या डाटा कलेक्ट करण्याचे काम करीत आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, यांच्याकडे डाटा उपलब्ध नाही. कर्मचा-यांची संख्या मोठी आहे परंतु आपले वरिष्ठ अधिकारी जे क्लॉस वन आणि क्लॉस टु चे अधिकारी आहेत त्यांची संख्या कमी आहे त्याची माहिती सभागृहात देवू शकतात. कर्मचा-यांची संख्या मोठी असल्यामुळे माहिती देण्यात वेळ लागेल परंतु अधिका-यांची माहिती फार थोडक्यात आहे. अधिका-याच्या बाबतीत मी बोललो आहे त्यामुळे ती माहिती थोडक्यात देण्यात यावी.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, मा.सदस्य यांनी विचारलेल्या संवर्गाची माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, मला ती माहिती वाचुन दाखविण्यात यावी.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, सहा.आयुक्त या संवर्गातील पदाच्या

संदर्भात, कोणाचा कालावधी किती आहे याबाबत मा.सदस्यांनी माहिती विचारलेली होती. सध्या महानगरपालिकेत १२ सहा.आयुक्त कार्यरत आहेत. त्यांचा पोस्टींगचा जो पिरेड आहे तो मा.सदस्यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी १२ सहा.आयुक्तांचा पिरेड वाचून दाखवितो. (वाचले) श्री.गणेश राठोड, लक्ष्मीनगर झोन क्र. १ मध्ये सहा.आयुक्त म्हणून २८.१०.२०२० पासून कार्यरत आहेत. धरमपेठ झोन क्र. २ मध्ये श्री. प्रकाश वराडे हे ०४.०७.२०१९ पासून कार्यरत आहेत. हनुमाननगर झोन क्र. ३ मध्ये सुषमा मांडवे हया १७.०५.२०२० पासून कार्यरत आहेत. धंतोली झोन क्र. ४ मध्ये किरण बडगे २७.०८ २०१९ पासून कार्यरत आहेत. नेहरुनगर झोन क्र. ५ मध्ये श्री हरीश राऊत ०७.०७.२०२० पासून कार्यरत आहे. गांधी बाग झोन क्र. ६ मध्ये श्री.अशोक पाटील २९.०५.२०१५ पासून कार्यरत आहेत, सतरंजी पुरा झोन क्र. ७ मध्ये श्री.पंधारे हे ३१.०५.२०२१ पासून कार्यरत आहेत.लकडगंज झोन क्र. ८ मध्ये साधना पाटील हया १७.०५.२०२० पासून कार्यरत आहेत आणि आसीनगर झोन क्र. ९ मध्ये श्री.अभिजित बावीस्कर हे २१.०२.२०२१ पासून कार्यरत आहेत तर मंगळवारी झोन क्र.१० मध्ये श्री. विजय हुमणे हे ३१.०५.०२१ पासून कार्यरत आहेत. सामान्य प्रशासन विभागात श्री.महेश धामेचा हे १७.१०.२०१६ पासून कार्यरत आहेत. महसुल विभागात श्री.मिलींद मेश्राम हे २४.०६.२०१५ पासून कार्यरत आहेत.

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, प्रशासनाने सांगितले आमच्याकडे डाटा उपलब्ध नाही. वर्ग १ आणि वर्ग २ मध्ये जे अधिकारी आहेत त्यांची संख्या फार कमी आहे. परंतु नेमकी संख्या किती आहे या संदर्भात सुध्दा प्रशासनाने माहिती दयावी.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, वर्ग १ संवर्गामध्ये कार्यरत पदे १०३ आहेत. वर्ग २ संवर्गामध्ये २३ पद कार्यरत आहेत वर्ग ३ मध्ये १६५८ पदे कार्यरत आहेत.

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, जैन साहेबांनी सांगितले की वर्ग १ मध्ये १०३ पदे आहेत मला वाटते ते थोडे तपासुन घ्यावे. वर्ग १ मध्ये सध्या किती पदे आहेत.

उपायुक्त(श्री.जैन, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, वर्ग १ संवर्गामध्ये मंजूर पद १९९ आहेत आणि कार्यरत पदे १०३ आहेत.

**<u>प्रश्न क्र. २७७</u>**:- नाईक तलाव भाजी बाजारातील ओटे भाडे तत्वावर देण्या संदर्भात

श्री. दिपराज पार्डीकर:- मा.महापौरजी, नाईक तलाव भागामध्ये सन २०१७, २०१८ आणि २०१९ मध्ये एक २५ लक्ष रुपये लागत लावून एक बाजार बांधलेला आहे. त्या बाजारात एकुण ६६ ओटे आहेत. प्रत्येक ओटयाची रुंदी व लांबी ७ बाय ९ आहे. एकुण ४५ दुकाने दुकाने लागतात परंतु त्या पासून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न महानगरपालिकेला होत नाही. त्या लोकांना ते ओटे आपण लीजवर दिले की आपल्या उत्पन्नात भर पडेल. त्या ओटयावर बसलेले लोक बाजार करतात. त्या बाजारासाठी महानगरपालिकेच्या तीन-तीन, चार-चार गाडया कचरा उचलण्यासाठी लावल्या जातात. त्या बाजारापासून महानगरपालिकेला कोणताही फायदा होत नाही. प्रशासनाने ओटयाची लीज बनवून

भाडेपट्टयावर करुन दिले यामध्ये प्रशासनाने उत्तर दयावे.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.देशमुख,बाजार विभाग):- मा.महापौरजी, मा.नगरसेवकांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने नाईक तलाव येथील भाजीपाल्याचे जे ओटे आहेत. ते ओटे महानगरपालिकेच्या जागेवर नसून खाजगी जागेवर आहेत आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १४९ च्या कलम १२७ नुसार जे बाजार महानगरपालिकेच्या मालकीचे असतील किंवा ज्यांचे परिरक्षण महानगरपालिका करीत असेल अशा सर्व बाजारांना नगरपालिका बाजार संबोधण्यात यावे. मा.महापौर महोदय, नाईक तलाव जे भाजीपाला बाजाराची जी जागा आहे ती भुमापन क्रमांक १०७ आहे आणि ती जागा काळे यांच्या परिवारातील आहे. त्यामुळे त्या जागेवर बांधण्यात आलेले जे ओटे आहेत त्याचे महानगरपालिकेद्वारे भुपट्टे देवू शकत नाही किंवा ओटे आवंटित करु शकत नाही.

श्री. दिपराज पार्डीकरः- मा.महापौरजी, अधिकारी म्हणतात की ती खाजगी मालकीची जागा आहे मान्य आहे. परंतु जेव्हा फाईल बनविली, त्याला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली, टेंडर होवून वर्कआर्डर झाले तेव्हा फाईल कां थांबविण्यात आलेली नाही. महानगरपालिकेतर्फे अनेक रस्ते तयार केले, गडरलाईनचे कामे केले, तलावाचे सौदर्यीकरणाचे काम केले. त्यावेळेस लोकांच्या सुखसुविधेचे कामे करतो तर बाजारातून उत्पन्न घेण्यास काय अडचण आहे. त्या जागेसाठी टॅक्स लावून देण्यात यावा जेणेकरुन महानगरपालिकेले उत्पन्न होईल.

श्री.राजेंद्र सोनकुसरेः- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, नागपूर शहरात भाजीपाले विक्रेते यांना वेळोवेळी भुर्दंड भरावा लागतो त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. कोव्हीडमध्ये मागच्या दोन वर्षापासून त्यांची आर्थिक परिस्थिती खुप हलाखीची झालेली आहे. माझा एवढेचा मुद्दा आहे की त्यांना भाडेपट्टा देण्यात यावा जेणेकरुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. अधिकृत बाजार राहत नाही संपुर्ण शहरामध्ये हीच स्थिती आहे. त्यामुळे महानगरपालिकेला जे राजस्व प्राप्त व्हायचे तेही राजस्व प्राप्त होत नाही. अधिकृतपणे त्यांना रोजगार मिळावा यासाठी महानगरपालिका प्रशासनाला निर्देश देण्यात आले होते आणि मा.महापौरजी आपलीही इच्छा होती. त्यामुळे प्रशासनाने महानगरपालिकेच्या जागेवर किती कार्य केले आहे याची ही माहिती देण्यात यावी.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.मनोज गावंडेः- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, ज्या जागेवर ओटे बांधलेले आहे ती जागा महानगरपालिकेची आहे की खाजगी मालकीची जागा आहे.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दिले आहे की ती खाजगी मालकीची जागा आहे.

श्री.मनोज गावंडेः- मा.महापौरजी, खाजगी मालकीच्या जागेवर महानगरपालिकेने कसे काय ओटे बांधले याबाबत प्रशासनाने माहिती दयावी.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.देशमुख,बाजार विभाग):- मा.महापौरजी, जे ओटे बांधण्यात आले ते महानगरपालिकेतर्फे २०१८-१९ मध्ये बांधण्यात आले आणि त्यामध्ये जी जागा आहे ती खाजगी मालकीची जागा आहे. खाजगी मालकीच्या जागेवर भाडेपट्टे किंवा लीज वर द्यावयाचा असेल तर आपल्याला करारनामा करुन घ्यावा लागतो. तो करारनामा खाजगी जागेसाठी करु शकत नाही त्यामुळे तो भाडेपट्टा किंवा लीजवर आपण देवू शकत नाही. त्यावर टॅक्स लावावयाचा असल्यास आपण त्यावर मालमत्ता टॅक्स लावू शकतो.

श्रीमती आभा पांडे:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, जर ती जागा खाजगी मालकीची आहे तर त्या खाजगी मालकीच्या जागेवर कसे काय महानगरपालिकेने ओटे बांधलेले आहे आणि त्याच्यावर झालेला खर्च किती आहे.

महापौर:- प्रशासनाने भुमिका स्पष्ट करावी.

उपायुक्त(श्री.देशमुख,बाजार विभाग):- मा.महापौरजी, २०१७ मध्ये बाजार ओटे बांधकामाचे काम सुरु झालेले होते. ते झोनमार्फत बांधण्यात आले आहे. त्या वेळेस त्या जागेची शहानिशा होणे आवश्यक होती. २५ लक्ष रुपये त्या कामासाठी खर्च केला आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, ते ओटे बांधायला एकुण किती खर्च आला.

निगम आयुक्त:- ॲडीशनल कमिश्नर यांनी सांगावे.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, आताच देशमुख यांनी सांगितले की २५ लक्ष रुपये त्या कामासाठी खर्च केला. त्याबाबत डिटेल्स् माहिती आहे. ती जागा स्लमची आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, स्लम मध्ये असलेल्या खाजगी मालकीच्या जागेवर नियमानुसार नागपूर महानगरपालिका बांधकाम करु शकते काय?

महापौर:- प्रशासनाने स्पष्टीकरण दयावे.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, नोटीफाईड स्लम असेल तर रस्ते, नाले, गडरलाईन या सगळया डेव्हलपमेंट आहेत त्या करु शकतो. त्या अंतर्गत या ॲक्टीव्हिटी करण्यात आली असेल.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, रस्ते करु शकतो परंतु ओटे करिता मागणी करण्यात आली नाही. जर भाजीवाल्यांना बसविण्यासाठी खाजगी मालकीच्या जागेवर ओटे बांधले ते कोणत्या आधारावर ओटे बांधले. त्यावर एकुण किती निधी महानगरपालिकेचा खर्च झाला याचे अधिका-यामार्फत पुर्ण उत्तर देण्यात यावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.देशमुख,बाजार विभाग):- मा.महापौरजी, जो स्लममधील एरिया होता त्या ठिकाणी रस्ते, नाल्याचे वगैरे काम झालेले आहे. बाजाराची सोय व्हावी म्हणून ७ बाय ९ फुटाचे ४८ ओटे बांधण्यात आले. सध्या स्थितीत त्या ठिकाणी ओटे उपलब्ध आहेत. त्या स्लममध्ये पर्यायी व्यवस्था म्हणून ते करण्यात आले आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, प्रशासनाने उत्तर दिले नाही की ओटे बांधण्यासाठी महानगरपालिकेने किती खर्च केला.

उपायुक्त(श्री.देशमुख,बाजार विभाग):- मा.महापौरजी, सहा.आयुक्त झोन क्र. ७ सतरंजीपुरा झोन हे उत्तर देवू शकतील.

महापौर:- संबंधित अधिका-यांना उत्तर देण्यासाठी मा.निगम आयुक्तांनी निर्देश दयावे.

निगम आयुक्त:- झोन क्र. ७ सतरंजीपुरा येथील सहा.आयुक्त किंवा एक्झक्युटीव्ह इंजिनिअर यांनी उत्तर दयावे. वरील कामावर किती खर्च झाला याचे उत्तर देण्यात यावे.

सहा आयुक्त(सतरंजीपुरा झोन क्र. ७):- मा.महापौरजी, किती खर्च झाला त्याबद्दल मी विचारुन सांगतो.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, माझे निवेदन आहे की ज्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेची जागा नसतांना नागपूर महानगरपालिकेने खर्च केला. एखाद्या वेळेस एखाद्या रस्त्याचा पार्ट करायचा असेल तर अधिकारी आम्हांला सांगतात की तो खाजगी प्लाट आहे त्या खाजगी प्लॉटवर रस्ता करता येणार नाही तर हे कार्य नागपूर महानगरपालिकेच्या कोणत्या अधिका-याने कसे काय केले?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम आयुक्त:- पोहेकर आपण सांगावे, स्लमच्या संदर्भात आपण काय काय कामे करतो. या कामावर किती खर्च झाला आहे याची माहिती घेवून तुम्ही सांगू शकाल परंतु जनरल प्रिन्सीपल म्हणून आपल्याकडे ४२६ स्लम आहेत. त्या पैकी घोषित ३०० स्लम आहेत.आपण त्या ठिकाणी काय काय पध्दतीचे सुविधा उपलब्ध करुन देतो त्या संदर्भात माहिती दयावी आणि देशमुख तुम्हांला स्पष्ट सुचना दिल्या होत्या की या संबंधात प्रश्न विचारले जाणार आहेत. त्या कामावर किती खर्च झाले याचे उत्तर आपल्याला देता येत नाही काय? कन्सल्ट एक्झक्युटीव्ह आणि ए.सी. यांनी स्पेसिफिक माहिती दयावी. त्याच्या आधी स्लमच्या संदर्भात काय नेमके कार्य करतो, कोणकोणते काम हाती घेतो या संदर्भात पोहेकर यांनी निवेदन करावे.

अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदय, स्लम नोटीफाईड स्लम असतील आणि शासकीय किंवा पब्लीक लॅन्ड वर असतील तर त्या ठिकाणी काही मुलभूत स्वरुपाची कामे उदाहरणार्थ रस्ता, शौचालय अशा प्रकारची कामे आपण साधारणत: स्लम एरियामध्ये घेत असतो. गेल्या चार-पाच वर्षात आपण बीएसयुपीची कामे आपण नागपूर शहरात केलेली आहेत.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, मला एकच विचारावयाचे आहे की नोटीफाईड स्लम असो किंवा नसो, खाजगी जागेवर नागपूर महानगरपालिका खर्च करु शकते काय? आणि जर खर्च केला तर त्याचे उत्तर दयावे.

महापौर:- प्रशासनाने स्पष्टीकरण दयावे.

मुख्य अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदय, हा जो इश्यू आहे या बद्दल मला डिटेल माहिती नाही. परंतु हा एरिया टाऊन प्लॉनिंगने लेआऊट काढून डेव्हल्प करुन विक्रीपत्र केलेले होते आणि

त्यामुळे बाजारातील ओटे बांधले असतील ते पब्लीक करिता बांधले असतील. याची एक्झॅक्ट माहिती एडीटीपी कडून घेवून पुढच्या सभेत सादर करतो.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, अर्धवट माहिती घेवून जर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये अधिकारी येत असतील तर नागपूर शहराचे प्रश्न कसे सुटणार आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, मा.आयुक्त महोदयांनी निर्देश दिले आहे की किती खर्च महानगरपालिकेने केलेला आहे त्याचे उत्तर दयावे.

मुख्य अभियंता (श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदय, एडीटीपीकडून डेव्हल्प करण्यात आले होते. याची सविस्तर माहिती घेवून पुढच्या सभेत सांगतो.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, या सभेला टाऊन प्लॉनिंग विभागाचे अधिकारी आहेत त्यांच्या कडून माहिती घेवून सांगावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

मुख्य अभियंता (श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदय, याबाबतचे उत्तर बाजार विभाग किंवा टाऊन प्लानिंग विभाग देवू शकतील.

निगम आयुक्त:- पोहेकर तुम्ही इतके क्लॉरिफाय करावे की संबंधित ज्या संदर्भातील चर्चा चालू आहे तो स्लम आहे किवा नाही ते सांगावे. नोटीफाईड स्लम आहे किंवा नाही जर ते नोटीफाईड स्लम आहे तर नोटीफाईड स्लममध्ये सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा देण्याचे काम आपल्या एसआरए मार्फत करीत आहे किंवा नाही ते सांगावे

मुख्य अभियंता (श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदय, मुलभूत सुविधा देण्याचे काम महानगरपालिकेमार्फत केले जाते.

निगम आयुकत्:- मा.महापौरजी, एसआरए अंतर्गत मी या वर्षीचे सुध्दा दुर्बल घटक योजनेचे नियोजन बघितले. मागच्या वर्षीचे बघितले आणि त्याच्या आधीच्या वर्षीचे सुध्दा बघितले. नागपूर शहरात एकुण ४२६ सूलम आहेत. त्याच्या मध्ये मालकी वेगवेगळया लोकांची आहे. कुठे नझुलची आहे तर कुठे महानगरपालिककेची आहे तर कुठे एनआयटीची आहे. काही ठिकाणी मिश्र स्वरुपाची आहे. प्रत्येक वेळी स्लम जेव्हा नोटीफाईड करण्यात येते तेव्हा त्याठिकाणी मुलभुत सुविधा देण्याचे काम आपण वेळोवेळी करीत असतो. काही ठिकाणी एसआरए अंतर्गत करतो, काही ठिकाणी दुर्बल घटक हेड अंतर्गत करतो तर काही ठिकाणी झोन अंतर्गत फंडामधून करतो. मा.सदस्यांनी विचारले की या ओटयाचे आपण वाटप करु शकतो काय? कदाचित त्यांना लक्षात आले असेल, की महानगरपालिकेने खर्च केला तर तो महानगरपालिकेच्या मालकीच्या असायला पाहिजे असा त्यांचा समज असला पाहिजे. परंतु येथे आपण क्लॉरिफिकेशन करुन दिले आहे की संबंधित कुणाला वाटप करु शकत नाही. मुळातच संबंधित स्लमचा ओनर महानगरपालिका नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचे वाटप करु शकत नाही. काही नगरसेवकांच्या मनात शंका निर्माण झालेली आहे की खाजगी ठिकाणी कसा काय खर्च

केला तर त्याला पुरक उत्तर आहे की संबंधित जागा ही स्लमची असल्यामुळे आपण स्लम मध्ये नेहमी काम करीत असतो त्यात ही गोष्ट झाली आहे. मी या संदर्भात मा.महापौरजी यांना विनंती करतो की, प्रत्यक्ष किती खर्च झाला, कुठल्या हेडमधून झाला याचे सविस्तर लेखी स्वरुपाचे उत्तर स्टेट विभागाकडून मा.सदस्यांना आणि सभागृहाला उपलब्ध करुन देतो. धन्यवाद

महापौर:- सन्माननिय सदस्यने जो प्रश्न खडा किया था वह प्रश्न केवल इतना सा था की, महानगरपालिका के निधी से जो ओटे उपलब्ध कराके दिये गये है वहा से महानगरपालिका को आर्थिक उपार्जन होना चाहिये, प्रशासन ने उत्तर देते समय सहजता से बताया की उस ओटे को लिजपर नही दे सकते, भाडेपट्टेपर नही दे सकते लेकीन प्रशासन ने यह भी कहा की उस जगह पर टॅक्स लगा सकते है I उस जगह को जिन लोगोंने ऑक्युपाय किया है उन्हे टॅक्स लगाकर के वार्षिक हम वहा से रेव्हेन्यु जनरेट कर सकते है तो उस दिशा मे प्रशासन ने काम करना चाहिये I अगर उसमे तकनिकी अडचण है तो स्वच्छ भारत मिशन के अंतर्गत हम स्वच्छता की राशी वहासे दंड स्वरुप नियमित लगा सकते है उस प्रकार से प्रति व्यक्ती की स्वच्छता की राशी के आधार पर एक निर्धारीत राशी निश्चित करके वहासे हम वसुली करके महानगरपालिका का अर्थाजन कर सकते है I स्लम मे सुविधा उपलब्ध कराने के दृष्टी से वहापर बांधकाम करके दिया गया है ऐंसा प्रशासन का कहना है तो उपलब्ध कराके दिये गयी सुविधा का उपयोग नागरिक अच्छे तरीके से करे उसके मेंटेनन्स का महानगरपालिका को खर्चा आ रहा है इसलिये वहा से उपार्जन भी होना चाहिये इस दिशा मे महानगरपालिका को उपलब्ध नियमों के अंतर्गत जिस जिस तरीके से वहा से रेव्हेन्यु जनरेट हो सकता है और नागरिक सन्मान के साथ व्यवसाय कर सकते है उस दिशा मे महानगरपालिका निर्णय ले इसप्रकार के निर्देश दिये जाते है I

**<u>प्रश्न क्र. २७८</u>**:- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आजपावेतो किती लाभार्थ्यांना अनुदान राशी प्रदान करण्यात आली. या संदर्भात प्रश्न.

श्रीमती वैशाली नारनवरे:- मा.महापौरजी, तुमच्या मार्फत प्रशासन किती जागृत आहे हे बघण्यासाठी ख-या अर्थाने मी सभागृहाच्या पटलावर हा प्रश्न आणलेला आहे. मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले आहे. उत्तर जे दिलेले आहे ते समाधानकारक नसुन शंकाजनक आहे असे मला वाटते. मा.महापौरजी, प्रत्येक कुटुंबाचे स्वप्न् साकार करण्याकरिता २०१८ ते २०२२ पर्यंत पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता सुरु करण्यात आली. या योजनेचे काय झाले. ही योजना कितपत कार्यरत झाली आणि आता कां थांबलेली आहे. मा.महापौरजी, हे स्पष्ट करण्यासाठी मला प्रशासनाकडून काही प्रश्नाचे उत्तर पाहिजे आहे. सन २०१७ ते २०२२ पर्यंत ही योजना राबविण्याचे आश्वासन देवून गरीब, गरजू, हातमजुर म्हणून काम करणा-या लोकांचे स्व्:चे घर तोडून घर बांधण्याचे स्वप्न प्रशासनाने धुळीस मिळविलेले आहे. गेल्या ५ वर्षात या योजनेअंतर्गत एकही घरकुल उभे केले नाही. यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. ही नियुक्ती करण्यात आल्यानंतर सुध्दा ही योजना परिपुर्ण कां झाली नाही याही प्रश्नाचे उत्तर मला देण्यात यावे.

मा.महापौरजी, पंतप्रधान योजने अंतर्गत नागपूर शहरात सन २०२२ पर्यंत ही घरे बांधण्यात येतील अशी घोषणा आपण केलेली होती. त्याचे फक्त ४० टक्के अनुदानच प्राप्त झाले आहे असे मला उत्तर मिळालेले आहे. मा.महापौरजी आता २०१७-२०२२ म्हणजेच ५ वर्ष संपलेले आहे. ज्या वेळेस म्हणतात की ४० टक्के काम झाले आहे तर ते झोननिहाय झालेले आहे की काही विधानसभा क्षेत्रात झाले आहे याचे उत्तर देण्यात यावे. आपण पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ज्या लोकांकडून अर्ज मागविले होते त्या वेळेस अर्जदारांनी अर्ज सादर केले या लोकांना यासाठी खर्चही करावा लागला. जर ४० टक्के अनुदान प्राप्त झाले तर हे अर्ज गेले कुठे ? प्रशासनाने हे अर्ज केराच्या टोपलीत टाकलेले आहेत काय? नागरिकांच्या खिशाला कात्री लावण्याचे काम केलेले आहे असे म्हणावे लागेल. याचे उत्तर या सभागृहात देण्यात यावे. मा.महापौरजी, माझ्याकडे गरीब, गरजु नागरिक येतात ते सांगतात की आम्ही फार्म भरलेले आहे या योजनेचा लाभ आम्हांला कधी मिळणार आहे. मला जे उत्तर देण्यात आलेले आहे मा.महापौरजी, त्या उत्तरात यांनी सांगितले आहे कि, घटक क्र. ३ मध्ये यांनी म्हटलेले आहे की परत नवीन घरकुल तयार करणे आहे. म्हणजे ही उणे गोष्ट झाली मा.महापौरजी, हे म्हणतात की अनुदान प्राप्त होणे आहे. मा. महापौरजी, असे उत्तर हे देवू शकत नाही मा.महापौरजी. यांनी उत्तर बरोबर दिलेले नाही आहे. मा.महापौरजी. यांनी सांगितले कि, वाटप झाले आहे. लाभार्थी ४, अनुदान ४, १ लक्षापैकी ४० टक्के, पाच लोकांना वाटप झाले आहे परंतु त्याच्यापैकी एकाचे अनुदान अप्राप्त आहे तर ५ लाभार्थी आहेत हे कसे शक्य आहे मा.महापौरजी. याच्या मतानुसार त्याचे नाव आहे. त्याचे या ठिकाणी वाचन केले तर ते योग्य होईल. कोणत्या प्रभागाचे आहे, कोणत्या झोनचे आहेत, कोणत्या विधानसभा क्षेत्रातील आहे. मा.महापौरजी, माझी एवढीच विनंती आहे की नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा आणि नागरिकांचे स्वप्नांना लक्ष्य प्राप्त व्हावे. २०२२ पर्यंत या योजनेचा लाभ देण्यात आला तर ही पंतप्रधान आवास योजना यशस्वीरित्या पार पडली असे म्हणण्यास काही हरकत होणार नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे एवढीच विनंती करते.

महापौर:-प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत आपल्याकडे ४ घटक आहेत. याच्यामध्ये पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घटक क्र. ३ व घटक क्र. ४ हे दोन घटक महानगरपालिकेतर्फे राबविते. यामध्ये घटक ३ अंतर्गत आपण नवीन घरकुल बिल्डींग तयार करुन लाभार्थ्यांना देतो आणि घटक ४ अंतर्गत स्व:ताच्या मालकीच्या जागा आहेत त्यांना आपण अनुदान म्हणून २.५० लक्ष अनुदान देतो. घटक ३ अंतर्गत ४८० घरकुलाचा प्रोजेक्ट आपण शासनाला पाठविला आहे. त्याला अद्याप मान्यता मिळालेली नाही. घटक ४ अंतर्गत जे घरकुल बांधतात, सामाजिक न्याय अंतर्गत त्यामध्ये २३२८ लाभार्थ्यांना शासनाकडून मंजूरी मिळालेली आहे. २३२८ लाभार्थी हे सामाजिक न्याय अंतर्गत आहेत. त्यामध्ये ११३ चा डीपीआर आधी गेला होता त्यामध्ये आपल्याला केंद्र शासनाकडून दीड लक्ष रुपये अपेक्षित असते. राज्य सरकारकडून १ लक्ष रुपये अपेक्षित असते असे २.५० लक्ष रुपये शासनाकडून मिळतात. आपण जे ६ डीपीआर पाठविले

आहे त्यातील पहिला डीपीआरमध्ये ११३ लाभार्थी होते त्याच्याकरिता राज्य सरकारकडून ४५ लक्ष रुपये प्राप्त झाले आहे. केंद्र शासनाकडून अद्याप कोणताही निधी मिळालेला नाही.

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौर साहेब, मनोज सांगोळे यांनी जे म्हटले आहे त्याला काय आधार आहे. महानगरपालिका नोडल एजन्सी आहे. नोडल एजन्सी म्हणून महानगरपालिकेला काही पत्रव्यवहार केलेला आहे काय? पंतप्रधान आवाज योजनेची इंतभुत माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे काय?

श्री. मनोज सांगाळे:- मा.महापौरजी, केंद्र सरकार आपले आहे. तरी पदाधिकारी असे म्हणतात. कर्मचारी काम करतात किंवा नाही करीत हे पाहणे तुमचे काम आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत माझा प्रश्न असा आहे की पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अनुदान राशी मिळण्याकरिता ज्या एजन्सी असतात, कुणाला अनुदान राशी मिळते त्या संदर्भात माहिती हवी आहे. किती केसेस महानगरपालिकेत आतापर्यंत आलेल्या आहेत. अनुदान राशी प्राप्त झालेले लाभार्थी किती आहेत. किती लाभार्थ्यांनी महापालिकेला अर्ज केलेले आहेत त्याची माहिती देण्यात यावी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, माझा उप प्रश्न असा आहे. पंतप्रधान आवास योजना ही जेव्हा सुरु झाली आणि तेव्हा पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महानगरपालिकेकडून हा प्रस्ताव शासनाकडे कुणी पाठविला. मा.आयुक्तांनी मी जेव्हा दुर्बल घटक निधी च्या अनियमिततेच्या संदर्भात निवेदन दिले होते. तेव्हा त्याच्यामध्ये हा प्रश्न होता.

महापौर:- आपने उप प्रश्न के लिए पाईंट ऑफ इन्फोंमेशन लिया और आप वक्तव्य कर रहे है। आप अपना प्रश्न बोले।

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महानगरपालिकेकडून हा प्रस्ताव शासनाकडे कुणी पाठविला.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. हा जो प्रस्ताव आहे हा या वर्षी ऑगस्ट महिन्यात शासनाला पाठविला आहे.

श्रीमती नंदा जिचकार:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा. महापौरजी, केंद्रसरकारकडून येणारा पैसा हा राज्य सरकारमार्फत येतो की डायरेक्ट येतो या विषयी मला माहिती देण्यात यावी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. आपल्याला जे पैसे केंद्र सरकारकडून येतात ते राज्य सरकारकडून प्राप्त होतात.

महापौर:- अविनाशजीचा प्रश्न अगदी स्पष्ट आहे की महानगरपालिकेकडे किती अर्ज आलेले आहे आणि किती पात्र आहेत. त्या दृष्टीने प्रशासनाने काय पाऊल उचललेले आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, माझ्या प्रश्नामध्ये थोडे कन्फयुजन आहे. अनुदान राशी त्याच्यामध्ये तीन योजना आहेत. घटक अ, घटक ब आणि घटक क. या ठिकाणी जो प्रश्न विचारण्यात आला अनुदान राशीसाठी प्राप्त लाभार्थ्यांच्या कंडीशन आणि त्याचे किती अर्ज आले.याचे स्पेसिफिक उत्तर पाहिजे आहे.

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. एकुण ८३०० अर्ज अनुदान राशी साठी प्राप्त झाले आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, सभागृहाला आधी कंडीशन सांगा. अनुदान राशी प्राप्त करण्याकरिता त्या योजनेअंतर्गत काय कंडीशन आहेत याचे उत्तर सांगा.

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. त्याच्यामध्ये त्याचे उत्पन्न हे ३ लक्षापेक्षा कमी पाहिजे आहे. त्यामध्ये जे कागदपत्रे लागतात ते राशनकार्ड, बीपीएल कार्ड, टॅक्स पावती, लाभार्थ्यांच्या स्व:ताच्या मालकीचे घर.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, लाभार्थ्यांना अनुदान राशी प्रदान करण्यात आलेली आहे. अनुदान राशीकरिता लाभार्थ्यांला स्व:तच्या मालकीची जमीन लागते काय? या अंतर्गत किती अर्ज आले.

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. हो, आपल्याकडे ८३०० अर्ज प्राप्त झाले होते. स्क्रुटनी केल्यानंतर २२२८ ला पात्र ठरले.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, जमीन असलेले २२२८ अर्ज प्राप्त झाले आहे. स्व:तच्या मालकीच्या प्लॉट आहे त्यांनी प्लिन्थ लेव्हलवर काम केल्यानंतर त्यांना अनुदान मिळणार होते. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत त्यांना तीन टप्प्यामध्ये अनुदान प्राप्त करवयाचे होते. पहिला टप्पा त्यांनी पार केला आहे काय?

कार्यकारी अभियंता,स्लम(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. याच्यामध्ये तीन टप्प्यामध्ये राशी मिळणार होती. पहिल्या टप्प्यामध्ये १ लक्ष रुपये जेव्हा त्यांचा प्लॉन सॅग्शन होतो.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, लाभार्थ्यांचा प्लॉन सॅग्शन होतो काय?

श्रीमती नंदा जिचकार:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, केंद्र सरकारकडून आलेले पैसे राज्य सरकारमार्फत येतात ते केंद्र शासनाचे पैसे असतात ते राज्य सरकारकडून आलेले आहे असे स्पष्टीकरण अधिका-यांनी दयावे.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, एक वक्तव्य मनोज सांगोळे यांनी केले होते की पंतप्रधानांनी पैसे पाठविले नाही. त्या अनुदान राशी करिता लाभार्थ्यांना ज्या काही गोष्टीची परिपुर्तता करावयाची होती त्या परिपुर्तता न झाल्यामुळे तो पैसा येवू शकला नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, पंतप्रधान आवास योजना नागरिकांकरिता लाभदायी योजना होती. आता जो प्रश्न विचारला आहे तो घटक ४ अंतर्गत प्रश्न विचारलेला आहे. लाभार्थ्यांची जागा त्याच्या मालकीची आहे आणि अनुदान राशी पाहिजे आहे. त्या

अंतर्गत महानगरपालिकेने शासनाला कधी प्रस्ताव पाठविला असा माझा साधा प्रश्न आहे.

महापौर:- या प्रश्नाचे उत्तर चव्हाण मॅडमने दिले आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, पंतप्रधान आवास योजना कधी डिक्लेर केली होती. आणि ऑगस्ट २०२१ ला शासनाला प्रस्ताव पाठविता तर मग नागरिकांचे आवेदन कधी स्विकारता. याची स्क्रुटनी कधी करण्यात आली. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत अनुदान देण्याचे जेव्हा केंद्र सरकारने जाहीर केले तर प्रशासन काय करीत होती आतापर्यंत झोपलेली होती काय? अद्यापपावेतो अनुदान राशी मंजूर झाली नाही असे म्हणतात. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घटक ३ चा प्रस्ताव ऑगस्ट २०२१ ला प्रस्ताव पाठवित असाल तर चुक कुणाची आहे. नागरिकांना घर कसे मिळणार आहे. घटक ३ मध्ये महानगरपालिकेच्या जागेवर घरे बांधून देण्याचा तो प्रस्ताव होता.

महापौर:- मा.आयुक्तांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौर, सन्माननीय सदन. सन्माननीय घोडेस्वार यांनी जो प्रश्न विचारला आहे. घटक ३ चा प्रस्ताव तुम्ही ऑगस्ट २०२१ मध्ये पाठविले. एक चुक झाली आहे मी सभागृहासमोर रिक्वेस्ट करतो. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ४ घटक आहेत. पहिला घटकामध्ये एसआरए स्कीम आहे. घटक २ मध्ये बॅकेमधून लोन उचलतो. घटक ३ मध्ये अफोर्टटेबल हाऊसिंग आहे. ज्या ठिकाणी लॅन्ड प्राप्त होते त्या ठिकाणी प्रस्ताव बनवितो त्याच्या अनुषंगाने काम करतो. घटक ४ आहे त्याच्यामध्ये स्व:ताच्या मालकीची जमीन असेल तर त्या व्यक्तीने स्व:त त्याला जसे घर बांधावयाचे आहे तो घर बांधू शकतो. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत तो पात्र असेल तर त्याला केंद्र सरकारकडून आणि राज्य सरकारकडून २.५० लक्ष रुपयाचे अनुदान मिळते. घटक ३ चे कां केले नाही तर हा मुद्दा आपण थोडा समजून घेतला पाहिजे. महत्वाचा मुद्दा आहे लॅन्ड, या शहरात एडी मार्फत ऑलरेडी मोठमोठया स्किम बनविल्या परंतु अद्याप लोकांना मिळाल्या नाहीत. या स्किमची हेडलाईनच आहे, परवडणारी घरे, परवडणारी घरे उपलबध करुन द्यावयाची आहेत तर लोकांना ख-या अर्थाने कमीत कमी पैश्यात लोकांना घर उपलब्ध करुन द्यायला पाहिजे. हा उद्देश ठेवून महानगरपालिकेने आपल्या मालकीच्या असलेल्या जमीनीचा शोध घेवून त्यामध्ये सर्वात महत्वाचा निर्णय या सभागृहातून घेवून शासनाच्या जीआरप्रमाणे आतापर्यंत आपण आपल्या मालकीच्या जागेवर त्याची व्हॅल्यू सुध्दा स्व:त आकारायची, या सभागृहाने जुलै महिन्याच्या बैठकीमध्ये परवानगी प्राप्त करुन दिली, १ रुपये नाममात्र दरामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी आपण पाठविले त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब झाला असे नाही आहे. अशा धर्तीवर करणारी महानगरपालिका महाराष्ट्रामध्ये आपलीच महानगरपालिका असावी. यामध्ये आपण येणा-या काळामध्ये ४००-५००लोकांना घरे उपलब्ध करुन देणार आहे. एका मुद्दा मी सर्वांच्या निदर्शनास आणून देवू इच्छितो, सर्वात महत्वाचे म्हणजे पैश्याची कुठलीही अडचण नाही, केंद्राचा असो किंवा राज्याचा असो. आपल्याला जेथे जेथे आवश्यकता आहे तेथे तेथे त्या पध्दतीने उपलब्ध करुन देत आहे. आपल्याला ख-या अर्थाने फिल्ड वर काय अडचणी आहेत ते सभागृहामध्ये चर्चा केल्या आणि काही पॉलिसी इश्युमध्ये काही अडचणी असतील तर चर्चा करुन मार्गी

काढून आणखी त्याच्यामध्ये गती आणता येईल असे मला वाटते. सर्वात महत्वाचे बेनिफिशरी स्ट्रक्चरमध्ये स्व:ताच्या मालकीची जमीन असली पाहिजे. आपल्या येथे ६ डीपीआरचे प्रस्ताव बनविले. निधीच्या संदर्भात काही अडचण नाही असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो, पाच वर्षापासून सिस्टीम चालू आहे, सिस्टीम वेलडिफाईन्ड आहे. डीपीआर बनविल्या गेल्यानंतर त्यामध्ये स्क्रुटनी होते. त्यानंतर स्टेट कमेटीकडून त्याला मान्यता प्राप्त होते. त्याच्यानंतर शासनाकडून शिफारस केल्यानंतर केंद्र सरकारच्या मिनीस्ट्रर ऑफ अर्बन हॉऊसिंगमध्ये त्याची मंजुरी होते. मंजुरी मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्यानंतर जशी केस प्रगत होते त्याप्रमाणे होते. मात्र यामध्ये अपेक्षेप्रमाणे कां प्रगती होत नाही. त्याला सर्वांनी समजून घेण्याचे अत्यंत महत्वाचे आहे. आपल्या शहरात सर्वात महत्वाचे दोन प्राधिकारीणी आहेत. एक एनएमसी आहे आणि दुसरी एनआयटी आहे. आपल्या प्रोजेक्ट मध्ये काही ठिकाणी एनआयटीचा सुध्दा प्रोजेक्ट आहे.सर्वात महत्वाचा मुद्दा आहे जमीन मालकीचा, जमीनीची मालकी असायला पाहिजे. मालकी आपण असे गृहीत धरतो की ज्यावेळेला त्या व्यक्तीचे नाव आखीवपत्रिकेवर उपलब्ध असेल तेव्हा त्याला मंजुरी करिता टाऊन प्लॉनिंगमध्ये स्विकारतो. आपले दुर्दैव असे आहे की त्या काळामध्ये दोन-तीन प्रस्ताव गेले होते. लोकांची मागणी भरपूर होती म्हणून त्यांच्याकडील रजिस्ट्री गृहीत धरुन पाठविले होते. ज्या लोकांकडे रजिस्ट्री होती त्यांनी त्यांचे नाव चढवून घेतील आपली परवानगी मिळेपर्यंत परंतु दुर्दैवाने ज्या व्यक्तीकडे रजिस्ट्री होती त्यांनी सीटी सर्वे कडे जावूनआखीवपत्रिकेवर नाव चढवुन घेण्याची जबाबदारी त्यांची होती. परंतु आपल्याकडे लॅन्ड कॉम्प्लॅसिटी आहे, आरएल मिळविणे त्याच्यामध्ये अद्यापपर्यंत ब-याच लोकांचे नाव आखीवपत्रिकेवर नाही आहे. त्या करिता आम्ही आता कॅम्प मोडमध्ये जे ११३, ५१० लोक आहेत त्या लोकांशी संपर्क साधून, त्यांना बोलावून त्यांच्याकडे प्रापर रजिस्ट्री आहे त्यांना सीटी सर्वे सोबत त्यांना बसवुन घेवून आखीवपत्रिकेवर त्यांचे नाव चढविणे हे अत्यंत महत्वाचे आहे. जोपर्यंत हे करीत नाही तोपर्यंत राज्य सरकार किती पैसे दिले तरी किंवा केंद्र सरकार किती पैसे दिले तरी खर्च करता येणार नाही. ती सर्वांत पहिली समस्या आपल्याला दूर करायला पाहिजे. या ठिकाणी मी सगळया नगरसेवकांना विनंती करेल आणि एनपीपी सेल ला सुध्दा विनंती करेल की आपल्याकडे जी मंजूर घटकांची यादी आहे. नगरसेवकांना झोनमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी. प्रत्येक नगरसेवकांनी त्यांचे जे जे पात्र लाभार्थी आहेत ज्या लाभार्थ्यांना राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. त्या लाभार्थ्यांचे नाव आखीवपत्रिकेमध्ये लवकरात लवकर येतील याकरिता मदत करावी ती सर्वांत महत्वाची मदत होईल असे मला वाटते. काही ठिकाणी लाभार्थ्यांची छोटी जागा आहे त्यामुळे त्यांना टीपीकडून मंजुरी देतांना अडचण येत आहे. साईड मार्जिन आणि बॅक मार्जिन मंजूर करायला अधिकार प्राप्त नाही. फ्रन्ट मार्जिन सोडायला आपल्याला कुठल्याही प्रकारचे रिलायशेशन नाही. त्यामुळे याकरिता आमचा राज्य सरकारकडे पाठपुरावा चालू आहे. आपल्या सगळयांनी मिळून सभागृहात सुध्दा रिलायशेशनकरिता अशा पध्दतीचा ठराव पारित करुन आपण राज्य शासनाला पाठवू शकतो. हा प्रॅक्टीकल मुद्दा आहे. आपण लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यामध्ये १ लक्ष रुपयाची मंजुरी मिळवून देतो. ग्रामीण भागामध्ये प्लिन्थ लेव्हलवर बांधकाम आले तर पैसे मिळतात.

परंतु शहरी भागामध्ये पहिली कंडीशन आहे त्याचे बिल्डींग प्लॉन सॅग्शन राहिला पाहिजे, प्लॅन सॅग्शन होतांना आपण डिमांड जनरेट करुन देतो. आपल्याला कुठल्याही प्रकारचे डिमांड गीव्ह अप करण्याची तरतूद दिलेली नाही. खुप ठिकाणी लोक डिमांड भरण्यास तयार राहत नाही. त्यामुळे त्यांना दिले गेलेले फॉरमेट सुध्दा पुर्ण होत नाही. याकरिता सुध्दा आपण शासनाकडे विनंती करु शकतो. या विषयावर सेक्रेटरी साहेबांसोबत सुध्दा माझे बोलणे झाले आहे. आपण १ लाख रुपये देतो पंरतु त्यांची डिमांड ३० हजारापासून ७५ हजारापर्यंत डिमांड असेल तर त्याच्यामधून समायोजन करुन देता येते काय? आाणखी त्यांचा पुढचा हप्ता रिलीज होण्यामध्ये मदत होवू शकते. सिस्टीम बेसिसवर या ठिकाणी सभागृहामध्ये चर्चा करुन, ठराव स्वरुपात किंवा विनंती स्वरुपात पाठवू या. आपल्याला लोकांना जेथे जेथे मंजुरी झालेली आहे अशा ठिकाणी मिळू शकतो. असे मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो. धन्यवाद.

महापौर:- मुल प्रश्न सभागृह मे आया था उस मुल प्रश्न के उपर चर्चा करे तो जादा उचित है l उसके अनुरुप प्रशासन ने बताया है की टेक्नीकल किन अडचणो के कारण शहर के नागरिकोंको इसमे निवेदन करते समय तकलिफे हो रही है l शहर मे प्लॉट की लंबाई और चौढाई के क्षेत्रफल कम होने के कारण नियमावली के अंतर्गत डी.सी. रुल के अंतर्गत उलब्ध ऐरिया ना होने के कारण वारंवार नागरिकोकों तकलिफ हो रही है l इस दृष्टी से मा.आयुक्त महोदय को अतिरिक्त अधिकार मिले तो यह सारी चिजे हो सकती है l इस प्रश्न के माध्यम से प्रशासन को निर्देश दिये जाते है की आनेवाले सभागृह मे इसमे किस किस प्रकार की सुविधाये नागरिकोकों देने के दृष्टीसे प्रशासनिक तौर पर कौन कौन से नियमो मे सुधार करने आवश्यक है उस प्रकार का एक रितसर प्रस्ताव बनाकर के नियमांतर्गत एजेंडापर अगले सभागृह मे लाया जाये इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है l

**<u>प्रश्न क्र. २७९</u>**:- मौजा नारी ख.क्र. १०९,११०/१ नगर भुमापन क्र. ६२ (पी.के. पार्ककरिता) संदर्भात प्रश्न

श्री.मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, मुझे जो विभाग व्दारा उत्तर दिये गये है, उससे मैं सहमत नही हुॅ, आरोग्य विभाग जो दवाखानो का काम देखता है, उनकी तरफ से यह उत्तर आना चाहिये था, अगर उन्होने सही रुप से उत्तर दिये रहते तो मुझे समाधान हुआ रहता, इससे पहले भी मैंने इस मुद्ये पर दवाखानो के बारे मे सभागृह मे प्रश्न किया था, तत्कालीन महाराष्ट्राचे आरोग्य सेवा संचालक, आयुक्त, श्री संजीव कुमार इन्होने महानगरपालिका को १८ सप्टेंबर २०१७ को एक लेटर भेजा था और उन्होने उस लेटर मे बोला था कि, नागपूर शहर मे सामुदायिक नागरी आरोग्य केंद्र नये बनाना है और उसका प्रस्ताव आपने भेजना चाहिये l तत्कालीन निगम आयुक्त, श्री मुदगल साहब उन्होने जगह देखी और तीन जगह प्रस्तावित करने के लिये संबंधित अधिकारी को आदेश दिये, एक थी, नारी सामुदायिक नागरी आरोग्य केंद्र उसको निधी ४ करोड ८९ लाख ६९ हजार ५७० रुपये दी, दुसरा मिनीमाता नगर सामुदायिक नागरी आरोग्य सेवा केंद्र उसके लिये ६ करोड ९१ लाख ११ हजार ९४२ रुपये का प्रस्ताव

बनाया गया था, उसके मंजूरी के लिये शासन को तत्कालीन आयुक्त इन्होने २६.१०.१८ को पत्र भेजा था, हमारा यह प्रस्ताव मंजूर है, देवडिया सुतीकागृह का और दो प्रस्तावित है, देवडिया का मंजूर हो गया था, वहां पार्किंग की व्यवस्था है, नही है, यह बात मुझे मालुम नही है। दुसरी बात चिखली की पेपर मे न्युज आयी थी कि मिनीमाता नगर मे बनेगा, ३० बेड का अस्पताल और उसकी लागत रहेगी, ८.५० लाख रुपये और यह नारी का कहां गायब हुआ यह पता नही चला, २०१७ से सक्षम अधिकारी, नेता, अभिनेता और मेरे जैसे नगरसेवक मेरे एरीया के नागरिको को फायदा होना चाहिये, इसलिये ऐसे प्रस्ताव मे प्रस्तावित करता हुँ, मेरे पास मे १५-२० लेटर है, और जितने लेटर मैंने एनआयटी को दिये है, उसकी यादी भी है, जब नागपूर महानगरपालिका मे एनआयटी मर्ज थी, पुरा शहर नागपूर महानगरपालिका मे था, वह किस कारण की वजह से नही बनाया गया, वह विषय मंजूर है, प्रस्ताव बनाया गया, फायर विभाग ने भी उसको ना हरकत प्रमाण पत्र दिया है, स्थावर विभाग ने भी उसको मंजूरी प्रदान की है। क्या कारण है कि, वह प्रस्ताव अभी तक नही हुआ है, सभी लोगो ने वह जगह देखे है, मुंढे साहब को छोडकर अगर वह अस्पताल बना रहता तो कई लोगो की जान बचाने मे महानगरपालिका ने महत्वपुर्ण भुमिका निभाई रहती। गोर-गरीब जनता के लिये अस्पताल बनाना मुर्खता है क्या ? रोड बनाना मुर्खता है क्या ? हमारे शहर मे रोड बनाने के लिये मशहुर लोग रहते है, चाहे वह आमदार रहे, खासदार रहे, नगरसेवक रहे, प्रशासन का ऐसा कहना है कि, वह दवाखाना नही बनसकता, वहां रस्ता नही है, लोगो की बस्ती नही है, वहां पर १२९२ घर डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाल्मिकी योजना के अंतर्गत बनाये गये है, उसी जगह पर एसआरए के अंतर्गत बिल्डींग बनकर तयार है, वांजरी और नारी मे जो क्वार्टर बने है लोगो को देने के लिये जो रेल्वे लाईन के पास मे रहते है वहां से बडा रोड निकल रहा है ६० फिट का रोड वह बिल्डींग बनाते वक्त बना था, उस समय १ करोड १८ लाख रुपये एनआयटी ने मंजूर किया था, डीपीआर देने के लिये लोगो को बोला जाता था कि हमारे पास मे पैसे नही है। उसके बाद मे क्या हुआ नही मालुम वहां पर कम से कम ४०० एकर जमिन होंगी, वहां पर अग्रवाल नाम का बिल्डर है, वहां पर बडी इमारत खडी की गयी है लैकिन अभी तक उनको टॅक्स नही लगाया गया है, एनआयटी से किसी भी प्रकार की अनुमती नही ली गयी है।

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.मनोज चाफलेः- मा.महापौरजी, या अनुषंगाने देवडिया दवाखाना त्यावेळी प्रस्तावित होता आणि आपण प्रस्ताव पाठविला होता. एनयुएचएमच्या अंतर्गत १३ करोडच्या जवळ जवळ आपण प्रस्ताव पाठविला होता. त्याची सुध्दा कुठेच हालचाल दिसत नाही. अधिकारी सुध्दा याच्याबद्दल उत्तर देतात की नाही. मागे आपण याच्या बद्दल पाठपुरावा केला तेव्हा नानीचा दवाखाना आणि देवडिया दवाखाना आणि डेप्युटी सिंग्नल असे तीन दवाखान्याचा प्रस्ताव मी आरोग्य समितीचा सभापती असतांना पाठविला होते. त्यामध्ये एकच दवाखान्याला मंजूरी मिळालेली आहे बाकी दोन दवाखान्याला मंजूरी मिळालेली नाही. प्रशासनाला वारंवारं फॉलोअप केल्यानंतर त्यांच्याकडून कुठल्याच प्रकारचे

उत्तर मिळालेले नाही. त्याबद्दल सुध्दा प्रशासनाने माहिती दयावी असे मी आपल्याला विनंती करतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

(बेल)

उप संचालक, नगररचना( श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्य श्री. मनोज सांगोळे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. माझे मते त्यांनी असा प्रश्न विचारला आहेकी मौजा नारी मध्ये जेआरक्षण आहे ते आरक्षण तेथुन काढून एमएम २९ मध्ये जे आरक्षण आहे तेथे प्रस्तावित करायचे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की सदर क्षेत्र हे नागपूर शहरातील विकास योजनेतील ७ योजनेअंतर्गत येते. सदर क्षेत्राकरिता नियोजन प्राधिकरण हे नासुप्र आहे. त्यामुळे तेथील आरक्षण निश्चित करण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी कार्यवाही नासुप्र मार्फत होणे हे कायदेशिर आहे.

श्री. मनोज सांगोळे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, मी विनंती करतो की २०१६ मध्ये ते अधिकार महानगरपालिकेकडे होते. त्यावेळी तत्कालीन आयुक्त मुदगल साहेब होते एनआयटीचे सभापती आणि आमचे चेअरमन होते कुकरेजा साहेब होते. त्यावेळी त्यांनी ३७ ची कार्यवाही करण्यात यावी असे महटले होते. त्याच्या पुढे काहीही झालेले नाही. या जागेवर जे प्रस्तावित आहे ते मंजुर आहे. काही परवानगी घेण्याची काही आवश्यकता नाही.

महापौर:- एनआयटीने ३७ की कार्यवाही के लिए महानगरपालिका के पास नियोजन प्राधिकरण करके प्रस्ताव भेजा है क्या? इसका उल्लेख सन्माननीय सदस्य ने किया इसका उत्तर दिजीये।

उप संचालक, नगररचना(श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. सदर प्रस्ताव एनआयटी तर्फे अद्याप अप्राप्त आहे.

श्री. मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, नागपुर सुधार प्रन्यासकडे तो प्रस्ताव होता. ती जागा त्यावेळी मंजुर केली नव्हती परंतु जी प्रस्तावित जागा होती मौजा नारी १०९/१०८ हा खसरा क्रमांक होता आणि हे संपुर्ण प्रस्ताव मंजूर आहे हे विभागाला विचारण्यात यावे.

महापौर:- खसरा क्रमांक १०९/११० मध्ये हॉस्पीटल प्रस्तावित आहे.आणि याच्यामध्ये हॉस्पीटलचे रिझर्वेशन दाखविले आहे काय? प्रशासनाने याचे उत्तर दयावे.

उप संचालक, नगररचना( श्री.हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. मौजा नारी खसरा क्रमांक १०९/११० भागमध्ये एम एन-१३ मध्ये डिपेन्सरीचे आरक्षण दाखविलेले आहे. मौजा नारी मध्ये खसरा क्रमांक ९७ भाग,९८ भाग, ९३ भाग व ९६/ १ भाग यामध्ये एमएन-२९ म्हणून **पाथचे** आरक्षणचे मंजूर केलेले आहे आणि विकास योजनेत दर्शविण्यात आलेले आहे.

महापौर:- ज्या ठिकाणी हॉस्पीटलचे आरक्षण दाखविले आहे त्याच ठिकाणी आपला प्रस्ताव मंजूर केलेला आहे काय? प्रशासनाला कोणत्या जागेसाठी निधी प्राप्त आहे. फक्त नारी च्या बाबत माहिती देण्यात यावी.

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- मा.महापौरजी, आपल्याला नारी खसरा क्रमांक १०९, ११० मध्ये डिस्पेन्सरी करिता तेथे जागा आहे. त्यासाठी आपल्याला निधी उपलब्ध आहे.

परंतु त्या जागेमध्ये असा प्राब्लेम आहे की त्या जागेमध्ये अप्रोच रोड नाही आहे. त्या दवाखान्यापर्यंत जाण्यासाठी रस्ताच नाही आहे. त्यामुळे सध्या ते बांधकाम आपण स्थगित ठेवलेले आहे.

महापौर:- ही जागा प्रस्तावित कुणी केली होती.

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- मा.महापौरजी, हा प्रस्ताव आमच्याकडे आरोग्य विभागाकडून आला होता.

महापौर:-आरोगय विभागाकडून प्रसताव आला तेव्हा त्या ठिकाणी रस्ता होता काय? त्या ठिकाणी रस्ता नव्हता तर प्रस्ताव कसा काय तयार करण्यात आला.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, मी या ठिकाणी एक मुद्दा लक्षात आणून देवू इच्छितो, याच्यामध्ये संबंधित १८ मीटरचा रस्ता डीपीमध्ये दाखविण्यात आला होता. त्या रस्त्याचा टीडीआर करुन उपलब्ध करुन देण्याचे काम प्लॅनिंग ॲथारिटी म्हणून एनआयटीकडे आहे. त्यामुळे डीपीमध्ये जे काही प्लॉट दर्शविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे आपली डिस्पेन्सरी त्याच ठिकाणी व्हायला पाहिजे. सांगोळेचे म्हणणे आहे की त्या प्लॉटला रस्ता नसल्यामुळे त्या ठिकाणाहून काढून तुम्ही पार्थच्या प्लॉटवर करा. त्यामध्ये दोन मुद्दे आहेत. फक्त पहिला मुद्दा, एनआयटीने हे काम करायला पाहिजे आणि दुसरे, पार्थमध्ये भरपूर कोर्टाचे रिस्टीक्शन आहेत. त्यामुळे ते इतक्या काही लवकर होणार नाही. महत्वाचे असे की यामध्ये पैसे उपलबध झालेले आहेत.आपल्या मालकीचा प्लॉट आहे आपणच पैसे देवून संपादित करुन घेतलेला आहे. डिस्पेन्सरीचा प्लॉट आपल्याकडे आहे त्यासाइी पैसे उपलब्ध झालेले आहे. फक्त अप्रोच रोड नाही, अप्रोच रोड डीपीमध्ये दर्शविण्यात आलेला आहे. याच्यासंदर्भात एनआयटीला आपण पत्रव्यवहार केलेला आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे तो जो बिल्डर आहे तो रस्ता देण्यासाठी तयार आहे. युनीआयपीडीआय संपादन करण्यासाठी आपण पाठपुरावा करुया. जागा बदलणे संयुक्तिक राहणार नाही असे प्रशासनाचे मत आहे. धन्यवाद.

श्री. मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब आणि मा.सभापती साहेब हे दोन्ही व्यक्ती आणि नगर रचना विभागाचे अधिकरी हे आले होते. एसआरएची जागा आहे त्या मार्गावरुनच सगळी वाहतुक चालत होती. परंतु तिथला मधला जो बिल्डर आहे त्यांनी पुर्ण रस्ता बंद केला नाहीतर पुर्ण रस्ता सुरु होता.

महापौर:- प्रशासन उत्तर दे की महानगरपालिका ने यह जो प्रस्ताव बनाके भेजा था उससमय यह सारी चीजों की ओर महानगरपालिकाने ध्यान दिया था की नही जिसको लेकर आज काम रोका जा रहा है। प्रशासन उत्तर दे।

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, या ठिकाणी परत सभागृहाच्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, या ठिकाणी डीपी मध्ये वेगवेगळे आरक्षण दाखविलेले आहे. याच्यामध्ये महत्वाचे आरक्षण डिस्पेन्सरीचे आहे. डिस्पेन्सरीकरिता त्याचा टीडीआर प्राप्त करुन त्याची मालकी प्रापर्टी कार्डमध्ये महानगरपालिकेचे नाव आलेले आहे. पाठोपाठ त्याच्या बाजूला जो रस्ता दाखविण्यात आलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे अर्बन सिटीचा लॅन्ड आहे आणि एनआयटीच्या प्लॅनिंग

ॲथारिटीकडे आहे. दोनच वर्ष आपल्याकडे प्लॅनिंग ॲथारिटीचे काम उपलब्ध होते. याच्या आधीही एनआयटीकडे होते आणि आजही एनआयटीकडे आहे. आपण याच्यामध्ये जसे पाठपुरावा करुन डिस्पेन्सरी जागा आपल्या ताब्यात करुन घेतलेली आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यक्रम करायला पाहिजे. ज्यावेळी प्रस्ताव पाठवितो आणि डीपीमध्ये रस्ता दर्शविण्यात आलेला आहे त्यामुळे जो काही प्रस्ताव पाठविला आहे तो काही चुकीचा नाही आहे. डीपीच्या आधारे प्रस्ताव पाठवितो. रस्ता नसतांना पाठविणे हे चुकीचे आहे. डीपीमध्ये प्रापर १८ मीटरचा रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. फक्त त्याची संपादनची ॲक्टीव्हिटी राहिलेली आहे. त्याचा पाठपुरावा करणे उचित राहिल असे मला वाटते.

महापौर:- प्रशासनाला या बांधकामासाठी पैसे प्राप्त आहे काय?

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- मा.महापौरजी, हो , या बांधकामासाठी ७३.७३ कोटी प्राप्त आहे.

महापौर:- हे तिजोरीमध्ये ठेवण्यासाठी आहे की बांधकामासाठी आहे. बांधकामासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केला.

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- मा.महापौरजी, जागा नसल्यामुळे आपण सध्या बांधकाम केलेले नाही.

महापौर:- हीच जागा दाखवून आपण पैसे आणले आहात काय?

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- हो मा.महापौरजी,

महापौर:- त्या जागेवर हॉस्पीटल कां करीत नाही. हा पैसा परत पाठवायचा आहे काय? आपण काम करु शकत नाही म्हणून शासनाला पैसे परत पाठवायचे आहेत काय?

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- मा.महापौरजी, तेथला ॲप्रोच रोडचा जर प्रश्न सुटत असेल तर आपल्याला ते बांधकाम सुरु करता येईल.

महापौर:- मला स्पेसिफिक उत्तर पाहिजे आहे. जर डीपी मध्ये रस्ता दाखविलेला आहे तर या जागेला मंजुरी मिळणार आहे किंवा नाही? डीपीचे आरक्षणामध्ये रस्ता आहे तर या जागेवर बांधकामाला अनुमती मिळणार आहे किंवा नाही मिळणार ?

श्रीमती सोनाली चव्हाण(कार्यकारी अभियंता,प्रोजेक्ट):- मा.महापौरजी, आपल्याला बांधकाम करता येईल.

महापौर:- मग कां थांबलेले आहे.

निगम आयुक्त:- एडीटीपीने सांगावे की प्रत्यक्ष जागेवर रस्ता नाही आहे फक्त डीपीमध्ये दर्शविण्यात आलेले आहे तर मग या केसमध्ये त्या ठिकाणी मंजूरी देवू शकतो काय?

महापौर:- एडीटीपीने उत्तर दयावे.

उप संचालक, नगररचना( श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. हॉस्पीटलकरिता किमान १२ मीटरचा रोड असणे आवश्यक आहे. अप्रोच रस्ता जर जागेवर उपलब्ध नसेल तर त्या जागेवर इमारत बांधकाम परवानगी देणे तत्पुर्वी शक्य होत नाही.

महापौर:- जर रस्ता उपलबध नाही तर डीपीमध्ये कसा काय दाखविण्यात आला. डीपी चुकीचा बनलेला आहे काय?

उप संचालक, नगररचना(श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. डीपीमध्ये रस्ताही दाखविलेला आहे आणि आरक्षणही दाखविलेले आहे.

महापौर:- मग अडचण काय आहे.

उप संचालक, नगररचना(श्री.हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. डीपीमध्ये एमएम-१३ डिस्पेन्सरीचे आरक्षण दाखविलेले आहे आणि त्याकरिता डीपी मध्ये डीपी रोड महणून दाखविलेले आहे. डीपीमध्ये नासुप्रकडे आरोग्य विभागासाठी स्वतंत्र विभाग नसल्यामुळे ती जागा महानगरपालिकेने स्व:ताच्या नावावर केलेली आहे. आता मात्र तेथे आजूबाजूला १२ मीटर, २४ मीटरचे रस्ते आहेत. जरी डीपीमध्ये दर्शविलेले असले तरी एडीटीपीच्या अनुषंगाने डीपी प्रस्तावित रस्त्यावरुन इमारत बांधकामाची परवानगी देवू शकत नाही. रस्ता जागेवर असणे आवश्यक आहे. हा रस्ता नियोजन प्राधिकारण म्हणून नासुप्र च्या कार्यक्षेत्रात असल्यामुळे नासुप्रला कळविले आहे. हा रस्ता तुमच्या स्तरावर संपादित करा आणि बांधकामाचे काम तुम्ही करा. याच्यामध्ये एवढेच झाले की जे डिस्पेन्सरीचे आरक्षण आहे ते आपण आधी संपादित केलेले आहे. परंतु असे काही नसते रस्ते नासुप्रने हसतांतरीत केले त्यानंतर इमारत बांधकाम परवानगी देता येवू शकते.

महापौर:- अधिका-यांनी दिलेल्या उत्तरावरुन असे लक्षात येत आहे की जागा जी आपण टी.डी.आर. देऊन हस्तगत केली, ती प्रोसेस चुकीची केलेली आहे असे आपल्या उत्तरामधुन दिसुन येत आहे. शासनाकडुन आपण जे पैसे मागितले ते चुकीच्या पध्दतीने उपयोगिता दाखवुन मागण्यात आलेले आहे. जर शासनाच्या पैशाचा दुरुपयोग करण्यासाठी आपण मागितले आहेत तर संबंधित अधिका-यांनी चौकशी न करता याचा प्रस्ताव पाठविला त्याच्यावर अनुशासनात्मक कारवाई करण्याचा सभागृहाच्या माध्यमातून प्रशासनाला निर्देश देण्यात येत आहे. आणि जेथे जागा उपलब्ध असेल तेथे बांधकाम करण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर पुढचे पाऊल उचलावे असे सुध्दा निर्देश देण्यात येत आहे..

उप संचालक, नगररचना(श्री.हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. हा विषय मागे आला होता की या जागेवर पॅरलल ऑब्शनल जागा सजेस्ट करावी म्हणून, त्याकरिता आम्ही प्रकल्प विभागाला एमएम-१६ मौजा नारी मधील आरक्षण क्रमांक एमएम-१६ हॉस्पीटलकरिता सजेस्ट केलेली आहे त्याला अप्रोच रोड आहे. त्या ठिकाणी हॉस्पीटलचे काम करता येवू शकेल.

महापौर:- प्रशासनामध्ये सामजस्य नाही तर याचा भुर्दंड नागरिकांनी का भोगावे, जे कोणी यासाठी दोषी असेल त्यांच्यावर अनुशासनात्मक कारवाई करण्यात यावी आणि जी आपण पर्यायी जागा सांगितली आहे त्याबद्यल आपण ताबडतोब एन.आय.टी. मध्ये जाऊन कारवाई करण्यात यावी. प्रशासनाने वेळ सांगावी की कारवाई केव्हा पर्यत करण्यात येईल

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, आपण जे निर्देश दिलेले आहे ती बरोबर आहे परंतु आपण त्वरित कार्यवाही करावी. त्यामुळे या अधिका-यावर वचक राहील.

महापौर:- प्रशासन नियमाप्रमाणे चालले पाहिजे पदावर जो माणुस बसला आहे त्याची डयुटी लिस्ट डिफाईन आहे. कोणत्या नियमाप्रमाणे त्यांनी काम केले पाहिजे ते डी.सी. रुलमध्ये नमुद आहे. कोणता प्रस्ताव शासनाकडे पाठवित असतांना कोणकोणते कागदपत्रे आपण जमा करुन पाठविले पाहिजे हे सुध्दा नमुद आहे. जसा प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये गोंधळ होत आहे ते नाही झाले पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने पुर्ण कागदपत्रे तपासूनच कागदपत्रे पाठविले पाहिजे.आपण पाठविलेल्या कागदपत्राच्या आधारावर आपल्याला पैसे मिळालेले आहे त्याचे नियोजन निश्‍चित अवधीमध्ये झाले पाहिजे हे संबंधित अधिका-यांची जबाबदारी आहे आणि शासनाचा प्राप्त निधी जर खर्चित होत नसेल तर याचा दोषी कोण हे ठरविण्यासाठी प्रशासनाने निर्णय घेतला पाहिजे व संबंधित अधिका-यांवर ताबडतोब कारवाई करायला पाहिजे. आता आपण जो प्रस्ताव पाठविला आहे त्याप्रमाणे किती दिवसात आपण प्राप्त जागेवर बांधकाम करु शकतात ?

उप संचालक, नगररचना(श्री.हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.आयुक्त महोदय. जागा शिफट करण्याकरिता आम्ही पत्र दिलेले नाही. आरोग्य विभागाकडून एक पत्र आले होते त्यांनी त्यात महटले होते की, एमएम-१६ त्या आरक्षणकरिता काही ऑब्शनल जागा जवळपासच्या भागामध्ये.....

निगम आयुक्त:- अनवॉन्टेड गोष्टी येथे करु नका. नियमाप्रमाणे आपल्याला जायचे आहे. डीपी प्लॉनमध्ये डिस्पेन्सरी दाखविण्यात आलेली आहे आपण टीडीआर घेवून जागा संपादन केलेली आहे. पॅरलली त्या ठिकाणचा रस्ता पण बघितला पाहिजे. रस्ता झाला असता तर आपण परवानगी घेवून पुढे गेले असतो. रस्ता झाला नसल्यामुळे मा.महापौरजी यांनाही वाटते आणि संपुर्ण सभागृहाला वाटते की आपण जागा संपादीत करुन पैसे आणलेले आहे. परंतु अशा तांत्रिक कारणामुळे आपल्याला पुढे जाता आले नाही. त्याकरिता आपण लक्ष द्यायला पाहिजे. डीपीप्रामणे १८ मीटरचा रस्ता संपादीत होण्याकरिता त्याचा पाठपुरावा प्रशासनाच्या वतीने करायला पाहिजे. मधल्या काळामध्ये सभागृहाला वाटत असेल यामध्ये कुणी चुक केली असेल तर त्या मध्ये आपण जबाबदारी निश्‍चित करु.

महापौर:- अधिका-यांनी दिलेल्या उत्तरावरुन असे लक्षात येत आहे की जागा जी आपण टी.डी.आर. देऊन हस्तगत केली, ती प्रोसेस चुकीची केलेली आहे असे आपल्या उत्तरामधुन दिसुन येत आहे. शासनाकडुन आपण जे पैसे मागितले ते चुकीच्या पध्दतीने उपयोगिता दाखवुन मागण्यात आलेले आहे. जर शासनाच्या पैशाचा दुरुपयोग करण्यासाठी आपण मागितले आहेत तर संबंधित अधिका-यांनी चौकशी न करता याचा प्रस्ताव पाठविला त्याच्यावर अनुशासनात्मक कारवाई करण्याचा सभागृहाच्या माध्यमातून प्रशासनाला निर्देश देण्यात येत आहे. आणि जेथे जागा उपलब्ध असेल तेथे बांधकाम करण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर पुढचे पाऊल उचलावे असे सुध्दा निर्देश देण्यात येत आहे. प्रशासनामध्ये सामजस्य नाही तर याचा भुर्दंड नागरिकांनी का भोगावे, जे कोणी यासाठी दोषी असेल त्यांच्यावर अनुशासनात्मक कारवाई करण्यात यावी आणि जी आपण पर्यायी जागा सांगितली आहे त्याबद्यल आपण ताबडतोब एन.आय.टी. मध्ये जाऊन कारवाई करण्यात यावी. प्रशासनाने वेळ सांगावी की कारवाई केव्हा पर्यत करण्यात येईल. प्रशासन नियमाप्रमाणे चालले पाहिजे पदावर जो माणुस बसला

आहे त्याची डयुटी लिस्ट डिफाईन आहे. कोणत्या नियमाप्रमाणे त्यांनी काम केले पाहिजे ते डी.सी. रुलमध्ये नमुद आहे. कोणता प्रस्ताव शासनाकडे पाठवित असतांना कोणकोणते कागदपत्रे आपण जमा करुन पाठविले पाहिजे हे सुध्दा नमुद आहे. जसा प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये गोंधळ होत आहे ते नाही झाले पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने पुर्ण कागदपत्रे तपासूनच कागदपत्रे पाठविले पाहिजे.आपण पाठविलेल्या कागदपत्राच्या आधारावर आपल्याला पैसे मिळालेले आहे त्याचे नियोजन निश्चित अवधीमध्ये झाले पाहिजे हे संबंधित अधिका-यांची जबाबदारी आहे आणि शासनाचा प्राप्त निधी जर खर्चित होत नसेल तर याचा दोषी कोण हे ठरविण्यासाठी प्रशासनाने निर्णय घेतला पाहिजे व संबंधित अधिका-यांवर ताबडतोब कारवाई करायला पाहिजे. आता आपण जो प्रस्ताव पाठविला आहे त्याप्रमाणे किती दिवसात आपण प्राप्त जागेवर बांधकाम करु शकतात ? या विषयावर प्रशासनाच्या माध्यमातुन निवेदन होत असतांना असे दिसुन येते की जो पर्यत तेथे रस्ता होत नाही तो पर्यत त्या ठिकाणी बांधकाम होऊ शकत नाही. याचा अर्थ असा आहे की हे सभागृहाला माहिती होते की होऊ शकत नाही. तर सभागृहाने कसे काय टीडीआर देऊन प्लॉट आपल्या ताब्यात केला, प्रशासनाने ही चुक का केली, का टी.डी.आर. दिला, जे आज लक्षात येत आहे ते त्या दिवशी का लक्षात आले नाही. म्हणजे सामजंस्य नाही का डिपार्टमेंट मध्ये एकमेकांशी, हा प्रथमदृष्टीवाला विषय नाही. यामध्ये प्रशासनच सांगत आहे की रस्ता जागेवर नाही फक्त कागदावर आहे. जी गोष्ट कागदावर आहे त्या कागदाच्या आधारावर आपण टी.डी.आर. कसे काय देऊन दिले. कुठे गोंधळ आहे हा, हेतु पुरस्पर कोणाला मदत करण्यासाठी आपण टी.डी.आर. दिला आहे काय ? कोण जबाबदार आहे चुकीच्या निर्णयासाठी, प्रशासनाने ताबडतोब याची चौकशी करुन संबंधित दोषी अधिका-यांवर कारवाई करावी, आणि या पैशाचा वापर झाला पाहिजे म्हणुन त्या परिसरात जेथे कुठे जागा असेल त्या संदर्भात प्रस्ताव तयार करुन जर आवश्यकता भासत असेल तर शासनाकडुन जागा बदलण्याची अनुमती घेऊन ताबडतोब काम सुरु करण्यात यावे.

**प्रश्न क्र. २८०**:- नारा श्मशान घाटा जवळून वाहणारी पिवळी नदी संदर्भात प्रश्न

श्री. मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, नारा श्मशान घाटापासून पिवळी नदीपर्यंत जी नदी आहे. त्या नदीच्या किना-याने राहणारे लोक आहेत त्यांच्या जानमाल ला धोका निर्माण झालेला आहे. मला कार्यकारी अभियंता प्रकल्प यांनी जी माहिती दिलेली आहे त्याच्यावर मी समाधानी आहे. परंतु संबंधित झोनच्या अधिका-यांनी या नदीच्या किना-यावर राहणा-या लोकांना किती मीटरच्या आतमध्ये बांधकाम करावे. अशा धोकादायक ठिकाणी राहणा-या लोकांना किती नोटीस बजावल्या याची माहिती मिळाली नाही. महणून आपल्या माध्यमातून सभागृहात ही माहिती देण्यात यावी अशी विनंती करतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री विजय हुमणे(सहा.आयुक्त झोन क्र. १०):- मा.महापौरजी, झोन क्र. १० मंगळवारी झोनमध्ये ३०० नोटीस दिलेल्या आहेत.

निगम आयुक्त:- झोन क्र. ९ चे सहा.आयुक्त नवीन असल्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी उत्तर

दयावे.

(कार्यकारी अभियंता):- मा.महापौरजी, झोन क्र. ९ आसीनगरमध्ये प्रभाग क्र. २ मध्ये ४५, प्रभाग क्र. ३ मध्ये १७ अशा एकुण ६२ नोटीस दिलेल्या आहेत.

श्री.मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, मला जे उत्तर प्राप्त झाले आहे. नदी किना-यावर राहणा-या लोकांनी किती मीटरच्या आंतमध्ये बांधकाम केले पाहिजे. जर त्यांना त्या अनुसार बांधकाम केले नसेल तर त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री विजय हुमणे(सहा.आयुक्त झोन क्र. १०):- मा.महापौरजी, पिवळी नदीच्या शेजारी जे लोकांनी वास्तव्य केलेले आहे त्यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित आहे.

महापौर:- या सभागृहाच्या माध्यमातून प्रशासनाला दोनदा ताकीद देण्यात आली. पांडुरंग भवनकडे रिंगरोडपासून जो रस्ता जातो त्यावर ब्रीज बांधला आहे. नालाच्या काठावरील सर्व घर हटवून त्यांना एसआरए अंतर्गत त्यांना घर दिले होते. त्यांनी एसआरए मध्ये एक घर घेतले आणि दुसरे एक झोपडा पुन्हा येथे बांधला त्यांच्यावर कार्यवाही करायला पाहिजे होती. तीन महिने झाले काय कार्यवाही केली.

श्री विजय हुमणे(सहा.आयुक्त झोन क्र. १०):- मा.महापौरजी, मुख्यालयाने कळविल्यानंतर आम्ही कार्यवाही करु.

महापौर:- तुमचे महणणे असे आहे याच्यावर कार्यवाही झाली नाही याला मुख्यालय जबाबदार आहे. आवाज बरोबर येत नाही, आपली सिस्टीम बरोबर करावी. नियमानुसार त्याच्यामध्ये कार्यवाही करावी. झोन क्र. ९ ने सांगावे. किती घरावर कार्यवाही अपेक्षित आहे आणि आपण काय करीत आहात.

श्री. वासनिक(कार्यकारी अभियंता, आसीनगर झोन क्र. ९):- मा.महापौरजी, ही माहिती माझ्याकडे नाही आहे.

महापौर:- आपण नदीच्या काळावर रेड लाईन मार्किंग, ब्लयु लाईन मार्किंग, ग्रीन लाईन मार्किंग केली होती ते काम पुर्ण झाले आहे काय?

श्रीमती बॅनर्जी( कार्यकारी अभियंता):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. ब्ल्यु लाईन मार्किग और रेड लाईन मार्किंग हो गया है, एरीगेशन के तरफ तपासणे के लिए दिया गया है।

महापौर:- यह टेंडर कितने साल पहिले निकला था।

श्रीमती बॅनर्जी( कार्यकारी अभियंता):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. चार साल पहिले.

महापौर:- चार साल मे रेड लाईन मार्किंग, ब्लयु लाईन मार्किंग, ग्रीन लाईन मार्किंग पुरा नही कर सके।

श्रीमती बॅनर्जी( कार्यकारी अभियंता):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. मार्किंग हो गई , ड्राईंग हो गई, हमने दो बार एरीगेशन डिपार्टमेंट की ओर भेजा, उन्होने मुद्दे निकाल के वापस किया, उनको फिर से भेजा है।

महापौर:- नागरिकोंने बांधकाम करने के पहले वहा महानगरपालिका का बोर्ड लगा होना

चाहिये की यहा बांधकाम नही कर सकते यह क्षेत्र ब्लु लाईन मे आता है रेड लाईट मे आता है महानगरपालिका की जिम्मेदारी अगर महानगरपालिका निर्वाहन न करे और नागरिक वहा बांधकाम करे तो कहीना कही उनको हम गलत काम करने के लिये सहकार्य कर रहे है यह ऐस्टॅब्लीश होता है इसलिये अपनी जिम्मेदारी का निर्वाहन नागपूर महानगरपालिका ने करना चाहिये l पिली नदी मे जब जब बाढ आती है तब कोई ना कोई बहकर के जाता है और अंतिम उसकी जिम्मेदारी म.न.पा. प्रशासन की तय होती है और प्रशासन ने वह तुरंत सुधारणा चाहिये आयुक्त महोदय इसको सिरीअसली ले इस सप्ताह मे बैठक लेकर के इसका सोलुशन निकाले और अधिकृत प्रेस के माध्यम से घोषणा करे और प्रशासन के माध्यम से वहापर जो इंडीकेटर लगाना चाहिये वह लगाने के व्यवस्था करे l

**प्रश्न क्र.२८१**:- महानगरपालिकेतील विविध विभागातील कोविड -१९ ने मृत्यु झालेल्या कर्मचा-यांची संख्या व नावे संदर्भात प्रश्न

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, मी प्रश्न विचारला होता, महानगरपालिकेतील विविध विभागातील कोव्हीड -१९ ने मृत्यू पावलेल्या कर्मचा-यांची संख्या व नावे काय आहेत व त्याचप्रमाणे महानगरपालिकेत कार्यरत खाजगी कर्मचारी जसे आपली बस असेल, ए.जी. व बीव्हीजी कंपनी असेल किंवा तत्सम ऑऊटसोर्स कंपन्या असतील. यातील कोणते कर्मचारी कोरोनाने मृत्यू पावले त्यांचे हुद्दे काय आहेत त्यांना मदत दिलेली आहे काय? या प्रश्नाचे उत्तर देतांना महानगरपालिकेच्या विविध विभागातील ४३ कर्मचा-यांचा मृत्यू कोव्हीडने झाला असे उत्तर देण्यात आले. परंतु एजी, बीव्हीजी, आपली बस किंवा ओसीडब्लू असेल या कंपन्यातील कोणत्या कर्मचा-यांचा मृत्यू कोव्हीडने झाला, नाही झाला याचे उत्तर प्रशासनाने दिलेले नाही. त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे. हा प्रश्न मा.महापौर साहेबांनी अप्रुव्ह केल्यानंतर त्याची नेमकी प्रक्रिया काय आहे. कोणकोणत्या विभागाकडून माहिती मागितली जाते आणि त्याचे उत्तर कसे तयार केले जाते याची माहिती मिळाली तर बरे होईल.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री राम जोशी(अपर आयुक्त):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. सन्माननीय ॲड धर्मपालजी मेश्राम यांनी या प्रश्नासोबत असे विचारले की काय प्रोसेस अवलंबीली जाते. हा जेव्हा प्रश्न संबंधित नगरसेवकांकडून सचिवालयात येतो. त्यानंतर मा.महापौरजी यांच्याकडे जातो. त्या त्या विभागातून जे विभाग त्या प्रश्नाशी संबंधित आहे त्या विभागामार्फत माहिती प्राप्त करुन घेण्यात येते. बरेचसे असे प्रश्न असतात ज्याच्यामध्ये एकापेक्षा जास्त विभाग संलग्न असतात त्या विभागाच्या विभाग प्रमुखांना सुध्दा असे सांगण्यात येते की दुस-या विभागाकडून माहिती प्राप्त करुन मग देण्यात यावी.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, अशा परिस्थितीमध्ये ए.जी. आणि बीव्हीजी कंपनी, आपली बस अशा ज्या आऊटसोर्स ज्या कंपन्या आहेत. माझ्या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या प्रमुखांना

विचारले गेलेले नाही आहे काय?

महापौर:- प्रशासनाने निवेदन करावे.

अपर आयुक्त (श्री राम जोशी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. विभागाने जे उत्तर आपल्याला दिलेले आहे. त्याच्यामध्ये म्हटलेले आहे. महानगरपालिकेतील विविध विभागातील मृत्यू पावलेल्या एकुण ४३ कर्मचा-यांची यादी दिलेली आहे. परिवहन विभागातील हंसा सिटी बस मध्ये एक कर्मचारी मृत्यू पावलेले आहे. मनिष खंडारे त्यांचे नाव यादीमध्ये दिलेले आहे. ए.जी. कंपनीतील एक कर्मचा-याचा मृत्यू कोव्हीडमुळे झालेला आहे. त्याचे डिटेल्स् आपल्या उत्तरामध्ये आलेले नसेल त्याच्याबद्दल सर्व माहिती आमचे डीएमसी श्री.भगत यांनी प्राप्त केलेली आहे. कृपया त्यांचे नाव सभागृहात मांडावे असे डीएमसी यांना निर्देशित करतो.

उपायुक्त( श्री.भगत):- मा.महापौरजी, आपल्या घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत ए.जी. व बीव्हीजी अशा दोन कंपन्या गार्बेज कलेकशनचे काम करतात. यामध्ये बीव्हीजी कंपनीतील कोणत्याही कर्मचा-याचा मृत्यू कोव्हीडमुळे झालेला नाही आहे. ए.जी. कंपनी याच्यामध्ये एक कर्मचा-याचा मृत्यू कोव्हीडमुळे झालेला आहे त्याचे नाव आहे अश्विनी हिरवे, त्याच कंपनीचा एक कर्मचारी गुरु बारसागडे त्याचा मृत्यू झाला आहे परंतु त्याचा अपघात झाला होता, अपघात झालयानंतर त्याला ॲडमीट केले होते त्याचा मृत्यू अपघाताने झालेला आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, माझ्याकडे प्राप्त माहितीनुसार झोन क्र. १० मंगळवारी झोन मधील बीव्हीजी कंपनीचा एक कर्मचारी उमेश नरेश धुडके हा २०२१ ला कोरोनाने मृत्यू पावलेला आहे. माझ्याकडे प्राप्त माहितीनुसार, ही माहिती प्रशासनाने दिलेली नाही. आशिष शेंडे हा हा आपली बसचा कर्मचारी ४ एप्रिल २०२१ ला मृत्यू पावलेला आहे. आम्ही अत्यंत प्रकर्षाने जनसामान्याचे सोडविण्याकरिता या प्लॉटफार्मवर प्रश्न उपस्थित करतो. माझी आपल्याला विनंती आहे. प्रशासनाने चुकीची माहिती पुरविली किंवा माहिती ठेवली नाही. अशा परिस्थितीत प्रशासनावर काय कार्यवाही करण्याची नियमावली आहे किंवा काय कसे आपण कार्यवाहीचे आदेश देणार आहात.

महापौर:- निगम सचिवांना कुणी कामचुकार करुन उत्तर देत असाल तर या संदर्भात काय स्थापित नियम आहेत त्याचे वाचन करावे. कलम ७२ क काय म्हणजे ते तरी सांगा.

निगम सचिव(डॉ.रंजना लाडे):- मा.महापौरजी, मा.सदन (कलम ७२ क चे वाचन केले.)

महापौर:- धर्मपालजी कलम ७२ क मध्ये कार्यवाही प्रस्तावित आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, माझे फक्त एवढेच म्हणणे होते की, कोव्हीडच्या दरम्यान ज्या खाजगी आस्थापनेवरील जे त्यांचे कर्मचारी होते ते मरण पावले त्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेजच्या अंतर्गत ५० लक्ष रुपयाचे इन्श्युरन्स देण्यात आले पाहिजे होते अशा प्रकारची व्यवस्था आपण केली पाहिजे होती. जर महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे मी अधिकृत नियमानुसार प्रश्न लावल्यावर देखील कोणत्याही प्रकारचे प्रशासनाकडून प्रयत्न झालेला नाही जर प्रशासनाकडून असा प्रयत्न झालाच नाही तर त्यांना विम्याचे पैसे कसे मिळेल.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, कोव्हीडच्या लाटेच्या दरम्यान ११ एप्रिल २०२० रोजी राज्य शासनाच्या प्रधान सचिवचे पत्राद्वारे आपल्याला कळविण्यात आले. कोव्हीड-१९ विषाणू बाधित रुग्णांवर उपचार करणारे किंवा तपासणी करणारे सर्व प्रकारचे आरोग्य सेवा देणारे अधिकारी आणि कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत प्रथमत: ९० दिवसासाठी ५० लक्ष रुपये इतका रुपयाचा विमा कवच अनुज्ञेय करण्यात आला. या आधारे कोव्हीडमध्ये काम करणारे आरोग्य विभागाचे कर्मचारी जे आरोग्य सेवा देणारे होते या लोकांचे डेथचे प्रपोजल केंद्र सरकारच्या समितीकडे पाठविणे अभिप्रेत होते. यात महानगरपालिकेने पहिल्या लाटेमध्ये मृत्यू पावलेल्या कर्मचा-यांचे पाठविण्यात आले. यामध्ये राज्य सरकारने पुढे असा निर्णय घेतला. आधी पहिल्या जीआरमध्ये कवच म्हटलेले होते त्यात डायरेक्ट सेवा देणा-या कर्मचा-यांचा उल्लेख होता. त्या नंतर आरोग्य सेवा आयुक्तलयाकडून १८.०४.२०२० चे पत्र प्राप्त झाले त्यामध्ये त्यांनी म्हटले की याबाबत राज्य सरकारकडून प्राप्त झाल्यानंतर कोव्हीड-१९ आरोग्य सेवा देणारे (वाचले)

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, खाजगी आस्थापनेमधील जे कोव्हीड-१९ मध्ये मरण पावले त्यांना या विम्याचे कवच आहे किंवा नाही.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, हे जे कवच केंद्र शासनाच्या कवच मधले आहे त्यामध्ये रुग्णांवरती उपचार करणारे असा उल्लेख आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, हे जे परिपत्रक आहे. मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. या देशाचे लाडके पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी गरीब कल्याण इन्श्युरन्स् पॅकेज अंतर्गत जे जे कोव्हीड योध्दे जे मरण पावले त्यांच्या वारसदारांना ५० लक्ष रुपयाची मदत करण्याचे ठरविले आणि तसे निर्देश दिले विविध टेरीटरी आणि राज्य शासनाच्या सेक्रेटरी आणि सगळयांना निर्देश दिले आणि त्याचा जो इन्श्युरन्स् प्रिमियम आहे तो त्यांनी त्याचा जो निधी असतो, पंतप्रधान निधी जो आहे त्या निधीतून वळता केला. इन्डीव्हीज्युल नाही तर प्रशासन ज्याला ज्याला अप्रुव्हल करेल की हा कोव्हीड योध्दा होता हा सेवा देतांना मरण पावला अशा सर्व आस्थापनातील मृत पावलेल्या कर्मचा-यांना देण्यात यावे असे माझे मत आहे. या मताशी प्रशासनाचे काही दुमत असेल ते त्यांनी सांगावे

महापौर:- प्रशासनाने निवेदन करावे.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, मी आताच केंद्र शासनाच्या निर्णयाचे पत्र वाचून दाखविले. त्यानंतर २९ मे २०२० रोजी महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दुसरा निर्णय कळविला त्यामध्ये असे म्हटले होते

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, प्रश्नाचे उत्तर स्पेसिफिक दया अशी माझी प्रशासनाला आपल्या माध्यमातून विनंती आहे. राज्य सरकार काय म्हटले, केंद्र सरकारने काय म्हटले मी सर्व पत्राचे वाचन करणार आहे. आपण वेळ देणार असाल मी सर्व मुद्दे फारवर्ड करणार आहे. म्हणून आपण स्पेसिफिक उत्तर दयावे अशी विनंती करतो.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, मी स्पेसिफिक बाबींच वाचून दाखवितो.

महापौर:- त्याचा प्रश्न मोड असा आहे की त्यांनी जे नमुद केले आहे ते लाभार्थ्यांच्या यादीमध्ये आहे किंवा नाही.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, खाजगी कर्मचा-यांच्या बाबतीत डायरेक्ट यामध्ये उल्लेख केलेला नाही आहे. फक्त जे लोक प्रायव्हेट कर्मचारी आहेत जे कोव्हीड वरती उपचार करणारे किंवा कोव्हीड बाधितावरती उपचार करणारे लोक आहेत.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, प्रशासनाने या संपुर्ण बाबींवरती अभ्यास केलेला आहे काय?

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, अभ्यासपूर्वकच वाचून दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेचा कागद माझ्याकडे आहे. तो मी वाचून दाखवितो(वाचले) हा जो कागद आहे तो माझा नाही आहे. हे परिपत्रक मी काढलेले नाही आहे. सन्माननीय प्रधानमंत्र्यांनी सर्व युनियन टेरीटरींना, सर्व राजयांच्या मुख्य सचिवांना पाठविले आहे. जर असे आहे तर खाजगी आस्थापनेमध्ये काम करणारे जे कर्मचारी होते. ते कोव्हीड योध्दे आहेत ते मरण पावले. त्यांचा घरचा कर्ता पुरुष मेल्यावर त्यांच्या घरी अन्नासाठी दशा आहे. त्या माणसाचा काही डाटा नाही, काही रेकार्ड नाही. कुणी कागदाचा, नियमांचा अभ्यास केलेला नाही. ती व्यक्ती २०२० च्या सन्माननीय वंदनाताई भुरळी या अप्पर सचिव आहेत, स्वास्थ्य कल्याण मंत्रालय, केंद्र सरकारच्या, त्यांनी काढलेल्या परिपत्रकाचा अभ्यास केलेला नाही. आपल्या महानगरपालिकेचा समाज कल्याण विकास विभाग आहे. ज्या ठिकाणी राज्यातील एमपीएससी पास होवून बसविलेला व्यक्ती आहे, ते काय झोपा काढतात काय? या बाबत बोलावे लागते की अत्यंत विपरीत परिस्थितीत माझ्याकडे अशी एक महिला आलेली आहे की ज्या घरी फक्त ३ महिला राहिलेल्या आहेत. तो पुरुष बीव्हीजी कंपनीमध्ये होता. ३० एप्रिल २०२१ ला मरण पावला. त्याच्या घरी खायला अन्न नाही, तीन वर्षाची मुलगी घेवून ती मुलगी रस्त्यावर नोकरीसाठी फिरते आहे. बीएससी झालेली ती मुलगी आहे. सन्माननीय महापौर साहेब, अशा पध्दतीचे सन्माननीय पंतप्रधानाचे निर्देश असतांना, त्या खात्याचे परिपत्रक असतांना आपली महानगरपालिका काय करते. आपले प्रशासन काय करते. सन्माननीय महापौर साहेब, मी आपल्याला विनम्रपणे सांगू इच्छितो कि, याची जबाबदारी फिक्स झाली पाहिजे. अशा अधिका-यावर कार्यवाहीची अपेक्षा आम्हांला आहे हा पहिला मुद्दाआणि दुसरा मुद्दा असा आहे या विषयाच्या संदर्भात काम करण्यासाठी सिंगल विंडो तयार करुन नोडल अधिका-याची अपाईंटमेंट यासाठी विशेषत्वाने करावी अशी माझी विनंती आहे. एवढेच नाही तर आशा वर्कस् असतील आणि ज्यांनी ज्यांनी हेल्थमध्ये काम केलेले होते त्या सगळया लोकांना या योजनेअंतर्गत कव्हर केलेले आहे. त्यामुळे माझी नम्र विनंती आहे, या सगळया लोकांचे प्रस्ताव बोलवावे आणि जी प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अप्रुव्हल करुन स्टेटला पाठवायचे आहे. न्यु इंडिया इन्श्युरन्स् कंपनी

कव्हर देणार आहे त्याचा प्रिमीयम मा.नरेंद्रजी मोदी यांनी भरलेले आहे त्याचा फायदा गरीब लोकांना झाला पाहिजे. दोन मुद्दे मी पुनश्च आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो, कामचुकारपणा झालेला आहे त्यामध्ये जबाबदारी फिक्स होवून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. दुसरे, सिंगल विंडो तयार करुन नोडल अधिका-याची नियुक्ती करावी.

महापौर:- सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्यामध्ये प्रशासनाने उत्तर देत असतांना प्रशासनाने सांगितले की सगळयांना उत्तर विचारले आणि त्यांच्याकडुन मिळालेल्या सुचनेप्रमाणे आम्ही उत्तर दिले आहे जर ही कारवाई प्रशासनाने पुर्ण केली असेल आणि संबंधित एजन्सीने आपल्याला नाव दिले नसेल तर नियमाप्रमाणे जी कारवाई एजन्सीवर होऊ शकते ती करायला पाहिजे, आणि जर आपल्या प्रशासनाच्या चुकीमुळे ते नाव यादीमधुन बाहेर गेले असेल तर संबंधित अधिका-यांवर उपलब्ध नियमानुसार ७२ (क) नुसार आपण कारवाई करावी. सोबतच हे जे सर्व निर्णय आहे ते शासनाने घेतले आहे या सर्वांची माहिती नगरसेवकांना असणे नितांत आवश्यक आहे. मी चर्चा करीत असतांना आयुक्त महोदयांनी मला सांगितले की हा जो मोबदला देण्याचा विषय आहे की कोरोना योध्दा म्हणुन ज्यांची मृत्यु झाली किंवा ज्यांचे बलीदान झाले त्या बद्यल शासनाचे नविन परिपत्रक आलेले आहे. आणि ४ ऑगस्टला जे पत्र आलेले आहे त्यामध्ये राज्य शासनाने हे सांगितले आहे की अ आणि ब वर्गची जी महानगरपालिका आहे त्यांनी स्वत:च्या कर्मचा-यांना स्वत: निधी दयावे, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बघता हे शक्य नाही की महानगरपालिका हे करु शकेल, म्हणुन रितसर मी प्रशासनाला याच विषयाला अनुसरुन निर्देश देतो की या सभागृहाचे एकमत असे आहे की ही राशी राज्य शासनाने देय असली पाहिजे, या शासनाने घोषित केलेली राशी आहे म्हणुन राज्य शासनाने याची व्यवस्था करुन नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना दिली पाहिजे अशा प्रकारचा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे अशा प्रकारचे पत्र प्रशासनाने शासनाला पाठविण्यात यावे, सोबत जे कोणी बाधीत असेल त्या सगळयांची यादी आणि सर्वांना न्याय देण्याच्या अनुषंगाने आपण एक खिडकी योजनेकरीता एक नोडल ऑफीसर याच कामाकरीता दयावा असे सुध्दा निर्देश देण्यात येत आहे. प्रशासनाने ताबडतोब ही राशी राज्य शासनाने दयावी असा प्रकारचा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे अशा प्रकारचे पत्र शासनाला पाठवावे असे निर्देश देण्यात येत आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, एक मुद्दा सुटत आहे आपली परवानगी असेल तर बोलतो. राज्य शासनाने जे पत्र पाठविले ते मला मान्य आहे. जी अ वर्ग महानगरपालिका आहे, ब वर्ग महानगरपालिका आहे त्यांना ही राशी आपल्या निधीतून दयावी. हे खरे आहे. या पध्दतीचे परिपत्रक शासनाने पाठविले आहे. जर परिपत्रक आहे तर तर मा.प्रधानमंत्र्यांनी आणि मिनिस्टर ऑफ हेल्थ आणि फॅमिली वेलफेअरनी परिपत्रक काढून ज्या सुचना दिलेल्या आहेत, जे आदेश दिलेले आहेत. त्या आदेशाचे काय? आणि याचा जो प्रिमियम आहे तो प्रधानमंत्री यांच्या स्वनिधीतून देण्यात आलेला आहे.

महापौर:- जो मा.सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे शासनाचे काय पाठपुरावे आहे ते एकदा

सभागृहाच्या पटलावर येवू दयावे. त्यांचे अगदी स्पष्ट म्हणणे आहे की पंतप्रधान महोदयांनी जे आदेश काढले होते ते आपल्याला कां लागू नाही. प्रधानमंत्रीने नंतर कोणते आदेश दिले राज्य शासनाला त्या पत्राचे वाचन करावे.

अपर आयुक्त(श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, मा. सन्माननीय सदस्य. कोव्हीड कवच त्याबद्दल मी वाचून दाखविले त्यामध्ये एक वाक्य असे आहे. सदर विमा संरक्षण हा सभागृहापुढे मांडण्यासाठी आपण आदेश दिले. मी परत मांडतो. हा विमाच आहे. ज्या विम्याचे प्रिमीयम शासनाकडून भरण्यात आले. आपण म्हटल्याप्रमाणे खाजगी कंत्राटी कर्मचारी यांना सुध्दा देण्यात आले परंतु ते कोणते ? तर जे सदर विमा संरक्षण कोव्हीड बाधितेवर तपासणी आणि उपचार करणा-या सर्व संबंधितांना अनुज्ञेय आहे. यामध्ये खाजगी रुगणालयाचे कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी ही सर्व समाविष्ट आहेत. आम्ही पहिल्या लाटेमध्ये २१ लोकांचे प्रस्ताव केंद्र सरकारच्या समितीकडे पाठविले आहे. या धर्तीवर आम्ही केंद्र सरकारच्या समितीपुढे महानगरपालिकेचे २१ प्रस्ताव पाठविण्यात आले त्यापैकी त्यांनी १३ प्रस्ताव रिजेक्ट केले की हे डायरेक्ट संबंधित नाही आहेत. उरलेले ६ प्रस्ताव त्यांच्या स्तरावर पाईपलाईनमध्ये ठेवले. एकाचा प्रस्ताव मंजूर झाल्याचे कळले आहे. दुसरा एक पाईपलाईनमध्ये आहे. ज्या ज्या प्रस्तावामध्ये संबंधित कर्मचारी हे डायरेक्ट कोव्हीड बाधितांवर उपचार आणि तपासणी करणारे जे हॉस्पीटलमध्ये आहेत अशी खात्री होत आहे त्यांना हा ५० लाखाचा निधी देय आहे. आपल्या सारखे इतर कर्मचारी आहेत ते सफाई कर्मचारी आहेत अणि शिक्षक आहेत ज्यांना आपल्या सेवा वर्ग करण्यात आल्या आहेत. या वर्ग करण्यात आलेल्या सेवांच्या बाबत राज्य सरकारने घेतलेला दुसरा निर्णय आहे तो आहे २९ मे २०२० चा, यात राज्य सरकाने म्हटले आहे की असे जे कर्मचारी आहेत. आरोग्य सेवा संबंधित च्या व्यतिरिक्त जिल्हा प्रशासन असो, पोलीस असो, होमगार्ड असो, अंगनवाडी असो, लेखापोषक विभागाचे असो, अशा सगळया कर्मचा-यांचा अशा त-हेने कोव्हीडमध्ये मृत्यू झाला असेल तर त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहण्याचा शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. सर्वेक्षण, शोध, प्रतिबंध, उपचार यासाठी कर्तव्यावर कार्यरत सर्व कर्मचा-यांना ५० लक्ष रुपयाचे सर्वकष विमा कवच पुरविण्यात येते. हे सगळे शासकीय कर्मचा-यांसाठी असणार आहे. हा जो ५० लक्ष रुपयाचा निधी आहे हा राज्य शासनाने देण्याचे या परिपत्रकाद्वारे राज्य शासनाने घोषित केलेले होते. हे १९ ते २०२० राज्य शासनाचे परिपत्रक आहे. त्यानंतर ४ ऑगस्ट २०२१ आता आलेला जो लेटेस्ट निर्णय आहे त्यामध्ये मात्र राज्य शासनाने असे सांगितलेले आहे की अशा प्रकारचे जे कर्मचारी आहेत त्यांना सानुग्रह सहाय्यता निधी चा लाभ मिळालेला आहे. अशाप्रकारे अ व ब वर्गातील महानगरपालिकेने ५० लक्ष रुपयाचा जो सानुग्रह सहाय्यता निधी आहे तो स्वनिधीतून राबवायची आहे. त्यामुळे आताच मा.महापौर साहेबांनी या विषयावर डायरेक्शन दिलेले आहे. आज आपल्याकडे ४० - ४३ संख्या आहे. तिस-या लाटेमध्ये संख्या वाढू शकेल. काही प्रस्ताव आमच्या पर्यंत आले नसतील तेही यामध्ये समाविष्ट केल्यानंतर ती मोठी रक्कम होईल. शासनाकडे याची मागणी नोंदविण्याबद्दल मा.महापौरजी यांनी निर्देश दिलेले आहे त्यावरती आपली कार्यवाही करु असे मी सभागृहापुढे मांडू

इच्छितो.

अॅड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, जोशी साहेबांनी सांगितले ती फॅक्ट आहे. परंतु पुन्हा एकदा तुम्ही केंद्र सरकारचे जे नेमके निर्देश आहे. कोणत्या माणसाला विमा कवच आहे, नाही आहे त्याचे मार्गदर्शन मागविले गेले पाहिजे. याच्यावर निश्चितपणे अभ्यास झाला पाहिजे. माझ्याकडे फ्रिक्वेन्टली ऑक्स क्वोश्चन त्याची यादी आहे. त्याच्यामध्ये मी वाचून दाखविली. प्रश्न क. ३ आणि प्रश्न क्र. ५ मध्ये नेमकी त्याच्यामध्ये व्याख्या केलेली आहे. हे केंद्र सरकारचे पत्र आहे. दुसरा मुद्दा मला उपस्थित करावयाचा आहे की या सगळयांना विमा कवच हा पंतप्रधान निधीतून मंजूर झाला आहे आणि केंद्र शासनाचा आदेश आहे तर अशा परिस्थितीमध्ये राज्य सरकारला अशा पध्दतीचे परिपत्रक काढण्याचा अधिकार आहे काय? हा माझा मुळ प्रश्न आहे. राज्य सरकारला कोणत्या नियमाअंतर्गत अशा पध्दतीचे परिपत्रक काढण्याचा अधिकार आहे. ३ एप्रिल २०२० श्रीमती वंदना धुळाली यांनी सांगितले की स्वास्थय आणि परिवार कल्याण मंत्रालयाच्या त्या सचिव आहेत. अशा परिस्थितीमध्ये केंद्र शासन सर्व राज्यांना जीएसटी मधून जे केंद्राचे उत्पन्न आहे, ४० टक्के शेअर हा राज्यांना देत असतो. त्या अनुसार त्या निधीतून राज्य सरकारने खर्च करावा असे केंद्र शासनाची अपेक्षा असते. अशा परिस्थितीमध्ये केंद्र शासनाचे जे परिपत्रक आहे, नियमावली आहे, आदेश आहे ते बाजूला सारण्याची राज्य सरकारला अधिकार आहे काय? आणि असल्यास ते मान्य करणे आपल्याला बंधनकारक आहे काय? हा मुळ प्रश्न मा.महापौरजी, कायदेशिर बाब वाटत असली तरी शेवटी कोव्हीड योध्दा जे मरण पावले आहे त्यांना कोव्हीड योध्दाचे प्रमाणपत्र यांनी दिले आहे. प्रशासनाने दिले आहे. त्यामुळे यांना देखील तशी ट्रिटमेंट देवून लाभ मिळावा अशी माझी विनंती आहे.

महापौर:- सन्माननीय सदस्य की मुल भावना यही रही है के जो सेवा करते हुये जिनका देहांत हुआ है, जिन्होने कोरोना योध्दा के रुप मे अपना बलिदान दिया है उनको उसका लाभ मिलना चाहिए। और शासन ने अगर प्रस्तावित किया है तो लाभ मिलना चाहिए इसतरह प्रशासन सकारात्मक रुप अपना करके पाठपुरावा करे, राज्य शासन ने पत्र निकालना चाहिए या नही निकालना चाहिए अपना सभागृह इस स्थिती मे नही है की इसपर सभागृहने या अधिकारी ने भाष्य करना चाहिए।

अॅड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, माझा निषेध नोंदविण्यात यावा.

महापौर:- धर्मपालजी आपला निषेध नोंदविण्यात येत आहे.

अॅड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, एक विषय राहिलेला आहे. खाजगी कंपन्यातील जे मृत कर्मचारी आहेत त्यांच्या वारसदारांची जबाबदारी त्या त्या कंपनीने घ्यावी असे निर्देश दिले तर फार उपयोगाचे होईल कारण परिस्थिती फार गंभीर आहे.

महापौर:- मानवतेच्या दृष्टीने या विषयावर प्रशासनाने लक्ष दयावे असे निर्देश देण्यात येत आहे.

**प्रश्न क्र. २८२**:- नागपूर महानगरपालिका व्दारे शहरात जी विद्युत व्यवस्था प्रदान करण्यात येते त्याचे विद्युत शुल्क संदर्भात

श्री. जितेंद्र घोडेस्वार-:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. प्रकाश विभागांतर्गत नागपूर शहरातील पथदिव्यांच्या विज देयकाची भुगतान बाबतची वर्षनिहाय माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली आहे. सन २०१७-१८ ती ३६.७३ कोटी. सन २०१८-१९ ला ३४.४९ कोटी. सन २०१९-२० ला २३.४५कोटी आणि सन २०२०-२१ ला १९.६२ कोटी होती. शहरात पारंपारीक पथदिवे बदलून उर्जा कार्यकुशल पथदिवे लावण्याचे काम माहे जाने २०१७ नंतर सुरु झालेत त्यावेळी १.२४ लक्ष नग पथदिवे होते. त्यावेळी विज देयकापोटी रु. ३६.७३ कोटी चा भरणा मराविविकंलि ला करावा लागत होता. आज रोजी पथदिव्यांच्या संख्येत वाढ झालेली असुन १.४४ लक्ष नग पथदिवे शहरात असुन विज देयकापोटी रु १९.६२ कोटी चा वार्षिक भरणा करण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये मार्च २०२१ ते जुलै २०२१ पर्यत रु. ८३९ कोटीचा विज देयकाचा भरणा करण्यात आला.  आता शहरातील विद्युत व्यवस्था एल.ए.डी. मध्ये परिवर्तीत करण्यात आली त्यामुळे म.न.पा.ला किती कोटी रुपयाची बचत झाली तसचे म.न.पा.द्वारे किती सामाजिक संस्थाना देण्यात येणा-या निशुल्क विद्युत पुरवठयावर किती खर्च करण्यात येतो तसेच महानगरपालिकेच्या शहरातील केंद्रीय व सर्व विभागीय कार्यालयाच्या विद्युत व्यवस्थेवर दरवर्षी किती खर्च करण्यात येतो याची माहिती देण्यात आलेली नाही. २०१७ ला नागपूर शहरामध्ये एलएडी विद्युत व्यवस्था निश्‍चित करण्यात आली व टेंडर प्रक्रिया करण्यात आली. ते अबाऊ मध्ये होते. आता उरलेले १ लक्ष ४४ लक्ष दिवे लावले आणि उरलेले एलएडी विद्युत व्यवस्था करण्याकरिता स्थायी समितीमध्ये १२ कोटीचा निधी ठेवण्यात आला. या प्रश्‍नाचे उत्तर मला मिळाले नाही.

महापौरः- नेमका तुमचा काय प्रश्‍न आहे.

कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. सन्माननीय सदस्य श्री. घोडेस्वार यांचा प्रश्‍न विषयपत्रिकेवर आहे. नागपूर महानगरपालिका व्दारे शहरात जी विद्युत व्यवस्था प्रदान करण्यात येते त्याचे विद्युत शुल्क प्रत्येक वर्षी किती प्रदान करण्यात येते या संदर्भात २०१७ पासून ते २०२१ पर्यंत संपुर्ण माहिती विभागाला दिलेली आहे.

श्री. जितेंद्र घोडेस्वार-:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन.  महानगरपालिका आणि ज्या सामाजिक संस्थांना विद्युत पुरवठा करण्यात आला या विषयी सुध्दा माहिती विचारली होती.

कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. विषयपत्रिकेवर आलेल्या प्रश्‍नाच्या अनुषंगाने उत्तर देण्यात आलेले आहे.  मी सदनाला माहिती देवू इच्छितो की केंद्रीय कार्यालय आपल्या सिव्हील लाईनमध्ये आहे. ४२.१८ लक्ष रुपयाचा विद्युत  भरणा असतो.  सुरेश भट सभागृहामध्ये जवळपास २५ लक्षाचा विद्युत भरणा करतो. त्यानंतर आशीनगर येथे ३५ हजाराचे एवरेज बील येते, सतरंजीपुरा झोन येथे २३ हजाराचे बील येते, हनुमाननगर येथे २८ हजाराचे पर मंथ बील येते आणि हनुमाननगर येथे १२ हजाराचे येते, नेहरुनगर येथे १८.हजाराचे बील येते, लक्ष्मीनगर झोन येथे ५० हजाराचे बील येते, धरमपेठ येथे २५ हजाराचे बील येते आणि मंगळवारी झोन येथे २२ हजाराच्या जवळपास बील येते, लकडगंज येथे ३४ हजार  पर मंथ बील येते. उद्यान आणि वाचनालय आहेत. विद्युत विभागाद्वारे या प्रावधानामध्ये ४.२५ कोटीचे नियोजन ठेवण्यात आले आहे. २.९८ करोडचे

प्रावधान आजपर्यत देण्यात आलेले आहे.

श्री. जितेंद्र घोडेस्वार-:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. याची टोटल रक्कम सांगितलेली नाही. शहरात उर्वरित पथदिवे लावावयाचे आहे ते लक्ष लावावयाचे आहेत.

कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. शहरात २१५१३ पथदिवे लावावयाचे आहेत. त्याचे कार्यदेश विभागाद्वारे देण्यात आलेले आहेत. कार्यदेश देण्यात आलेली राशी ३०.५९ करोड रुपये आहेत.

श्री. जितेंद्र घोडेस्वार-:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. हे बिलोमध्ये गेलेले आहे की अबाऊ मध्ये गेलेले आहे आणि २०१७ मध्ये आपण लायटिंगचे शुल्क आकारले होता तेव्हा किती होते बीलो ?

कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. ६७ परसेंट बिलोने केलेले टेंडर आहे. मी उत्तर देवू इच्छितो कि, २०१७ मध्ये जो वर्कआर्डर देण्यात आलेला होता त्याच्यामध्ये स्पेशलाईज फॅसिलिटी होती. त्याच्यात स्पेशल सायलन्सर होते, स्पेशल फिचर होते. ते डिफर पेमेंटवर करण्यात आले होते. ८४ महिन्यात भुगतान करावयाचे होते. आता जी फिटींग आपण घेत आहे ती साधी फिटींग होती. त्या वेळेस आणि आताची फिटींग मध्ये जमीन आस्मानचा फरक आहे. याच्याकरिता मा.अति.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार झाली होती आणि याचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे.

श्री. जितेंद्र घोडेस्वार-:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. त्या फिटींगची पॉलिसी आणि या फिटींगची पॉलिसी समसमान आहे काय ? तसेच या फिटींगचा सप्लॉय आणि त्या फिटींगचा सप्लॉय समसमान आहे काय?

महापौर:- याचे उत्तर देण्यात आलेले आहे आपण पुनश्च: उच्चार कां करीत आहे.

श्री. जितेंद्र घोडेस्वार-:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. ६७ टक्के बिलोमध्ये फाईल गेलेली आहे. मग सगळी लायटिंग लागणार आहे की नाही लागणार आहे.

महापौर:- उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्य घोडेस्वार साहेबांनी म्हटले आहे. ६७ परसेंट बिलो आलेले आहे हे अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. आपल्याला कंपनीद्वारे फिटींग येण्याचे नियोजन केलेले आहे. मागच्या सभागृहात मी बोललेलो आहे. ३० तारखेला पहिला लाट येणार होता परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे त्यांचा मेल आलेला आहे की जो लॉट येणार होता तो आता ८ ऑगस्ट ला निघत आहे. ८ तारखेला सगळया झोनला पुरविण्यात येतील. या सर्व फिटींग हे पुर्ण शहरात ६० दिवसात पोहचविल्या जातील.

श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, सतनामझरी जो समाजभवन है वह लकडगंज झोनमध्ये आता है। वहा पर शादियां होती है और महानगरपालिका किराया लेती है। महानगरपालिका

किराया लेती है और पिछले आठ-दस साल से ४लाख रुपये से इलेक्ट्रिक बील है जब महानगरपालिका उसका किराया  लेती है तो विभाग को निवेदन करता हूँ की उसका का भी बील भर दिजीयेगा I

कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. सदर समाजभवन लकडगंज झोनमध्ये येते त्यामुळे लकडगंज झोनच्या सहा.आयुक्तांनी उत्तर दयावे अशी मी विनंती करतो.

महापौर:-  पीडब्लूडीने उत्तर दयावे.लकडगंज झोनचे  मिस्टर भाजीपाले यांनी उत्तर दयावे.

श्री.भाजीपाले:- आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह.  या बद्दलची माहिती माझ्याकडे आलेली नाही त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर सहा.आयुक्तांनी दयावे अशी मी विनंती करतो.

महापौर:- संबंधित झोनच्या सहा.आयुक्तांनी उत्तर दयावे.

श्रीमती साधना पाटील(सहा.आयुक्त, लकडगंज झोन):- मा.महापौरजी, मी ताबडतोब प्रोसेस करते.

महापौर:- ताबडतोब प्रोसेस करावी नागरिकांना त्रास नाही झाला पाहिजे याची काळजी घ्यावी. प्रश्नोत्तर काल मे कुछ विषय ऐंसे रहे है की उन विषय मे प्रशासन पुर्ण तयारी के साथ नही था, इसलिये सभागृह के सामने स्थितीया विचित्र उत्पन्न हो गयी, प्रशासन को ताकीद दी जाती है जो भी प्रश्न नगरसेवकोंने सभागृह मे पुछे है उन संपुर्ण विषयो की जानकारी के साथ सभागृह मे आया करे, आज यह पहला मौका था जिस समय प्रशासन आपस मे ही कनफ्युज था, आज पहिला मौका होने के कारण किसी प्रकार की कारवाई हम नही कर रहे है, आनेवाले सभागृह मे प्रशासन पुर्ण रुप से तयारी के साथ नही रहा तो मजबुरी मे इस चेअर से संबंधित अधिकारीयों पर कारवाई करने के निर्देश देना पडेगा, यह अनुशासन के दृष्टी से आवश्यक होंगा, आज पहिला मौका था इसलिये क्षमा किया जाता है आगे से अधिकारी वर्ग पुरी तयारी के साथ आये ऐंसे निर्देश दिये जाते है I

महापौर:- स्थगण प्रस्तावाचे वाचन करण्यात यावे.

निगम सचिव:- मा.महापौरजी, मा.सदन. मा.विरोधी पक्ष नेते श्री. तानाजी वनवे यांच्याकडून स्थगण प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

**स्थगण प्रस्ताव**

नागपूर महानगरपालिका कामकाज उपरोक्त खालील प्रश्न विचारावयाचे आहे की नागपूर महानगरपालिकेत वर्ग **-१** व वर्ग-**२** चे नियुक्ती बाबतचे अधिकार कुणाला देण्यात आलेले आहे त्या संबंधाने याबाबत दिनांक **४.१०.२०२१** च्या सर्वसाधारण सभेत चर्चा करण्यास स्थगण प्रस्ताव देण्यात येत आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, हा स्थगण प्रस्ताव जो या संबंधाने दिलेला आहे तो पुढील सभागृहामध्ये आपण घ्यावा.मी काही कारणास्तव बाहेर आलेला असल्यामुळे मी हा प्रस्ताव मागे घेतो.

**<u>ठराव क्रमांक १७३ /वि.क्र.८१</u> :-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमाननगर झोन क्र. ३ च्या मालमत्ता **{कर व करआकारणी विभाग}** कर विभागाच्या कार्यक्षेत्रातील वार्ड क्र. १४ मधील विश्वजीत को. ऑप. हाउ. सोसायटी मधील मालमत्ता घर क्र. ६६६४/३३ (खुला भुखंड) करीता थकीत असलेला मालमत्ता कर रक्कम १७७६७/- व शास्ती रक्कम रु. २५६६७/- असे एकूण रु. ४३४२४/- (आर्थीक वर्ष २०१८-१९ पर्यंत) वसूल करणेकरीता दिनांक २९/११/२०१८ रोजी जाहीर लिलावाने उक्त स्थावर मिळकतीची विक्री महत्तम बोलीधारक श्री रितेश रामेश्वर भोयर यांना महत्तम बोली रक्कम रु.२८,५०,०००/- (अठ्ठावीस लक्ष पन्नास हजार फक्त) नी करण्यात आली. विक्री दिनांकानंतर दिनांक १६/०३/२०१९ च्या वर्तमानपत्रात अंतीम जाहीर सुचना देवून उक्त मिळकती वरील हक्क, हितसंबंध, दत्तकपुत्र, वारसान हक्क, गहान, दान, बोझा, लीज, आममुखत्यार धारक, कर्ज बक्षीसपत्र, जप्ती, करारमदार, वादविवाद व इतर तत्सम बाबी असल्यास त्यांनी सुचना प्रसिध्द् झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत सबळ पुराव्यानिशी लेखी तक्रार/उजर/हरकत सादर करणेची मुभा देण्यात आली. परंतू सदर कालावधीत कसूरदार सौ. सुलोचना अशोकराव बोकाडे व त्यांचे हितसंबंधी कोणीही कोणताही उजर किंवा हक्कसंबंध दाखल केला नाही किंवा नागपूर महानगरलिकेस उक्त मिळकती संबंधी घेणे असलेली रक्कम नागपूर महानगरपालिका निधीत जमा करणेची दखल सुध्दा घेतलेली नाही त्यामुळे दिनांक २८/०६/२०१९ रोजी खरेदीदार श्री रितेश रामेश्वर भोयर यांचे नावे उक्त मिळकतीचे विक्री परिपूर्ण प्रमाणपत्र पंजीबध्द करुन दिलेले आहे. सदर कार्यवाही महाराष्ट्र् महानगरपालिका अधीनियम अनुसूची "घ" प्रकरण "८" चे कराधान नियम ४७(५)च्या तरतूदीन्वये व स्थायी समितीनी मान्यता प्रदान केलेल्या स्थायी आदेशातील रीतीने करण्यात आलेली आहे.

उक्त मिळकतीचे विक्री परीपूर्ण प्रमाणपत्र पंजीबध्द झाल्यानंतर कसूरदार सौ. सुलोचना अशोकराव बोकाडे यांनी दिनांक ०६/११/२०१९ रोजी उक्त मिळकती करीता थकित असलेली मालमत्ता कर रक्कम कळविणेबाबत व सदर रक्कम भरणेची अनुमती मिळणेबाबत विनंती केलेली होती. परंतू कराधान नियम ४७(४) च्या तरतूदीअन्वये कसूरदारांनी विक्री करण्यात येण्यापूर्वीच जर देय असलेली रक्कम व वसूलीचा खर्च महानगरपालिका निधीत जमा केला तरच जप्त केलेली मालमत्ता परत करणेची तरतूद आहे. सदर कसूरदारांचा अर्ज हा विक्री प्रमाणत्र पंजीबद्ध झाल्यानंतरचा असल्याने कसूरदार यांनी दिनांक ०६/११/२०१९ रोजी सादर केलेला विनंती अर्ज तत्कालीन सहा. आयुक्त झोन क्र. ३ यांनी फेटाळल्याचे निदर्शनास येते.

कसूरदार सौ. सुलोचना अशोकराव बोकाडे यांनी पुनश्च: दिनांक ११/०२/२०२० रोजी अर्ज सादर करुन विक्री केलेल्या रक्कमेतून (रु. २८,५०,०००/-) नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेली रक्कम वजा जाता शिल्लक असलेल्या रक्कमेवर हक्क सांगून शिल्लक रक्कमेची मागणी केलेली आहे. परंतू महाराष्ट्र् महानगरपालिका अधीनियम चे अनुसूची "घ" कराधान नियम ४७(३) ची तरतूद अशी आहे की, **"काही रक्कम राहील्यास ती ताबडतोब नगरपालिका निधीत जमा करण्यात आली पाहीजे. परंतू विक्रीच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत आयुक्तांकडे लेखी अर्ज करुन तिच्यावर हक्क सांगण्यात आला तर, अटकावून ठेवण्याच्या किंवा जप्त करण्याच्या वेळी अशी मालमत्ता ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस ती रक्कम परत करण्यात आली पाहिजे आणी वर सांगीतल्याप्रमाणे सहा महिन्यांच्या आत हक्क न सांगीतलेली कोणतीही शिल्लक रक्कम महानगरपालिकेची मालमत्ता होईल."** कसूरदार सौ सुलोचना

अशोकराव बोकडे, यांनी शिल्लक रक्कमेवर दावा ज्या अर्जान्वये केलेला आहे तो लेखी अर्ज विक्रीच्या तारखेपासून सहा महिन्याच्या नंतरचा आहे विक्रीच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आतील नाही, त्यामूळे कराधान नियम ४७(३) च्या तरतूदी अन्वये शिल्लक रक्कम रु.२६,७८,३७५/- ही नागपूर महानगरपालिकेची मालमत्ता झालेली आहे.

कसूरदारांनी शिल्लक रक्कमेवर हक्क सांगणेबाबत केलेला विलंब क्षमा करणेची महाराष्ट् महानगरपालिका अधीनियमात कोणतीही तरतूद निदर्शनास येत नाही व शिल्लक रक्कम रु. २६,७८,३७५/- ही नागपूर महानगरपालिकेची मालमत्ता झालेली असल्याने कसूरदारांनी शिल्लक रक्कमेवर हक्क सांगणेस विलंबाने सादर केलेल्या लेखी अर्जावर कार्यवाही करावयाची झाल्यास मानवीय दृष्टीकोणातून विलंब क्षमस्व करणेचा निर्णय महाराष्ट् महानगरपालिका अधीनियमात कोणतीही तरतूद नसतांना घेतल्यास भविष्यात लेखा परिक्षणात उपस्थीत होणा-या परिच्छेदांना सामोरे जावे लागणार हयाबाबतची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परीस्थीतीत महाराष्ट् महानगरपालिका अधीनियमचे अनुसूची “घ” प्रकरण “८” चे कराधान नियम ४७ च्या तरतूदीमध्ये महाराष्ट् शासनाकडून दुरुस्ती झाल्यास, कसूरदार सौ. सुलोचना अशोकराव बोकाडे यांच्या लेखी अर्जावर विचार केल्या जावू शकतो.

कसूरदार सौ. सुलोचना अशोकराव बोकडे यांनी दिनांक ११/०२/२०२० च्या लेखी अर्जान्वये संबंधीत प्रकरणात शिल्लक रक्कम रु. २६,७८,३७५/- (सव्वीस लक्ष, अठयाहत्तर हजार, तीनशे पंचाहत्तर फक्त) सांगीतलेल्या हक्कावर निर्णय घेणेकरीता व सदर रक्कम संबंधीतांना परत करणेकरीता कराधान नियम ४७ च्या तरतूदीमध्ये दुरुस्ती करणेबाबत महाराष्ट् शासनाकडे शीफारस करणेबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १७४ /वि.क्र.८३</u>:-** मौजा भानखेडा प्रभाग क्र. ०९ मधील खलाशी लाईन येथील

**{लोककर्म झोन क्र. १०}** भिवसन चौक, समाजभवन जवळ शक्ती नाल्यवर मनपा कडून बांधकाम केलेले संडास शिकस्त झाल्यामुळे प्रभाग क्र. ०९ चे मा. नगरसेवक /नगरसेविका १) श्री. संजय श्यामराव बुर्रेवार, २) श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे ३) सौ. स्नेहा विवेक निकोसे ४) सौ. ममता महेश सहारे यांनी शिकस्त संडास तोडण्याकरिता झोन कार्यालयात पत्र दिले आहे. त्या अनुषंगाने शिकस्त सार्वजनिक संडास तोडण्याबाबतचा अभिप्राय स्वास्थ विभागाकडुन प्राप्त आहे. याकरिता सदर शिकस्त संडास तोडण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाला प्राप्त (२) उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>उपसुचना(१)</u>**

प्रभाग क्र. २३ अंतर्गत रामा स्टिल झोपडपट्टी, स्मॉल फॅक्टरी एरिया येथील समाजभवन शिकस्त झालेले आहे. हे समाजभवन तोडण्याची तक्रार परिसरातील नागरीक वारंवारं करीत आहे. या समाजभवनाच्या भिंतीला जागोजागी भेगा पडलेल्या आहे. त्यामुळे हे समाजभवन केव्हा कोसळुन पडेल हे सांगता येत नाही. हे समाजभवन शिकस्त झाल्यामुळे

केव्हाही जीवहानी होण्याची शक्यता टाळता येत नाही. या विषयाबाबत सभागृहात चर्चा करुन एकमताने मंजूर करण्यात यावा, ही विनंती.

हस्ता/- सुचक
श्री. नरेंद्र बोरकर

हस्ता/- अनुमोदक
श्रीमती कांता रारोकर

**उपसुचना(२)**

प्रभाग क्र. १३ अंतर्गत संजय नगर सिंगल लाईन येथील नेल्सन मंडेला होस्टेल समोरील सार्वजनिक शौचालय पुर्णपणे शिकस्त् झालेले आहे. या शौचालयाच्या भोवती कच-याची साठवणुक होण्यामुळे येथील नागरिकांना खुप त्रास सहन करावा लागतो, या संदर्भात येथील नागरिकांनी कित्येकदा तक्रार नोंदविली आहे. तरी सदर परिसरात प्रत्येक घरी शौचालयाची व्यवस्था असून सदर शौचालय मागील १५ वर्षापासून दयनीय अवस्थेत आहे.

तरी सदर विषयावर सभागृहात चर्चा करुन एकमताने मंजूर करण्यात यावा, ही विनंती

हस्ता/- सुचक
डॉ.परिणीता परिणय फुके

हस्ता/- अनुमोदक
श्री.अमर हरीश बागडे

**ठराव क्रमांक १७५ /वि.क्र.८४ :-**
**{शिक्षण विभाग}**

शासनामार्फत विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती देण्यात येतात. परंतू विद्यार्थ्यांनी MSCIT सारखा व्यावसायीक अभ्यासक्रम करीता शिष्यवृत्ती / अनुदान दिल्या जात नाही. यास्तव महानगरपालिकेच्या शाळेत शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी MSCIT सारखा व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यास भविष्यात उपयोगी पडेल. त्या दृष्टीकोनातून मनपा शाळेतील इयत्ता ९ वी व ११ वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना MSCITहा अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबत तरतूद दुर्बल घटक समितीमध्ये असलेल्या उपलब्ध तदतूदीतून करता यईल.

दुर्बल घटक समिती अंतर्गत राखीव तरतूद निधी पद क्र. A446 (मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती) अंतर्गत रु. 19 लक्ष उपलब्ध आहे. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये मनपा शाळेतील वर्ग 9 वी व 11 वी मधील संवर्ग निहाय मागासवर्गीय विद्यार्थी संख्या खालील प्रमाणे.

**संवर्ग निहाय मागासवर्गीय विद्यार्थी संख्या**

| इयत्ता | अनु.जाती | अनु.जमाती | भटक्या विमुक्त जाती | विषेष मागासवर्ग प्रवर्ग | एकुण | षेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 वी | 181 | 55 | 76 | 15 | 327 | |
| 11 वी | 25 | 12 | 07 | 06 | 50 | अपेक्षित |

या विद्यार्थ्यांना MSCIT व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता प्रति विद्यार्थी शुल्क अंदाजे 4000/- गृहीत धरल्यास एकुण 377 विद्यार्थ्यांकरीता रु. 15,08,000/- खर्च अपेक्षित आहे.

करीता दुर्बल घटक समिती मधून उपलब्ध तरतुदीतून दरवर्षी विद्यार्थ्यांना व्यावसायीक अभ्यासक्रम (MSCIT) करीता निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात यावी. दरवर्षी उपलब्ध निधीच्या अधीन राहून हा उपक्रम राबविण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी MSCIT परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर खालील अटी व शर्थीच्या अधिन राहून त्यांचे खातेवर अभ्यासक्रमाचे शुल्क अदा करण्यात येईल.

अटी व षतर्ी :–

1) विद्यार्थी हा मनपा शाळेत शिक्षण घेत असावा.

2) लाभार्थी विद्यार्थी याला प्रथम स्वखर्चाने हा अभ्यासक्रम पुर्ण करावा लागेल.

3) MSCIT ही परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत मुख्याध्यापक यांचेकडे सादर करावे.

4) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत बॅक पासबुक ची झेरॉक्स प्रत व आधार लिंक असल्याची पावती सोबत जोडावी.

5) विद्यार्थ्यांनी जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. जातप्रमाणपत्र नसल्यास मुख्याध्यापक यांचेकडून दाखल खारीज रजिस्टर वरून विद्यार्थी कोणत्या संवर्गातील आहे याबाबत बोनाफाईड सर्टिफिकेट तयार करून घ्यावे.

6) सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाच अभ्यासक्रमाचे शुल्क त्यांचे खातेवर विभागामार्फत जमा करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान

केली.

**<u>ठराव क्रमांक १७६ /वि.क्र.८५</u> :-** नागपूर महानगरपालिकेत कार्यरत सार्वजनिक आरोग्य अभियंता
**{सार्व. आ.अभि.विभाग}** यांच्या सेवांना मुदतवाढ देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम अंतर्गत केन्द्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्थापना ही प्रकल्प अंमलबजावणी, कार्यान्वयन व देखरेखीकरीता करण्यात आली होती. याअंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कक्षात सार्वजनिक आरोग्य अभियंता म्हणून श्री. संदीप लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. महासभेच्या ठराव क्र. २३, दिनांक ०८.०५.२०१७ अन्वये श्री. संदीप लोखंडे यांच्या सेवांना मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. केन्द्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम तसेच केन्द्र व राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व पर्यावरण विषयक प्रकल्प राबविण्याचा त्यांना विशेष अनुभव आहे. सबब केन्द्र शासनाव्दारे नागपूर महानगरपालिकेच्या नाग नदी शुध्दीकरण प्रकल्प, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, १५व्या वित्त आयोगाअंतर्गत वायु गुणवत्ता सुधारणाप्रकल्प व पर्यावरण विषयक प्रकल्पांची अंमलबजावणी व कार्यान्वयन करीता त्यांच्या सेवांची व अनुभवांची महानगरपालिकेस निश्चितच मदत होणार आहे. सदर प्रकल्पांची अंमलबजावणी व कार्यान्वयन करीता केन्द्र व राज्य शासनाच्या योजनांची विस्तृत माहिती असलेले अनुभवी मनुष्यबळ महानगरपालिकेस लागणार आहे. केन्द्र व राज्य शासनाचे अभियान व महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे कार्यरत श्री. सदीप लोखंडे सार्वजनिक आरोग्य अभियंता असल्याने व त्यांची शैक्षणीक पात्रता, अनुभव व कार्यकुशलता बघता त्यांच्या सेवांना १ एप्रिल २०२२ पासून पुढील पाच वर्षाकरीता मुदतवाढ देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाला प्राप्त तीन (०३) सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>सुचना(१)</u>**

नागपूर महानगरपालिकेच्या दि ०४.१०.२०२१ .रोजी संपन्न होणा ८५ .या महासभेच्या बैठकीतील विषय क्र-ला खालील सुचनांसह मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती.

- प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम आरोग्य अभियंता श्री. संदीप लोखंडे यांचा पर्यावरण विषयक प्रकल्प राबविण्याचा विशेष अनुभव बघता यांच्या सेवांना नागपुर शहराच्या महत्वाकांक्षी नाग नदी शुध्दीकरण प्रकल्प संपेपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.
- महाराष्ट्र शासनाकडे सार्वजनिक आरोग्य अभियंता श्री.संदीप लोखंडे यांना नागपूर महानगरपालिकेच्या सेवेत नियमित समावेशन करण्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव शासन निर्णय क्रमांक नमुंम-१२२१/प्र.क्र/०७/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय दि. २७ जुलै, २०२१ नुसार शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात यावा.
- केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुस्थान अभियानाच्या ८१ व्या बैठकीतील मंजूरीनुसार मानधनात समुचित वाढ करण्यात यावी.

वरील सुचनासह महासभेच्या विषय क्र. ८५ ला मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती.

हस्ता/-सुचक

श्री.संदीप जोशी

हस्ता/- अनुमोदक
श्री.प्रविण दटके

**सुचना(२)**

म.न.पा.तील विद्युत विभागात कार्यरत श्री. विशाल शेवारे, लाईनमन (वेतनश्रेणी १९,९००-६३२००-वर्ग ३) या पदावर कार्यरत असून, त्यांना १२ वर्षाचा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. त्यांचा १५ वर्षाचा विभागात काम केल्याचा अनुभव असून, कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता पदविका(विद्युत अभियांत्रिकी) धारण केलेली आहे. वरील बाबी विचारार्थ घेवून विभागात रिक्त असलेली कनिष्ठ अभियंता(विद्युत) या पदावर श्री. विशाल शेवारे यांची नेमणुक करण्यास विचारार्थ व मंजूरीसाठी सादर

हस्ता/-सुचक
श्री.सुनिल अग्रवाल

हस्ता/-अनुमोदक
श्री.संदीप जाधव

**सुचना(३)**

म.न.पा. तील सामान्य प्रशासन विभागातील माहिती तंत्रज्ञान विभागात कार्यरत खालील स्थायी कर्मचारी तक्त्यामध्ये नमूद केलेल्या पदांवर कामास्तव कार्यरत असून, या कर्मचा-यांमार्फत संपुर्ण महानगरपालिकेचे IT संबंधित संपुर्ण कामे केले जातात. त्यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या प्रमाणे विभागात काम केल्याचा अनुभव आहे. माहिती तंत्रज्ञान विभागातील रिक्त अथवा नव्याने भरण्यात येणा-या पदांकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या प्रमाणे धारण केलेली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाचे आकृतिबंध शासनाकडे मान्यतेकरिता प्रलंबित असल्यामुळे खालील तक्त्यात दर्शविलेल्या कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोरील पदांचा/कामास्तव/अतिरिक्त कार्यभार देण्यास हरकत नसावी. वरील बाबी विचारार्थ घेवून सामान्य प्रशासन विभागातील माहिती तंत्रज्ञान विभागात रिक्त अथवा नव्याने भरण्यात येणा-या पदांवर खालील तक्त्यात नमूद केलेल्या कर्मचारी यांची त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या पदांवर पूर्ण वेळ समायोजन/नेमणूक करण्यास विचारार्थ व मंजूरीसाठी सादर

| Sr. | Post | Position | Currently looking | Qualification | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ITO | Vacant | Jr.Clerk (GAD) Mr.Swapnil Lokhande (Looking ITO Addl.Charge in DIT) | Bsc Computer | Working in Department of IT Since 2014 (7 years) |
| 2 | Data Manager | Vacant | Jr.Clerk (GAD) Mr.Raj chaudhari (Looking Addl.Charge of | B. E. IT | Working in Department of IT Since 2015 (6 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Data Manager in DIT) | | years) |
| 3 | CFC Incharge | Vacant | Jr.Clerk (GAD) Mr.Kamlesh Zanzad (Looking CFC Incharge in DIT) | Diploma in CT | Working in CFC (Hardware and Networking) Since 2004 (17 years) |
| 4 | System Analyst | Vacant | Computer Clerk Mr.Pranay Jaiswal Health(S) (Looking Addl.Charge System analyst in DIT) | MCM | Working in CFC (Hardware and Networking) Since 2004 (17 years)) |
| 5 | IT Enabler | Vacant | Mazdoor (PWD) Mr.Sumeet Mutkure (Looking Addl.Charge IT Enabler in DIT) | BCCA | Working in Department of IT Since 2015(6 years) |
| 6 | IT Enabler | Vacant | Wireman Addl.EEA (Elect.Mr.Siddharth Zhodape) (Looking Addl.Charge IT Enabler in DIT) | ITI Electrical Diploma in Electrical | Working in Department of IT Since 2009 (12 years) |

हस्ता/-सुचक
श्री.सुनिल अग्रवाल

हस्ता/-अनुमोदक
श्री.नागेश सहारे

**ठराव क्रमांक -१७६ अ: -** जुना भंडारा रोड, मेयो हॉस्पीटल चौक ते बगदादीया
**(नगर रचना विभाग)** चौक–सुनिल हॉटेलपर्यंत18.00 मी. रूंद विकास योजना रस्ता रूंदीकरण करणेकरीताआवश्यक जागेचे भुसंपादन प्रस्ताव.

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण–2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 अन्वये निर्णय घेतलेला आहे. सदरहु योजनेतून सदर रस्त्याच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणेकरीता राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी यापूर्वी नागपूर महानगरपालिकेने सर्व साधारण सभेत ठराव क्र. 289, दि. 29.09.2018 पारीत केलेला असून त्यानूसार नगरोत्थान अभियानांतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव शासनास यापूर्वी सादर करण्यात आला असून त्यानूसार उक्त योजनेअंतर्गत शासनाने विषयांकित ररस्त्याच्या

भुसंपादनाकरीता लागणाऱ्या रक्कमेस यापुर्वी शासन निर्णय क्र. नगरो–2018/प्र.क्र. 455/नवि–33, दि. 17.11.2018 अन्वये रू. 185.03 कोटी रक्कमेस प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत महानगरपालिकेचा हिस्सा 30 टक्के याप्रमाणे सदरहु हिस्याची रक्कम रू. 55.51 कोटी एवढी असून नागपूर महानगरपालिका खर्च करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करून हमी देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र. संर्कीण –2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 नूसार राष्ट्रीय महामार्गावरील राबविण्यात येणारे प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण व्हावेत. यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादीत करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेची आहे. त्यामुळे त्या – त्या महापालिकेनी जागा संपादीत कराव्यात व याकरीता या शासन निर्णयाव्दारे निधी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाचे माध्यमातून 70 टक्के राज्य शासन व 30 टक्के मनपा आर्थिक सहभाग या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात येईल.

करीता मौजा – नागपूर, जुना भंडारा रोड मधील मेयो हॉस्पीटल चौक ते बगदादीया चौक–सुनिल हॉटेलपर्यंत18.00 मी रूंद विकास योजना रस्ता रूंदीकरण करणेकरीता अंदाजित रक्कम रू. 185.03 कोटी निधीपैकी 30%रक्कम रू. 55.51 कोटी महानगरपालिकेचा हिस्सा खर्च करण्याचा प्रश्न पुनश्चः सभागृहाने विचारात घेवून **या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

**<u>ठराव क्रमांक १७६ ब:-</u>** मॉडेल मिल ते रामजी वाडी 18.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याच्या रूंदीकरणाकरीताआवश्यक जागेचे भुसंपादन प्रस्ताव.
**(नगर रचना विभाग)**

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण–2017/प्र.क्र.

617/नवि–33, दि. 04.05.2018 अन्वये निर्णय घेतलेला आहे. सदरहु योजनेतून सदर रस्त्याच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणेकरीता राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी यापूर्वी नागपूर महानगरपालिकेने सर्व साधारण सभेत ठराव क्र. 289, दि. 29.09.2018 पारीत केलेला असून त्यानूसार नगरोत्थान अभियानांतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव शासनास यापूर्वी सादर करण्यात आला असून त्यानूसार उक्त योजनेअंतर्गत शासनाने विषयांकित ररस्त्याच्या भुसंपादनाकरीता लागणाऱ्या रक्कमेस यापुर्वी शासन निर्णय क्र. नगरो–2018/प्र.क्र. 467/नवि–33, दि. 18.12.2018 अन्वये रू. 156.83 कोटी रक्कमेस तत्वतः सहमती प्रदान केलेली आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत महानगरपालिकेचा हिस्सा 30 टक्के याप्रमाणे सदरहु हिस्याची रक्कम रू. 47.05 कोटी एवढी असून नागपूर महानगरपालिका खर्च करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करून हमी देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण –2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 नूसार राष्ट्रीय महामार्गावरील राबविण्यात येणारे प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण व्हावेत. यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादीत करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेची आहे. त्यामुळे त्या – त्या महापालिकेनी जागा संपादीत कराव्यात व याकरीता या शासन निर्णयाव्दारे निधी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाचे माध्यमातून 70 टक्के राज्य शासन व 30 टक्के मनपा आर्थिक सहभाग या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात येईल.

करीता मॉडेल मिल ते रामजी वाडीया 18.00 मी रूंद विकास योजना रस्ता रूंदीकरण करणेकरीता अंदाजित रक्कम रू. 156.83 कोटी निधीपैकी 30%रक्कम रू. 47.05 कोटी महानगरपालिकेचा हिस्सा खर्च करणेचा प्रश्न पुनश्चः सभागृहाने विचारात घेवून या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक -१७६ क-:** वर्धा रोड महामार्गावरील प्राईड हॉटेल ते सोनेगांव पोलिस

**(नगर रचना विभाग)** स्टेशन व विवेकानंद नगर चौक ते पॉल कॉम्पलेक्स उड्डाणपुल रॅम्पकरीता38.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याच्या रूंदीकरणाकरीताआवश्यक जागेचे भुसंपादन प्रस्ताव.

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण–2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 अन्वये निर्णय घेतलेला आहे. सदरहु योजनेतून सदर रस्त्याच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणेकरीता राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी यापूर्वी नागपूर महानगरपालिकेने सर्व साधारण सभेत ठराव क्र. 354, दि. 29.01.2019 पारीत केलेला असून त्यानूसार नगरोत्थान अभियानांतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव शासनास यापूर्वी सादर करण्यात आला असून त्यानूसार उक्त योजनेअंतर्गत शासनाने विषयांकित ररस्त्याच्या भुसंपादनाकरीता लागणाऱ्या रक्कमेस यापुर्वी शासन निर्णय क्र. नगरो–2018/प्र.क्र. 465/नवि–33, दि. 18.12.2018 अन्वये रू. 31.94 कोटी रक्कमेस तत्वतः मान्यता प्रदान केलेली आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत महानगरपालिकेचा हिस्सा 30 टक्के याप्रमाणे सदरहु हिस्याची रक्कम रू. 9.582 कोटी एवढी असून नागपूर महानगरपालिका खर्च करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करून हमी देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र. संर्कीण –2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 नूसार राष्ट्रीय महामार्गावरील राबविण्यात येणारे प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण व्हावेत. यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादीत करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेची आहे. त्यामुळे त्या – त्या महापालिकेनी जागा संपादीत कराव्यात व याकरीता या शासन निर्णयाव्दारे निधी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाचे माध्यमातून 70 टक्के राज्य शासन व 30 टक्के मनपा आर्थिक सहभाग या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात येईल.

करीता वर्धा रोड महामार्गावरील प्राईड हॉटेल ते सोनेगांव पोलिस स्टेशन व विवेकानंद नगर चौक ते पॉल कॉम्पलेक्स उड्डाणपुल रॅम्पकरीता 38.00 मी.रूंद विकास योजना रस्ता रूंदीकरण करणेकरीता अंदाजित रक्कम रू. 31.94 कोटी निधीपैकी 30%रक्कम रू. 9.582 कोटी महानगरपालिकेचा हिस्सा खर्च करणेचा प्रश्न पुनश्चः सभागृहाने विचारात घेवून या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १७७ /नोटीस क्रमांक ०८:-**
**(स्थावर विभाग)**
**(मा. श्री. संदीप जोशी)**

"नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र मधील दिनांक १३ सप्टेंबर २०१९ ची अधिसुचना "महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९" च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या स्थावर मालमत्ताचे / भाडेपट्टयाचे नुतनीकरण व हस्तांतरण करण्याबाबत मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या ८ % रक्कम किंवा बाजार भावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे निश्चित करणे. भाडेपट्टाधारकाकडे भाडेपट्टयाची रक्कम थकीत नसावी, कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केलेला नसावा. भाडेपट्टयाची मुदत संपण्यापुर्वी तीन महिन्या अगोदर कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक आहे. भाडेपट्टयाचे नुतीनकरण किमान १० वर्षासाठी करावे. म.न.पा.ची कोणतीही मिळकत हस्तांतरण/तारण/गहाण ठेवता येणार नाही. भाडेपट्टयातील कोणत्याही अटी व शर्तीचा शर्तभंग झाल्यास सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करावी. पूर्व परवानगीने वापर बदल केल्यास भाडेपट्टा रद्द करण्याची कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

वरील अटी प्रमाणे भाडेपट्टयाने दिलेल्या मिळकतीकरिता भाडेपट्टाधारकांकडुन दरवर्षी सध्याच्या प्रचलित भु-भाडे च्या रक्कमेच्या तुलनेत ४०० पटीने भु-भाडे वसूल करावे लागेल. तसेच भाडेपट्टयातील करारनात्याच्या अटीचे उल्लंघन झाल्यास उक्त मिळकत संबंधित भाडेपट्टाधारक/भोगवटादारांकडुन नागपूर महानगरपालिकेस परत घेणे शिवाय पर्याय नाही. उक्त अधिसुचनेतील नियमातील तरतुदी मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही की, एखाद्या भाडेपट्टाधारकाकडुन अनावधानाने भाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झालेला असल्यास भाडेपट्टाधारकांकडुन / भोगवटादारांकडुन अनर्जित रक्कम / प्रशमन शुल्क वसूल करुन भंग केलेल्य अटी व शर्ती नियमानुकुल करता येईल.

करीता यापुर्वी महानगरपालिकेने वेळोवेळी मंजूर केलेल्या ठरावनुसार किंवा त्यात काळानुरुप

आवश्यक बदल करणे व दिनांक १३ सप्टेंबर २०१९ ची अधिसुचना "महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९" नुसार शासनानी लावलेल्या अटी रद्दबादल करणेबाबत शासनास विनंती करणे याबाबत सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून सभागृहाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे या विषयाच्या संदर्भात समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने या विषयाच्या अनुषंगाने सुनावणी घेतलेली असून त्याचा अहवाल मा. महापौर कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे हा नोटीस मागे घेण्यात येतो. मा.सदस्य श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा नोटीस मागे घेण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक १७८ /नोटीस क्रमांक ०९:-**
**(उद्यान विभाग)**
**(मा. श्री. संदीप जोशी)**

नागपूर सुधार प्रन्यास मार्फत मनपाला उद्यान हस्तांतरीत केले असल्याबाबत माहिती आहे. वीर सावरकर उद्यान हस्तांतरीत करीत असतांना नासुप्र लोकाभिमुख निर्णय न घेता उद्यानाचे व्यवसायिकरण करुन मनपाला हस्तांतरीत केले. उद्यानाचा ताबा घेत असतांना नासुप्र चा करारनामा रद्द करुन मनपाच्या धोरणानुसार उद्यान हस्तांतरीत करण्यावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.संदीप जोशी:-मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेचे उद्यान विभाग नागपूर सुधार प्रन्यास कडून उद्यान आपल्याकडे घेत आहे. माझ्या प्रभागात वीर सावरकर उद्यान आहे. ते उद्यान हस्तांतरीत करीत असतांना त्या करारनाम्यासहीत हस्तांतरीत करुन घेत आहे की करारनाम्याशिवाय घेत आहे याची माहिती मला संबंधित विभागाचे उपायुक्त यांच्याकडून हवी आहे.

महापौर:- उपायुक्तांनी माहिती दयावी.

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, सदर उद्यान ताब्यात घेण्याची कार्यवाही २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. याच्यामध्ये वीर सावरकर उद्यान आहे. ते बीओटी तत्वावर असल्यामुळे लेखी कागदपत्रे, पजेशन महानगरपालिकेला देण्यात आले. भौतिकदृष्टया अद्यापपावेतो ते बीओटीवर असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराच्या ताब्यात आहे.

श्री.संदीप जोशी:-मा.महापौरजी, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. या शहरात आपण ५० उद्यान घेतलेली आहे. ती ५० उद्याने नागपुर सुधार प्रन्यासकडे होती. नासुप्रने या उद्यानाची देखभाल करण्याकरिता कंत्राटदाराला दिलेले आहे. वीर सावरकर उद्यानाची स्थिती आज जर बघितली तर अत्यंत भयावह अशी आहे. कंत्राटदाराने त्या उद्यानाचे मेंटेंन्स केलेले नाही. जागोजागी गवत वाढलेले आहे. याची जबाबदारी शेवटी महानगर प्रशासनाची आहे. याच्याशी जनतेला काहीही देणेघेणे नाही की याची देखभाल नागपुर

सुधार प्रन्यास करीत आहे की नागपुर महानगरपालिका करीत आहे. ज्या कंत्राटदाराला या उद्यानाचे मेंटेंन्सचे काम दिले आहे ते त्याने बरोबर केलेले नाही. त्या उद्यानाची परिस्थिती अत्यंत खराब झालेली आहे. अशा परिस्थितीत सर्वसाधारण जनतेने कुणाकडे पाहायचे. अशा परिस्थितीत  तो कंत्राट संपला असेल तर रद्द करावा आणि जर रद्द केला जात नसेल  त्यात प्रशासनाला अडचण असेल तर त्या ठिकाणी ज्यापध्दतीचे काम सुरु आहे ते ताबडतोब दुरुस्त करुन घेण्यात यावे आणि त्या पध्दतीचे आदेश संबंधितांना देण्यात यावे.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मा.संदीपजी जोशी यांनी जो मुद्दा उपस्थित केला. हा नोटीस दिनांक ८.०९ २०२१ च्या सभेतील आहे म्हणजे आजपासून ८ महिन्यापूर्वीचा नोटीस आहे. त्या वेळेला नागपूर महानगरपालिकेला हे उद्यान हस्तांतरीत झाले होते. आज नागपुर सुधार प्रन्यासला सगळे उद्यान टेकओवर करीत आहे. ही आठ महिन्यापूर्वीची स्थिती होती अशी परिस्थिती सगळया उद्यानाची राहू शकते. आपण नागपुर सुधार प्रन्यासकडून उद्यान घेतांना सगळया गोष्टीसह आपल्याकडे उद्यान घ्यावे अशी माझी सुचना या विषयाच्या अनुषंगाने आहे.

श्री.मनोज गावंडे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मला विचारावयाचे आहे की कोणकोणते उद्यान आपल्याकडे आहेत आणि कोणते उद्यान एनआयटीला दिले आहे याची प्रशासनाने माहिती दयावी.

उप महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, दिनांक ०८.०९.२०२१ ला जी सर्वसाधारण सभा झाली. त्यामध्ये ४४ उद्याने  महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याचे निर्देश मा. सभागृहाने दिले होते. आता बीओटीवर ४ उद्याने होती, त्यातील एक आहे वीर सावरकर उद्यान, दुसरे आहे दयानंद पार्क, तिसरे आहे संत तुकाराम आणि चौथे आहे सुरेंद्रनगर. ही चार उद्याने एनआयटी कडे होती आणि त्यांनी बीओटीवर दिलेली होती. मा.सदस्यांनी ज्या बागा एनआयटीकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाली होती ती संख्या विचारली होती मी त्याची माहिती सभागृहामध्ये दिलेली आहे. मुलत: महानगरपालिकेकडे १३१ उद्याने आहेत. त्यातील ३ खाजगी संस्थांना संचालन करण्याकरिता दिले आहे. १० उद्याने महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत देखभाल दुरुस्ती केली जाते. ११८ उद्याने खाजगी कंत्राटदाराकडून फेरफार दुरुस्तीकरिता दिलेली आहेत.

श्री.मनोज गावंडे:- मा.महापौरजी, सध्या आपल्याकडे दिलेली उद्याने एनआयटीला वापस दिलेली आहेत.

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, मागच्या सभेमध्ये  एनआयटीकडून ४४ उद्याने

आपल्या ताब्यात घेण्याचे मा.सभागृहाने निर्देश दिलेले आहे.

श्री.मनोज गावंडे:- मा.महापौरजी, आपण ४४ उद्याने परत केलेली आहेत काय?

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- नाही

श्री.मनोज गावंडे:- त्याचे मेंटेंन्स कोण करीत आहे.

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, ४४ उद्याने हस्तांतरीत करण्याच्या प्रक्रियेमध्ये होते. ती उद्याने आवश्यकतेप्रमाणे कधी कधी महानगरपालिकेने दुरुस्त् केलेली आहेत. संबंधित कंत्राटदाराकडून ती दुरुस्त करुन घेतलेली आहेत.

श्री.संदीप जोशी:- मा.महापौरजी, माझा मुळ प्रश्न् असा आहे. आपण सांगत आहे कंत्राटदाराकडून ती दुरुस्त करुन घेतलेली आहे. चार दिवसापूर्वी गार्डन अधीक्षक त्या ठिकाणी आले होते त्यांनी ती भयंकर परिस्थिती बघितलेली आहे. मागच्या दीड वर्षात त्या ठिकाणी कंत्राटादारांनी काहीही काम केलेले नाही. त्या ठिकाणी संपुर्ण घाण साचलेली आहे. तेथील लोकांना प्रचंड त्रास होत आहे. आपण कुठलया पध्दतीने करुन घेतलेली आहे.

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, जी उद्याने बीओटीवर दिल्या गेली होती त्या उद्यानची फेरफार दुरुस्ती त्या संबंधित बीओटीधारकाची आहे. ती जर केलेली नसेल तर त्याच्या विरोधात दंडात्म्क कार्यवाही नियमानुसार विभागाकडून प्रस्तावित करण्यात येईल.

श्री.संदीप जोशी:- मा.महापौरजी, नियम कुणी ठरविले आहे.

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, ही उद्याने बीओटीवर देत असतांना मुळ करारनाम्यात २० ऑगस्ट् २०२० ला नियम अंतर्भुत केलेले आहेत.

श्री.संदीप जोशी:- मा.महापौरजी, आपल्याला असे म्हणावयाचे आहे काय? की जो करारनामा एनआयटीने केलेले आहे तो करारनामा मला आणि तुम्हांला आणि महानगरपालिकेला बांधील आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय?

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, प्रशासनाला असे म्हणावयाचे नाही तथापि ज्या बागा हस्तांतरीत करुन घ्यावयाच्या असतील त्याचा करारनामाचे जे कंटेन्स कामाचे असतील ते करता येतील आणि जे विरोधात असतील त्याचा पुनर्विचार करता येवू शकतो.

श्री.मनोज गावंडे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, या आधी अशा कंत्राटदारावर कार्यवाही झालेली आहे काय?

उपायुक्त(श्री.रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी,अद्यापपावेतो अशा स्वारुपाची कार्यवाही विभागाने केलेली नाही.

श्री.संदीप जोशी:- मा.महापौरजी, त्या ठिकाणी वीर सावरकर उद्यानामध्ये त्या वस्तीमध्ये असलेल्या प्रमुख गार्डनमध्ये नागपुर सुधार प्रन्यासने केलेल्या करारनाम्याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्या करारनाम्यावर विचार झाल्याशिवाय तो करारनामा स्विकारु नये अशी त्या ठिकाणच्या जनतेची इच्छा आहे. त्यामुळे त्या पध्दतीचे आपण निर्देश दयावेत तसेच तात्काळ त्या जागेची साफसफाई होवून त्याचे मेटेंन्स महानगरपालिकेने करावे अशी आपल्याला नम्र् विनंती करतो.

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, हे जे उद्यान आहेत त्याचा कंत्राटाचा कार्यकाळ किती वर्षाचा आहे. हा कार्यकाळ जर सम्पुष्टांत आला असेल तर त्याला रिनिव्हल परत केलेले आहे काय? जर त्याला एक्स्टेंश्न दिले नसेल तर पुर्ण उद्यानाचा पुनर्विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण ज्या पध्दतीने हे कंत्राटदार त्या उद्यानाचे देखभाल दुरुस्ती करीत आहे ती त्याची जबाबदारी आहे परंतु त्या प्रमाणे ती जबाबदारी पार पाडल्या जात नाही या संदर्भात प्रशासनाच्या वतीने पुनर्विचार करण्यात यावा अशी विनंती आहे.

श्रीमती स्वाती आखतकर :- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझ्या प्रभागात तीन-चार उद्यान असे आहेत की जे एनआयटीच्या अखत्यारित आहेत. त्या ठिकाणी सुंदर उद्याने होती त्या उद्यानाची सुध्दा जंगलासारखी अवस्था झालेली आहे. त्याचे मेंटेंन्स् झालेले नाही या संदर्भात सुध्दा प्रशासनाने उत्तर दयावे.

उपमहापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.प्रदीप पोहाणे:-पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, पुर्ण नागपूर शहरात अंत्यंत सुंदर असा लता मंगेशकर असे उद्यान आहे जे एनआयटीकडून महानगरपालिकेला हस्तांतरीत करुन दीड वर्ष झाले आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने काही काम सुध्दा करण्यात आले आहे.परंतु फुलझाड लावण्याचे काम, गवत लावण्याचे काम जे उरलेले काम आहे ते अद्याप सुरु झालेले नाही. त्या परिसरातील नागरिक ज्यांच्यासाइी ते अंत्यंत महत्वाचे गार्डन असल्यामुळे ते आमच्याकडे येतात आणि सांगतात की अशी सुंदर वास्तुकडे महानगरपालिका दुर्लक्ष करीत असल्यामुळे ते अत्यंत खराब होत चाललेले आहे. आपल्या वतीने प्रशासनाला मला विचारावयाचे आहे की उर्वरित कामे कधी सुरु करणार आहे.

वरील चर्चेनंतर संबंधित सदस्योंने इस विषय पर चर्चा करी, चर्चा का सुर यही है की एनआयटीने नागपुर महानगरपालिका को उद्यान हस्तांतरीत किये थे उसको सभागृह ने निरस्त किया था लेकिन वो उद्यान नागपुर महानगरपालिका के पास मे ही थे, और उस कालावधी मे वह उद्यान की ठीक तरह से

देखभाल  हुई या नही इसपर मुल प्रश्न उठाया गया I मै स्थापत्य व विद्युत प्रकल्प विशेष समिती के माध्यम से यह संपुर्ण उद्यान का निरीक्षण स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीने करना चाहिए और उन्होने संबंधित विभाग को सुचना  देनी चाहिए की किस उद्यान की देखरेख ठीक हुई है या नही हुई है I आनेवाले  ७ दिन के अंदर स्थापत्य व विद्युत प्रकल्प विशेष समितीने इस सारे उद्यान का निरीक्षण करे, दुसरा विषय यह है की हमने बीओटी के आधार पर दिये है, महानगरपालिका ने उस सारी कंत्राट को चेक करना चाहिए जो बीओटी की आधार पर दिये गये है I उसकी लिगल बाजू तपासणी चाहिए और महानगरपालिका की हित के विरुध्द यह सारे निर्णय है तो इस सभागृह मे लाकर उसको निरस्त करने के दिशा मे कार्यवाही करना चाहिए इसीप्रकार से एनआयटी के द्वारा हस्तांतरीत लता मंगेशकर उद्यान जो है उसके जो प्रलंबित काम है वह दृढगती से कार्यान्वित करने के निर्देश यह सभागृह देता है I या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १७९ /नोटीस क्रमांक २०:-** नागपूर मनपा क्षेत्रा अंतर्गत अपार्टमेंट प्लॅन शासन घेतांनी
**(नगर रचना विभाग)** इथल्या सिवर लाईनचे निरीक्षण करण्यात येते का? तसेच
**(मा. श्री. नरेंद्र बोरकर)** बिल्डिंग अपार्टमेंट तयार करतांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व आरोग्य विभाग याची परवानगी (नाहरकत प्रमाणपत्र) घेण्यात येते का? तरी मनपा सभागृहात या संदर्भात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, यह इंडस्ट्रीयल प्रभाग है, यहां टिम्बर मार्केट बडे प्रमाण मे है,  और यहां बहुत पुरानी चार इंची की पाईप लाईन डाली गयी है, टिम्बरवाले आरामशीन बेचकर बाहर जारहे है और वहां पर अपार्टमेंट बना रहे है, मैंने वहां की गडर लाईन चेंज करने का प्रस्ताव महानगरपालिका मे दिया था, अभी वहां जितनी बिल्डींग बनी है, उन बिल्डींगो के गडर लाईन के संदर्भ मे रोज शिकायत आती है, मैं आपसे विनंती करता हुॅ कि, जो लोग नकशे पास करते है, नकशे पास करते वक्त यह देखना चिाहये कि वहां गडर लाईन की व्यवस्था है या नही, उस भाग मे गडर लाईन होना जरुरी है, जहां गडर लाईन के चेंबर्स हो ने चाहिये वह जगह लोग बिल्डर को बेच रहे है, इस पर विचार होना आवश्यक है I

महापौर:- नक्सा सॅग्शन हम टाऊन प्लॉनिंग के माध्यम से करते है जो भी टाऊन प्लॉनिंग विभाग का इन्चार्ज होगा उसने ऑनसर करे

उप संचालक, नगर रचना( श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौर महोदय, मा.सदन. मा.सदस्य श्री.बोरकर यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भात असे आहे की एखाद्या इमारतीचे बांधकामाला परवानगी देण्याच्या आधी त्याचे स्थ्ळ निरीक्षण करीत असतो. स्थळ निरीक्षण करीत असतांना तेथे सिवर लाईनचे कनेक्शन कितपर्यंत आलेले आहे काय? त्याची आपण तपासणी करतो. जर एखाद्या ठिकाणी

सिवरलाईन नसेल तर त्यांना मग त्याची टँक प्रपोज करा म्हणून त्यांना कळवितो त्याप्रमाणे नकाशा मंजुर करण्यात येतो.

महापौर:- हा विषय मुलत: जो शहराचा भाग आहे जो जुनी वस्ती म्हणून आपण ओळखतो. तेथे मोठमोठया प्लॉट वर मोठमोठया हायराईज बिल्डींग तयार होत आहे अशा स्थितीत आपले काय निर्णय आहेत आणि आपली काय कार्यप्रणाली आहे हे आपण सभागृहाच्या समोर आणावे.

उप संचालक, नगर रचना( श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौर महोदय, मा.सदन. एखादया इमारतीला बांधकाम परवानगी दिल्यानंतर जेव्हा ते ऑक्सुपेंसी सर्टीफिकेट घ्यायला येतात तेव्हा झोनचा अहवाल प्राप्त करुन् घेतो की त्याचे जे निकाषाचे कनेक्शन आहे त्याने ते सिवरलाईनला कनेक्ट केलेले आहे किंवा नाही. पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी आहे किंवा नाही. त्यानंतर आम्ही पुढील कार्यवाही करतो.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, नरेंद्र बोरकर साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे की लॅन्ड युज बदलला आता इन्ड्रस्ट्रीयल एरियामध्ये रेसिडेन्सीयल सुध्दा आता सरकारने अलाऊ केले. त्यामध्ये एफएसआय वाढला, त्यामुळे नंबर ऑफ फ्लॅटची संख्या वाढली आणि त्याचा भार आपल्या बेसिक सर्विसवर येत आहे. जुन्या सिवरलाईन असतील ज्या छोटया असतील, ६ इंच, १० इंचीच्या तर आज नवीन इमारती तयार होत असतील तर त्याचा ताण यावर येतो. तर यावर उपाय काय? मा.महापौरजी, एमआरटीपीच्या कलम १२४ अंतर्गत जो आपण डेव्हल्पमेंट फंड वसुल करतो तो त्या एरियामध्ये खर्च झाला पाहिजे. अशा पध्दतीने सिवरलाईनचे मेंटेंन्स जर काम होत असेल तर तो जो बांधकाम व्यावसायिक आहे तो विकास शुल्क महानगरपालिकेत भरतो त्यामुळे महानगरपालिकेची जबाबदारी राहते की त्यासाठी लागणारी बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर जे आहे, सिवरेज डिस्पोजल असेल, जलवाहिन्या असतील किंवा बाकी इतर कोणत्या सुविधा असतील त्या सर्व सुविधा देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. कलम १२४ अंतर्गत विकास निधी महानगरपालिका वसुल करते त्या निधीच्याअनुषंगांने त्यातूनच तो खर्च फॅसिलिटी अव्हेलेबल करुन देण्यासाठी वापरला पाहिजे.

श्री. अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, अत्यंत महत्वाचा विषय मा.बाल्या बोरकर यांनी उपस्थित केला आणि मा. प्रफुल्ल गुडधे यांनी कलम १२४ अंतर्गत जो दाखला देत महत्वाचा भर टाकली. मा.महापौरजी, ही वस्तुस्थिती आहे. ज्या परिस्थितीला आपण सामोरे जात आहे त्यात मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे. आधी ७० टक्के लोक ग्रामीण भागात राहत होते आणि ३० टक्के नागरिक शहरी भागात राहत होते. आता ७० टक्के नागरिक शहरी भागात राहत आहेत. त्यामुळे हा मुद्दा इन्डस्ट्रीयल एरियापुरता मर्यादित नाही आहे किंवा डेन्स पॉप्युलेशन पुरता मर्यादित नाही आहे तर हा संपुर्ण शहराकरिता हा विषय लागू होत आहे. एका बाजू आज महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या माध्यमातून या ठिकाणी समोर आली की महानगरपालिका नकाशा सॅक्शन देते तो चेक

करीत असेल, नसेल हा वादाचा विषय आहे. नियमानुसार त्यांनी चेक करायला पाहिजे. याच्यावर संबंधित बिल्डर बांधकामासाठी मंजुरी घेतो त्यावेळेस त्या ठिकाणी सिवरलाईनची कपॅसिटी चेक करतो काय? त्याचे लोड कपॅसिटी आहे ते चेक करतो काय? जर ती नसतांना आपण १६ मजली इमारतीला परवानगी देतो तेव्हा त्याच्या कनेक्टीव्हीटी च्या अनुषंगाने काही रिप्लेसमेंट करतो काय? हा अतिशय एक महत्वाचा मुद्दा या चर्चेच्या माध्यमातून बाहेर आलेला आहे. मा. गेडाम साहेबांनी सांगितले की चेक करतो आणि त्यांना परवानगी देतो. परंतु परवानगी देण्याच्या आधी त्या लाईनची कपॅसिटीनुसार जो विकास शुल्क येतो त्यातुन काही रिप्लेसमेंटचा प्लॉन होतो काय? हे दोन विषय या चर्चेच्या माध्यमातून आलेले आहेत. त्याबरोबर आज नागपूर शहरातील जो डेव्हलपमेंट प्लॉन आहे तो एनआयटीच्या अंतर्गत येतो. त्यांनी टाकलेली पाईपलाईन आपला विभाग नेहमी जावून चेक करतो काय? ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. नागपूर सुधार प्रन्यासने टाकलेली पाईपलाईनची कपॅसिटी त्याचा ग्रेडीयेंट त्याची कनेक्टीव्हीटी हे बरोबर आहे काय? याची आपल्या विभागाने तपासणी केली पाहिजे. यामध्ये आणखी एक मुद्दा उपस्थित होतो की ऑक्युपेंसी सर्टीफिकेटची, ज्या वेळेला नागपुर सुधार प्रन्यास अंतर्गत विकासकाराला कनेक्टिव्हीटी करावयाची असेल तर नागपुर महानगरपालिकेकडे येतो की नागपुर सुधार प्रन्यासकडे जातो. माझ्या माहितीप्रमाणे नागपुर सुधार प्रन्यासमध्ये माझा एरिया आहे तर त्या ठिकाणी कुणीही नागपुर सुधार प्रन्यासच्या अंतर्गत जे प्लॉट आहे आणि त्याला घर बांधायचे आहे आणि कनेक्टीव्ही करायची असेल तर तो नागपूर महानगरपालिकेकडे येतच नाही. एडीटीपीच्या गेडाम साहेबांनी सांगितले की कनेक्टिव्हीटीसाठी येत असेल तर परंतु त्याचा नागपुर सुधार प्रन्यासचा एरियामध्ये असल्यामुळे तो येणे शक्यच नाही. हेल्थ विभागाकडे तरी अर्ज करतात काय की आम्हांला कनेक्टिव्हीटी करायची आहे. आणि हेल्थ विभाग त्या लाईनची स्टेटस पाहून त्याला कनेक्टिव्हीटी देतात काय? हे सगळेचे सगळे विषय यामध्ये गुंतलेले आहेत मा.महापौरजी, त्यामुळे या संदर्भात एक व्व्यस्थित अभ्यास गट असला पाहिजे. नागपुर सुधार प्रन्यास आणि नागपुर महानगरपालिकेचे कॉर्डीनेशन असले पाहिजे. त्या ठिकाणी नागपुर सुधार प्रन्यासच्या लेआऊटमध्ये कनेक्टिव्हीटी घ्यायची असेल तर नागपूर महानगरपालिकेची एनओसी घेतली पाहिजे या मताचे आम्ही आहोत त्याचे कारण असे की नागपूर महानगरपालिका सिवरलाईन मेटेंन्ट करते. अनेक ठिकाणी एनआयटीने टाकलेलया लाईनमध्ये ग्रेडीयंट सुध्दा सापडत नाही. लाईन टाकून दिली आहे आणि लोकांनी त्या ठिकाणी घरे बांधून घेतलेली आहेत त्यानंतर लक्षात येते की या ठिकाणी ग्रेडीयंट नसल्यामुळे पाणीच पास होत नाही ही सुध्दा वस्तुस्थिती आहे या आऊटर एरियामध्ये आहेत मा.महापौरजी. त्यामुळे आपण निर्देश देतांना या सर्वकष बाबींचा विचार करुन महानगरपालिकेची एनओसी घेतल्याशिवाय एनआयटीच्या क्षेत्रात कुणालाही सिवरलाईनला कनेक्शन देवू नये. एनआयटीने ज्या ठिकाणी सिवरलाईन टाकलेली आहे त्याची तपासणी नागपूर महानगरपालिकेच्या हेल्थ विभागाकडून करुन घ्यावी की ती योग्य आहे किंवा नाही याची शहानिशा करावी. अशा प्रकारची

या विषयाच्या माध्यमातुन सुचना आपल्या समोर मांडतो. धन्यवाद

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मा. बाल्या भाऊ बोरकर यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाला हात घातला आहे. हा विषय नागपूर शहरातील सर्व नागरिकांचा, सर्व नगरसेवकांचा जे आपआपल्या भागात काम करतात त्यांचा अत्यंत महत्वाचा विषय आहे. एका भागात जेव्हा नवीन इमारतीची निर्माण होते, ज्यावेळी एक मोठी टाऊनशिप स्किम निर्माण होते त्या वेळी त्या सर्व रहिवाशी लोकांचा वापर असल्यामुळे त्याचा लोड आपल्या सर्व इन्फीनीटीवर येतो. मग ती सिवरलाईनचा पार्ट असो, वॉटरलाईनचा पार्ट असो की त्याच्या पुढे जावून विद्युत विभाग आहे त्याच्या वरही लोड येतो. ज्या कपॅसिटीचे त्या ठिकाणी ट्रान्सपोर्ट स्टेशन पाहिजे त्या कपॅसिटीचे ते होते किंवा नाही ते तपासले पाहिजे. त्यामुळे मा.महापौरजी, हा विषय आताच गेडाम साहेबांनी सांगितला, ज्यावेळी ऑक्युपेंसी सर्टिफिकेट घेण्यासाठी ज्यावेळी लोक येतात त्यावेळी आम्ही ते तपासतो. मा.महापौरजी, प्रशासनाच्या माध्यमातून मला एक माहिती हवी आहे की या शहरात साधारणत: नागपुर महानगरपालिका आणि नागपुर सुधार प्रन्यास मिळून किती प्लॉट असतील. लहान प्लॉट असलेले किती लोक ऑक्सुपेंसी सर्टीफिकेट घ्यायला येतात. मला सभागृहाच्या माध्यमातून माहिती हवी आहे की गेल्या ५ वर्षात अशा किती लोकांनी ऑक्युपेंसी सर्टीफिकेट घेतलेली आहे याबाबत प्रशासनाने माहिती दयावी.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, हा विषय मी व्यवस्थित खुलासा करुन सांगतो. ज्या सर्विसेस नागपुर महानगरपालिका निर्माण करतात. ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की अभिन्यास मंजुर करतांना सिवरलाईनचे नेटवर्क देतो. सिवरलाईनचे नेटवर्क देत असतांना अभिन्यासातील पाप्युलेशन किती आहे याच्यावर सर्विसेसच्या युटीलिटी निश्चित केल्या जातात. आता एक नव्याने प्रश्न निर्माण झाला आहे. त्या वेळेस नियमाप्रमाणे सर्विसेस निर्माण केलेल्या होत्या त्यात ॲडशनल एफएसआय निर्माण झाला आहे. टीडीआरचे धोरण निर्माण झाले आहे. त्यामुळे तेथे एडिशनल एफएसआय निर्माण झाला आणि टीडीआरचे धोरण निर्माण झाल्यामुळे त्या ठिकाणी अतिरिक्त टीडीआर उपलब्ध करुन दिल्यामुळे त्या भागातील पाप्युलेशन वाढून राहिली आणि त्या वेळेस च्या सर्विसेसवर भार येतो. त्या वेळेस त्या सर्विसेस ॲक्युरेट करणे, अपडेट करणे हा त्यावर एकमेव उपाय आहे मा.महापौरजी. त्यामुळे तेथे या दृष्टीकोनातून आपण प्रशासनाला निर्देश दयावे की ज्या भागामध्ये अशा प्रकारच्या सर्विसेस कमी पडून राहिल्या त्या भागात महानगरपालिका कोणत्या आधारवर एनओसी देणार आहे. त्या ठिकाणी १० इंची पाईपलाईन आहे, ९ इंची पाईपलाईन आहे त्या ठिकाणी संभव नाही. बिल्डींगला सॅग्शन करीत असतांना अशी कुठेही तरतूद नाही की लीज असलेलया प्लॉटला सॅग्शन देवू नये. असा कुठलाही नियम नाही. त्यामुळे मा.महापौरजी, अविनाश ठाकरे यांनी जो प्रश्न उपस्थित केला याचा सर्वकष अभ्यास करुन या संदर्भातील धोरण निश्चित केले पाहिजे. आपल्याला विकास थांबविता येणार नाही. कोणत्याही बिल्डींगला सॅग्शन करतांना थांबविता येणार नाही. कायद्यामध्ये १२४ कलम मध्ये तरतूद केली आहे.

एमआरटी ॲक्टमध्ये तरतूद आहे. अशा पध्दतीच्या सर्विसेस अपग्रेड करण्यासाठी किंवा नव्याने निर्माण करण्यासाठी हा सर्व पैसा आपण दुस-या फंडामध्ये टाकतो. ज्या कामासाठी, ज्या उद्देशासाठी हा पैसा जमा केला जातो त्या उद्देशाची परिपुर्तताच होत नाही. या विषयाच्या अनुषंगाने सर्वकष अभ्यास करुन धोरण निश्चित करावे अशी विनंती आहे.

महापौर:- विषय की गंभीरता देखते हुए प्रशासन को यह निर्देश दिये जाते है की , बाल्या भाऊ निर्देश देत आहे, तुम्हांला काय म्हणायचे आहे ते मला कळले आहे. नागरिकांना त्रास झाला नाही पाहिजे, स्टॅबलिशमेंटमध्ये अडचण नाही आली पाहिजे हेच आपले म्हणणे आहे.

श्री. अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, या सर्व गोष्टीसाठी सिनिअर नगरसेवकांची एक समिती तयार केली तर एक चांगली रुल्स् ऑफ फ्रेम तयार करु शकतो. आपण समिती बनवित असाल तर सिनिअर नगरसेवक यांची अधिकृत समिती तयार झाली तर ते चांगला मार्ग काढू शकतील.

श्री. बाल्या उर्फ नरेंद्र बोरकर:- मा.महापौरजी, हे पास झाल्यानंतर एक प्रत झोनला देण्यात यावी जेणेकरुन झोन आपल्या परिसरातील माहिती देतील. तसेच आमच्या एरियामध्ये इंडस्ट्रीयल आणि कमर्शियल प्लॉट झाले आहेत. इंडस्ट्रीयल आणि कमर्शियल प्लॉट झाल्यानंतर त्यातील पहिला मजला हा कमर्शियल असतो तो रेसिडेन्सीयल नसतो. परंतु तो लोकांना रेसिडेन्सीयल म्हणून विकला आहे. त्याची लीज परत घेण्यात यावी आणि माझ्या भागातील ज्यांनी नकासे पास न करता अपार्टमेंटचे बांधकाम चालू आहे त्याचीही चौकशी करण्यात यावी.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, मा.बाल्या बोरकर यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी सांगतो. टाऊन प्लॉनिंगने नकाश मंजूर केला तर महानगरपालिकेच्या वेबसाईडवर अपलोड करणे गरजेचे आहे किंवा नाही याचे उत्तर देण्यात यावे.

उप संचालक, नगर रचना( श्री. हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, वेबसाईडवर अपलोड करण्याची सुविधा अजूनपर्यंत नाही आहे. अपलोड करणे गरजेचे नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, परंतु एक नकाशा मंजूर झाल्यानंतर महानगरपालिकेच्या वेबसाईडवर प्रसिध्द झाला पाहिजे अशी काही नियमावली आहे ती सध्या माझ्याकडे उपलबध नाही परंतु पुढचया वेळेस ती मी घेवून येईल.

वरील चर्चेनंतर मा.सदस्य बाल्या बोरकर इन्होने एक गंभीर विषय पर चर्चा सभागृह की पटल पर रखी, इसमे सभी सदस्योंने अच्छी तरह से भाग लियाऔर साधकबाधक चर्चा इस पर हुई । महानगरपालिका के इस विषय को लेकर क्या दिशानिती होनी चाहिए, किस प्रकार पॉलिसी होनी चाहिए

इस दृष्टी से महानगरपालिका के माध्यम से स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती के साथ मिलकर के वरिष्ठ सदस्यों की पाच सदस्यीस समिती गठीत करने के निर्देश प्रशासन को दिये जाते है। सन्माननीय सदस्यों के नामो की जानकारी हम प्रशासन को देगें। उसी प्रकार से मा. सदस्य बाल्या बोरकर इन्होने जो शिकायत की है उसपर नियमित प्रशासन का काम होना चाहिए, कोई भी बांधकाम शुरु है तो वह व्यवस्थित शुरु है नियमबाहय बांधकाम तो नही हो रहा है इसबात पर ध्यान दे, प्रशासन ने तुरंत उस परिसर मे जो बांधकाम शुरु है उसकी तसदील करनी चाहिए उसकी जानकारी लेनी चाहिए और जो नियमबाहय काम है उसको तुरंत रोकना चाहिए। या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १८० /नोटीस क्रमांक २२:-** नागपूर शहरामध्ये खड्डे बुजविण्याकरिता किती यंत्रे घेण्यात
**(हॉट मिक्स प्लॉन्ट विभाग)** आलेली आहे आणि ते या यंत्राव्दारे कुठ कुठल्या क्षेत्रामध्ये
**(मा. श्री. प्रदीप पोहाणे)** काम करण्यात येते. तसेच हॉट मिक्स प्लॉन्ट विभागामार्फत या गाडयानी लकडगंज झोनमध्ये किती कामे करण्यात आलेली आहे याबाबत सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयावर मागच्या सभागृहात चर्चा झालेली आहे करिता हा नोटीस मागे घेण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेची सभागृहाने एकमताने नोंद घेतली

**ठराव क्रमांक १८१/नोटीस क्रमांक २३:-** अंबाझरी उद्यान परिसरातील नैसर्गिक जैवविविधता नाहीशी
**(उद्यान विभाग)** करुन कृत्रिम विविधता निर्माण करण्याचा घाट
**(मा. श्री. संदीप सहारे)** उपराजधानीत केल्या जात आहे. त्यासाठी वृक्षसंपदाच नाही. तर तत्कालिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनावर जेसीबी चालविण्यात आला आहे.याबाबत सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीसची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक १८२/नोटीस क्रमांक २४:-** नागपूर महानगरपालिकेतील आर्थिक दुर्बल घटक समितीची
**(स्लम विभाग)** कामे प्रलंबित असून ही विकास कामे सुरु करण्याच्या
**(मा. श्री. तानाजी वनवे)** संदर्भाने याबाबत सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस या विषयावर मागच्या सभागृहात चर्चा झालेली आहे करिता हा नोटीस मागे घेण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेची सभागृहाने एकमताने नोंद घेतली

**ठराव क्रमांक १८३ /नोटीस क्रमांक २५:-** नागपूर महानगरपालिकेतील वर्ष २०२१-२२ अर्थसंकल्पाला **(लोककर्म विभाग)** मंजुरी मिळाली. परंतू प्रलंबित बांधिल खर्चाचे कामे सुरु
**(मा. श्री. तानाजी वनवे)** झालेली नाही. तसेच कार्यादेश देऊन विकास कामे सुरु करण्याच्या संदर्भाने याबाबत सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयावर मागच्या सभागृहात चर्चा

झालेली आहे करिता हा नोटीस मागे घेण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**<u>ठराव क्रमांक १८४ /नोटीस क्रमांक २६</u>:-**
**(घनकचरा व्यवस्थापन विभाग)**
**(मा. श्री. प्रदीप पोहाणे)**

नागपूर शहरामध्ये प्रत्येकाच्या घरी जाऊन कचरा उचलण्याकरिता झोन क्र. ५ ते १० अंतर्गत बी.व्ही.जी. कंपनीला काम दिलेले आहे. त्यांच्या घरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या गाडीमध्ये ओला आणि सुका व घरगुती घातक कचरा (हजार्ड वेस्ट) हा तिसरा डब्बा सुध्दा लावण्यात आलेला होता. सध्या प्रत्येक गाडीमध्ये तो डब्बा अस्तित्वात आहे किंवा नाही आहे. तर त्याचा वापर होत आहे का? आणि डम्पींग यार्डमध्ये तो किती टनात येत आहेत. याबाबतची सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री. प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, ज्या पध्दतीने नागपूर शहरामध्ये ओला आणि सुखा कचरा आपण वेगवेगळा घेतो. तसाच तिसरा डब्बा ज्याच्यामध्ये हजार्ड वेस्ट आपण एकत्रित करतो की नाही याच्यामध्ये यासाठी मी सभागृहामध्ये नोटीस दिला होता त्याचे उत्तर देण्यात यावे. तो जो घरगुती घातक कचरा टाकल्या जातो किंवा नाही. कारण तो कचरा मला काही ठिकाणी दिसतो आणि तो कचरा विकल्या जातो. म्हणून मला प्रशासनाला विचारावयाचे आहे की डम्पींग यार्ड मध्ये किती टन हा कचरा येतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे

उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन (श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. झोन क्र. १ ते झोन क्र. ५ करिता घराघरातून कचरा संकलन करण्याकरिता एजी कंपनी नियुक्त केलेली आहे आणि झोन क्र. ६ ते झोन क्र. १० करिता बीव्हीजी कंपनी कचरा संकलन करण्याकरिता नियुक्त केलेली आहे. प्रत्येक गाडयांना घरगुती घातक कच-याकरिता (हजार्ड वेस्ट) डब्बा स्वतंत्रपणे लावण्याकरिता निर्देश दिलेले आहे आणि त्यांनी ते लावलेले आहे. अशा पध्दतीने ते कचरा डम्पींग यार्डपर्यंत घेवून जातात.

श्री. प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, ज्या प्रमाणे संपुर्ण नागपूर शहरामध्ये ओला आणि सुखा कचरा १२०० ते १३०० मेट्रीक टन येतो तर हा हजार्ड वेस्ट किती टन येतो एवढेच मला विचारावयाचे आहे.

उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन (श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, पर डे ५०० ते ६०० च्या जवळपास असतो.

श्री.नागेश सहारे:- पाईंट ऑफ इनर्फोमेशन मा.महापौरजी, मुझे इस विषय के संदर्भ मे बोलना है । यह बात के लिए मै आपके पास आया था और मा.आयुक्त साहब के तरफ भी गया था। मेरे प्रभाग मे शामबाग मे एक परिसर है जहां सारा कचरा निचे डाला जाता है, जहां से बडे प्रमाण मे दुर्गंधी आती है, मैंने इस संदर्भ मे आयुक्त महोदय से भी बात की है, उस कचरा घर को वहां से हटाने के लिये कहां है, लैकिन उसपर अभी तक कोई कारवाई नही हुई है।

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन (श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, आपण डोअर टू डोअर कचरा संकलन करतो त्या करिता ५ ट्रान्सफर स्टेशन तयार करणार आहोत परंतु जागा उपलब्ध न झाल्यामुळे काही ठिकाणी व्हेयिकल मध्ये कचरा उचलण्यासाठी ट्रान्सफर पाईंट दिलेले आहे. मा. सदस्यांनी ते ट्रान्सफर पाईंट बंद करण्याची विनंती केली आहे. आम्ही सर्वे करुन जागा शोधल्या आहेत काही दिवसानंतर ते बंद करुन ट्रान्सफर पाईंट दुसरीकडे देणार आहे.

श्री.नागेश सहारे:- मा.महापौरजी, माझी विनंती आहे आयुकत महोदय आणि त्यांच्या टिमने या ठिकाणी येवून त्या ठिकाणचा वास घेवून दाखवावा. या परिसरात इतकी दुर्गंधी येत असते की लोकांना जगणे मुश्किल झाले आहे. ही दुर्गंधी माझ्याच परिसरात नाही तरी काही किलोमीटर दूर राहणा-या माझ्या बाजूच्या प्रभागातील नगरसेविका दिव्याताई धुरडे यांना सुध्दा विचारावे की त्यांच्या परिसरात सुध्दा या कच-याची दुर्गधी पसरत असते आणि खुप घाणेरडा वास येत राहतो.

श्रीमती दिव्या धुरडे:- मा.महापौरजी, माझ्या प्रभागाला लागूनच नागेश भाऊचा प्रभाग आहे आणि माझ्या प्रभागात नागेश भाऊच राहणे आहे. यासाठी नागरिकांचे डेप्युटेशन येत असते आणि परिसरात इतकी दुर्गधी पसरलेली आहे की माझ्या घरापर्यंत वास येतो. आणि नागरिकांचे त्या ठिकाणी राहणे आणि जगणे मुश्किल झाले आहे. इतका भयानक वास आहे की आपण तेथुन जावू शकत नाही. महानगरपालिकेकडून दुसरी जागा देण्यात यावी. आम्ही प्रभाग समितीमध्ये सुध्दा हा विषय मांडला आहे. त्यांचे म्हणणे आहे की महानगरपालिकेने आम्हांला दुसरी जागा दयावी त्या ठिकाणी इतकी दुर्गंधी पसरलेली आहे की त्या ठिकाणी मेलेले जनावरे, वेस्ट मटेरियल टाकण्यात येते. आठ दिवसापासून आमचे सांगणे आहे परंतु अजूनपर्यंत त्यावर कार्यवाही झालेली नाही आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे की किती दिवसात हलविणार आहे.

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, आता नागेश सहारे आणि दिव्याताई धुरडे यांनी जो प्रश्न मांडला तो माझाही प्रभाग आहे. याच्यामध्ये त्या दिवशी प्रभाग समितीमध्ये सुध्दा चर्चा झाली. तो पाईंट ताबडतोब हटविण्यात यावा. त्या ठिकाणी लोकांना खुप त्रास आहे. आपण त्या ठिकाणी वाटोळयाकडे डम्पींग सेंटरच्या जवळपास जी जागा आहे तो स्पॉट ताबडतोब हटविला पाहिजे. त्या ठिकाणी कचरा

आणि माती मिक्सींगचे सुध्दा काम होते. त्यामुळे ताबडतोब तो पाईंट हटविण्याचे आदेश आपण प्रशासनाला दयावे.

श्री.नागेश सहारे:- मा.महापौरजी, एक महिन्याआधी आयुक्त साहेबांना सांगितले होते. एक महिन्याआधी त्यांनी कां केले नाही याचे उत्तर मला पाहिजे आहे. आम्ही सर्व नगरसेवकांनी आयुक्त साहेबांना प्रश्न केला होता की किती दिवसात करणार आहे. आयुक्त साहेबांना विचारावयाचे आहे की त्यांनी एक महिन्यापूर्वी सांगितल्यावरही कां केले नाही.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन (श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, आम्ही दोन-तीन जागेची पाहणी केलेली आहे. वाटोळयाची एक जागा जवळपास फायनल झालेली आहे. आम्ही इथले ट्रान्सफर पाईंट तिकडे घेवून जावू.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय नगरसेवक या विषयाच्या संदर्भात मागच्या बैठकीत सविस्तर निवेदन केले यांचा स्पेसिफिक विषय माहित नाही. परंतु प्रत्येक नगरसेवकांच्या ज्या जनरल समस्या आहेत. प्रत्येक नगरसेवकाला वाटते की त्यांच्या एरियामध्ये ट्रान्सफर पाईंट नको. कचरा मात्र प्रत्येकाच्या घरोघरी जावून दररोज वेळेवर उचलला गेला पाहिजे. अशा प्रकारचे कोणीही कधीही ऑपरेट होवू शकत नाही. आपण समजून घेतले पाहिजे या सिस्टीममध्ये जे छोटे हाथगाडी आहे त्यातुन घरोघरी जावून कचरा कलेक्ट करतो. नंतर कॉम्पेक्टरमध्ये चेंज करतो तसे एखादे लोकेशन असले पाहिजे. प्रत्येक प्रभागामध्ये त्या लोकेशनमध्ये ४०,५०, १०० गाडी ठेवलेले असणार आणि ते प्रभागावाईज गाडी येणारच. १००टक्के एका प्रभागामध्ये ट्रान्सफर सेंटर राहणार आपण मागच्या सभागृहामध्ये ट्रान्सफर स्टेशनची किती आवश्यक आहे यावर चर्चा केली आहे. एखाद्या नगरसेवकांला ते लोकेशन नको असेल तर आमची विनंती आहे त्यांनी पर्यायी जागा दाखवावी. त्या ठिकाणी आम्ही करण्यास तयार आहे. पर्यायी जागा एकदम प्रभागाच्या बाहेर असेल तर ही व्यावहारिक गोष्ट होणार नाही. ते करणे शक्य नाही आहे. त्याचा परिणाम काय होणार आहे आपल्या नागरिकांना त्या ठिकाणापर्यंत गाडी जावून अनलोड होवून वापस येईपर्यंत प्रत्येकाच्या घरी सेम डे पोहचणे शक्य होणार नाही. त्याचा परिणाम लोक गाडीची वाट बघत बघत परत बाहेर कचरा डम्पिंग करतील. त्याचा परिणाम भरपुर ब्लॅक स्पॉट निर्माण होतील. माझी विनंती आहे आपण जेथे पॉसिबल आहे तेथे करतो आहे. आपल्याकडून अपेक्षा एवढीच आहे आपल्याला एखाद्या ठिकाणी चुकीचे वाटते त्याच्या बाजूच्या ठिकाणी जागा आयडेंटीफाय करुन दाखवावी. त्याच्या शिवाय या सिस्टीम मध्ये ते शक्य नाही आहे. छोटया छोटया गाडया भांडेवाडीला झोनमधुन यायला पाहिजे ते प्रॅक्टीकली ते पॉसीबल नाही आहे. त्यामुळे प्रत्येक नगरसेवक ही गोष्ट घेवून माझ्याकडे येतो त्यांना मी एकच गोष्ट रेफर करतो. तुम्हांला त्या ठिकाणी अडचण वाटत असेल तर आजू बाजूला ५०० मीटर, १ किलोमीटरच्या अंतरावर करीत

असाल तर तर हलविण्यास काही हरकत नाही. त्यातला महत्वाचा मुद्दा असा आहे त्या ठिकाणची क्लीनिंग मेटेंन्स करणे आवश्यक आहे. ट्रान्सफर स्टेशन झाल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही आहे. नागेश सहारे यांची अडचण मी बघतो आणि त्यांना जे काही प्रॅक्टीकली सोल्युशन होवू शकते ते प्रशासन करण्यास तयार आहे. परंतु प्रत्येकाला अडीअडचणी वाटते परंतु प्रॅक्टीकली ते शक्य नाही.

श्री.नागेश सहारे:- मा.महापौरजी, माझी विनंती आहे, आयुक्त साहेबांनी त्या ठिकाणी येवून एकदा वास घेवून दाखवावा मी एक शब्द बोलणार नाही.

निगम आयुक्त:- मी आपल्याकडे येतो.

श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, मागच्या वेळेस डम्पिंग यार्डच्या वासावरती चर्चा झाली होती. तो अद्यापही वास येते आहे. परंतु माझा दुसरा असा प्रश्न असा होता की बीव्हीजी कंपनीने जो तिसरा डब्बा लावावयाचा होता हजार्ड वेस्टचा तो डब्बा लावलेला आहे काय, लावला असेल तर मला त्याचा फोटो काढून वाटस्अप करण्यात यावा. मा.महापौरजी, माझा स्पष्ट आरोप आहे की एजी कंपनी असो वा बीव्हीजी कंपनी असो त्यांनी तो तिसरा डब्बा लावलेला नाही. प्रशासनाने उत्तर दिले की हेजार्ड वेस्ट पर डे ५०० ते १००० किलो जमा होतो. डम्पींग यार्ड ला जर १२०० ते १३०० मेट्रीक टन कचरा जर रोज जमा होत असेल तर हेजार्ड वेस्ट १००० मॅट्रीक अन डम्पींग यार्डला जमा झाला पाहिजे असे मला वाटते. मा.महापौरजी, प्रश्न विचारण्याचा मागे माझा असा उद्देश आहे की हा १००० मेट्रीक टन कचरा जर लोहालोखंडचे भाव म्हणा की कबाडीवाल्याचे भाव म्हणा, जर २० रुपये प्रति किलोने पकडला तर रोजची २० लक्ष रुपयाची आवक महानगरपालिकेला होवू शकते. हा प्रश्न विचारण्यामागचा माझा उद्देश होता. मा.महापौरजी, तिसरा डब्बा जर गाडीला अस्तित्वात असेल तर त्याचे फोटो मला देण्यात यावे एवढाचा माझा प्रश्न होता. मा.महापौरजी, मी आपल्याला सांगू इच्छितो कि, डम्पींग यार्डच्या वासाबद्दल मागे चर्चा केली होती. डम्पींग यार्डचा अद्यापही वास आमच्याकडे येतो आहे एवढेच म्हणणे होते मा.महापौरजी.

महापौर:- सन्माननीय सदस्य ने जो विषय उठाया हजार्ड वेस्ट का वह बडा ही संवेदनशील विषय है, प्रशासनने उसको गंभीरता से लेना चाहिए।

श्री.सुनिल अग्रवाल:- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी, नागेश सहारे इन्होने जो विषय उठाया था उस मा.आयुक्त ने जो उत्तर दिया उसमे उन्होने जो बात रखी, अगर जगह दुसरी तरफ मिली तो शिफ्ट करेंगे, इसका मतलब यह नही की जिस जगह कचरा डम्पींग हो रहा है उसको दो-दो दिन, चार-चार दिन उठाया न जाये, वहा की साफसफाई न की जाये। मेरा यह कहना है की नागेशजी सरल और स्पष्ट एक प्रश्न था जहां डम्पींग हो रही है वहां पर क्लिनींग बरोबर होनी चाहिए। वहां के कचरे की लिफटींग प्रापर समय पर होनी चाहिए।

श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने एक सुचना अशी आहे, मागे आपण या संदर्भाने चर्चा केली होती. स्टेट गर्व्हमेंटच्या माध्यमातून अशा कच-याची विल्हेवाट करतांना एक प्लॉट जागा आपल्या महानगरपालिकेची आणि प्रायव्हेट कंपनीच्या माध्यमातून विल्हेवाट लावण्यासाठी प्लाँट लावण्यात यावा असा एक प्रस्ताव आला होता. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना नोटींगकरिता पाठविण्यात आला होता. तो आयुक्तांना सुध्दा पाठविला होता. त्या अनुषंगाने याचा विचार करुन कशा पध्दतीने व्यवस्था करावयाची असेल तर हा कचरा इमानदारीने उचलला गेला पाहिजे त्यामध्ये कोणत्या प्रकारची चोरी झाली नाही पाहिजे. भविष्यकाळात हा फार मोठा इंक्म ऑफ सोर्स होवू शकतो. तशा पध्दतीचा उललेख करुन मा.महापौरजी आपण प्रशासनाला निर्देश दयावे.

वरील चर्चेनंतर सत्यमेव जयते एक सिरीयल टीव्हीपर आता था, उसमे एक शिक्षक जो तामीलनाडु मे एक ग्रामपंचायत मे कचरे पर काम करता था उसका प्रेझेन्टेशन बहोत सुंदर हुआ था, जिसे नागपुर महानगरपालिका ने वाल्मीकी नगर विद्यालय मे बुलाया था, उस व्यक्तीने बहोत सुंदर बात कही थी। कचरा जो है यह संपत्ती है लेकिन केवल आठ घंटे तक, आठ घंट के बाद कचरा यह गंदगी मे तब्दील हो जाता है। इस आठ घंटे मे ही उसकी ठीक त-हेसे विल्हेवाट की गई तो हमारे लिए आर्थिक अर्थाजन का एक साधन बन सकता है। और आठ घंटे बाद उसमे फरमेंटेन शुरु हो गया तो सारी गंदगी और मिथेन को पैदा करने वाली एक वस्तु बन जाता है। उस व्यक्ती का प्रेझेन्टेशन मुझे देखे हुए आठ-दस वर्ष हो गये और हमारे उस महानगरपालिका के स्कुल परिसर मे ही झाड से गिरने वाली पत्तीयो को कैसे खाद मे परावर्तीत कर सकते है इसका प्रेझेन्टेशन भी उस सज्जन ने वहां पर दिया था। यह उदाहरण बताने का मुल कारण यह है की कचरा है यह संपत्ती है हस दिशा को ध्यान मे रखते हुए हम काम करे और कचरे की विल्हेवाट वैज्ञानिक पध्दती से होनी चाहिए इस दिशा को हम ध्यान दे तो सचमुच मे इस संपुर्ण समस्या का निराकरण हो सकता है। नागेशजी सहारे ने जिस जगह का उल्लेख किया, वहां पर व्यक्तिगत तौर पर दो-तीन बार जा चुका हूँ, संबंधित प्रशासन ने उस जगह को वहां से स्थानांतरीत करने का निर्णय लिया है, परंतु जहां पर स्थानांतरीत होगी वहां पर इस प्रकार की अडचण आनेवाली है। इसमे सबसे पहली यह बात है की जिस सरफेस पर हम कचरा डालते है वह मिट्टी की फ्लोर नही होनी चाहिए वह क्रॉक्रींट की फ्लोर होनी चाहिए, जिसकी नियमित सफाई हो सके, इसका विशेष रुप से हम जहां भी जायेगें हमने उसका नियोजन करना चाहिए। दुसरी बात, इसमे बारीश मे कचरा गीला नही होना चाहिए, इसलिए भी नियोजन होना चाहिए, उसपर शेड होना चाहिए। एक बार बारीश मे कचरा गीला हुआ तो उसकी बदबु बहोत बडे प्रमाण मे चलती है और वारंवारं यह विषय सभागृह मे चर्चा के लिए आता है। इसलिये संबंधित एजन्सी को जहां भी हमने जगह उपलब्ध कराके दी है उसका फ्लोर प्रापर होना चाहिए, उसकी क्लिनिंग प्रापर होनी चाहिए और जिस समय का कचरा है उस समय उस कचरे की सफाई होनी चाहिए। कचरा एक दिन, दो दिन नही पडा रहना चाहिए। संबंधित व्यक्ती ने आठ घंटे बाद वह गंदगी हो जाता है ऐसा बोला है तो आठ घंटे होने के पहिले वह कचरा साफ होना चाहिए और आज के कचरे पर

कल का कचरा नही गिरना चाहिए I केवल इतना भी नियोजन हमने ठीक तरह से किया तो इस बदबु से निजात पाई जा सकती है I नागेशजी के परिक्षेत्र का कचरा जल्द से जल्द साफ किया जाये इसप्रकार के निर्देश दिये जाते है, उसे स्थालांतरीत करने के विषय प्रशासन ने कहां है उसको दृढगतीसे किया जाये ऐसे निर्देश दिये जाते है और अविनाश ठाकरेजी ने जो विषय रखा है, वर्तमान मे महानगरपालिका की दृष्टी से अनेक प्रकल्प हो रहे है, उस प्रकल्प के लेकर केंद्र से निधी भी उपलब्ध हो रही है I महानगरपालिका की अर्थाजन की दृष्टी से इस विषय को ग्राहय करे और इस दिशा मे कार्य करे ऐसे निर्देश दिये जाते है I जो मुल विषय यहा पर उठाया गया है वह विषय हजार्ड वेस्ट के विषय मे था, प्रशासन ने जो आकडा दिया है की ५०० से १००० टन हजार्ड वेस्ट आता है वह गलत आकडा प्रशासन ने दिया है यह कहने मे कोई भी गलती नही होगी I प्रशासन इस बात पर फिर से ध्यान दे की इसप्रकार की गलत सुचना सभागृह मे नही होनी चाहिए I और उन्होने बडा सुंदर ऑब्शन दिया है की गाडी मे डब्बा लगा है तो उसका फोटो मुझे भेज दे I प्रदीपजी यह रुलिंग तो नही है पर मै आप से कहना चाहता हूॅ की कल आप डॉ.महल्ले को फोन करके बुलायें और आप को जहां जाना है उस जगह पर जाके गाडी को चेक किजीये और उनके सामने उनके उपस्थिती मे उनके साथ आप सेल्फी निकाले और अगर वह व्यवस्था पुरी नही है तो आयुक्त महोदय को इसकी सुचना दिजीये, आयुक्त महोदय उन सारी बातों को विशेष रुप से व्यक्तिगत ध्यान देगें, और अगर कंपनी अपने एग्रीमेंट के विपरीत काम कर रही है तो उसपर कार्यवाही भी करेंगे इसप्रकार से निर्देश दिये जाते है I या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १८५ /नोटीस क्रमांक २७:-</u>** नागपूर शहरातील विस्तृत पार्किंग व्यवस्थापनाच्या
**(वाहतूक विभाग)** आराखडया संदर्भात तसेच जंक्शन इंम्प्रूव्हमेंट प्लान अंतर्गत
**(मा. सौ. आभा पांडे)** मे अर्बन मास ट्रांन्झीट कंपनी लिमिटेड हैद्राबादच्या व्दारे नागपूर शहराच्या विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडया जो तयार करण्यात आला आहे / करण्यात येत असून हयाबाबत संपूर्ण सखोल चर्चेकरिता सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, नागपूर शहरातील विस्तृत पार्किंग व्यवस्थापनाच्या आराखडया संदर्भात तसेच जंक्शन इंम्प्रुव्हमेंट प्लॉन अंतर्गत मे अर्बन मास ट्रांन्झीट कंपनी लिमीटेड हैद्राबादच्या द्वारे नागपूर शहराच्या विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडा जो तयार करण्यात आला आहे त्याबद्दल मला काही मुद्दे मांडावयाचे आहेत. अडीज महिन्याआधी एक प्रेझेनटेशन द्यायला आदरणीय देशपाडे साहेब जी मास ट्रांन्झीट कंपनी आहे त्या कंपनीच्या प्रतिनिधीसोबत सतरंजीपुरा झोनला आले. सादरीकरणाला सुरुवात करण्यात आली तेव्हा माझ्या असे लक्षात आले की शहराच्या त्या भागाकरिता कंपनीने आराखडा तयार केलेला आहे ज्या भागात वर्दळ जास्त नाही आहे. पार्किंग करायची आहे तर संपुर्ण शहरात झाली पाहिजे. आपण त्यांना ते काम त्याच दृष्टीने दिले आहे. परंतु सतरंजीपुरा झोनमध्ये सादरीकरण करीत असतांना मीच त्यांना प्रश्न विचारला की यात एरियातील मुख्य बाजारपेठाचा

समावेश केलेला आहे काय ? आठवडी बाजारपेठांचा समावेश केलेला आहे काय? मा.महापौरजी, त्यांच्यासमोर प्रश्नचिन्ह होता त्यांनी सांगितले की बाजारपेठा आम्ही घेतलेल्या नाही. मी त्यांना विचारले की सतरंजीपुरा झोन मधून आणि गांधीबाग झोनमधून कोणकोणते एरिया घेतलेले आहे त्यांच्या प्रतिनिधींनी देशपांडे साहेबांसमोर स्पष्ट सांगितले की सतरंजीपुरा झोन मधील एकही रस्ता आम्ही पार्किंगकरिता घेतलेला नाही. मी म्हटले की जर पार्किंग व्यवस्थापन आराखडा तयार करण्याकरिता सांगितले असेल तर तुमच्याकडे प्रस्ताव कोण तयार करतो, कारण मुख्य रस्त्याला जोडलेले रस्ते आहेत त्यावर अभ्यास करावा आणि लगेचच प्रस्ताव तयार करावा. रस्त्याची मालकी आणि अंतर्गत हद्दीतील पार्किंगची मागणी इ. गोष्टी लक्षात घेवून व्यवस्थापन आराखडा कार्यान्वित करण्याकरिता प्रशासनाने नस्ती बनवून देणे. मा.महापौरजी, सतरंजीपुरा झोनमध्ये सादरीकरण होत असतांना इतवारी आणि गांधीबाग एरियामध्ये आपला सुध्दा प्रभाग येतो त्या झोनमध्ये सुध्दा ज्या बाजारपेठेतील रस्ते आहेत त्याची पार्किंगची व्यवस्था ही कंपनी केव्हा करेल आणि महानगरपालिका केव्हा करेल त्याच्या बाबतीत या कंपनीकडे कोणताही खुलासा नव्हता. मी त्यांना म्हटले की तुम्ही सतरंजीपुरा झोन अंतर्गत एकही बाजारपेठा आणि एकही रस्ता घेतलेला नाही तर तुम्ही सादरीकरण कसे केले. मा.महापौरजी, मी प्रशासनाला विचारु इच्छिते की जेव्हापासून या कंपनीला काम दिलेले आहे. तेवहापासुन या कंपनीना आतापर्यंत किती निधीचे भुगतान केलेले आहे.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

वाहतुक अभियंता (श्री.देशपांडे):-मा.महापौरजी, मा.सदन, एक जनहित याचिका २०१६ वाहतुकीची कोंडी निर्माण झाल्याच्या अनुषंगाने दाखल करण्यात आली होती. रस्ते व रस्त्याच्या कडेला वाहनतळ सध्या स्थितीत पार्किंगची अडचण लक्षात घेवून पार्किंग व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे ठरविण्यात आले. नागपूर महानगरपालिकेने पार्किग व्यवस्थापन धोरण २०१६ मध्ये तयार केले.

महापौरः- देशपांडेजी त्यांचा प्रश्न नेमका एवढाच आहे की कंपनीला पेमेंट दिला काय ? जर दिला तर किती पेमेंट आतापर्यंत दिलेला आहे.

वाहतुक अभियंता (श्री.देशपांडे):- मा.महापौरजी, २०१६मध्ये ६० लक्ष ११ हजार पेमंट करण्यात आला आहे. आणि ऑनसाईड पार्किंग करण्यासाठी ६६ लक्ष त्यांना पेमेंट करण्यात आला आहे. १६.२२ लक्ष बॅलेन्स राहिलेले आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, देशपांडे साहेबांनी आता वक्तव्य केले पंरतु या कंपनीला काम देण्यात आले आणि सांगण्यात आले की वाहतुकीची कोंडी निर्माण झाल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने मुंबई, नागपुर खंडपीठ जनहित याचिका २०१६ मध्ये दाखल केली होती. मा.उच्च

न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वाहतुकीची कोंडी समपुष्टात आणण्याकरिता पार्किंग व्यवस्थापनआराखडा तयार करण्याकरिता ही कंपनी आवंटीत करण्यात आली मान्य आहे मा.महापौरजी, या कंपनीला फक्त आणि फक्त मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कोणतीही निविदा न बोलाविता वाहतुकीची कोंडी निर्माण झाल्यामुळे मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी जनहित याचिकेच्या निर्देशाप्रमाणे पार्किंग व्यवस्था करणे योग्य होईल. ज्या भावनेने आपण विचार करीत आहे की संपुर्ण नागपूर शहरात चांगली पार्किंगची व्यवस्था निर्माण होईल याबाबतीत मी सहमत आहे. परंतु फक्त मा.न्यायालयाचे आदेश असल्यामुळे त्या कंपनीला गडबडीने काम दिले असा माझा आरोप आहे. आरोप यासाठी आहे की ज्याप्रमाणे त्यांनी सगळया बाजारपेठा सोडल्या. मा.महापौरजी, पश्चिम नागपूरात मोठमोठे रस्ते आहेत १८-१८ फुटाचे रस्ते आहे तसेच झोन अंतर्गत जे रस्ते येतात त्या ठिकाणी किती वाहतुकीची कोंडी आहे. हे आपल्याकडे सुध्दा आहे आणि आमच्याकडे सुध्दा आहे. त्या अनुषंगाने नेहमी तक्रारी येत असतात. जर कंपनीने आराखडा तयार करीत असतांना झोन अंतर्गत येणा-या बाजारपेठा सोडल्या, रस्ते सोडले तर आपले अधिकारी व कर्मचारी झोपले होते काय? कारण शेवटी आपल्या शहरातील वाहतुक कोंडीचा प्रश्न हा फार गंभीर प्रश्न आहे. याबाबत नियोजन असणे आवश्यक आहे. अनेक मृत्यूमुखी पडले आहे. अनेक लोकांचे अॅक्सीडेंट झाले आहे तरी सुध्दा प्रशासनाने ही दखल कां घेतली नाही. महानगरपालिकेच्या प्रशासनाने सादरीकरणाच्या आधी कंपनीला ६६ लक्ष पेमेंट देवून टाकले. एका हाऊसमध्ये मा.महापौरजी, आपण निवेदन केले होते, आपण असे वक्तव्य केले आणि निर्देश दिले होते की प्रत्येक झोनमध्ये जावून हे सादरीकरण करुन यावे. त्याकरिता मा.महापौरजी आपले धन्यवाद करते. परंतु सादरीकरण जेव्हा होते तेव्हा आमच्या लक्षात येते की याच्या मध्ये सतरंजीपुरा झोनमध्ये सादरीकरण करीत असतांना झोन अंतर्गत रस्ते सोडून दिले. म्हणजे सतरंजीपुरा झोन मध्ये वाहतुकीची कोंडी होणार नाही काय? कुठे तरी याची गंभीर दखल आपल्याला घ्यावी लागणार आहे. कारण या कंपनीला किती रुपये दिले याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पश्चिम नागपूरमधून मी निवेदन केले हा माझाच प्रश्न नाही तर नरेंद्र बोरकर यांच्या भागातील रस्ते आहेत जे इंडस्ट्रीयल एरियात आहेत त्या ठिकाणी सुध्दा कोंडी होते. सगळया जनप्रतिनिधींना आपले विरोधी पक्ष नेता असो की इतर जनप्रतिनिधी असो, सगळया जनप्रतिनिधींनी सांगितले की त्यांच्या भागात वाहतुकीची कोंडी होते. त्या झोन अंतर्गत महानगरपालिकेने या कंपनीला काम दिले. या कंपनीने अपुर्ण काम केले, सादरीकरण बरोबर केले नाही हा माझा मुळ प्रश्न आहे. जे सादरीकरण झाले ज्या बार्बी प्रशासनाने आणि सोबत त्या कंपनीने सतरंजीपुरा, लकडगंज आणि गांधीबाग झोन अंतर्गत संबंधित रस्त्याचा आराखडा बनविला याबाबतचे निवेदन केले ते अत्यंत अयोग्य आहे. आराखडा तयार करीत असतांना कोणकोणत्या जनप्रतिनिधींना बोलाविले होते, कुणाचे मत जाणून घेतले होते. मी आपल्याला विनंती करते की या विषयाची आपण दखल घ्यावी. नाही तर आम्ही प्रशासनाच्या विरोधात, आपल्या विरोधात आंदोजन करु. ज्या कंपनीने हा आराखडा तयार केलेला आहे तो अयोग्य आहे असा माझा क्लिअर आरोप आहे. आपल्या माध्यमातून प्रशासनानी निवेदन करावे अशी अपेक्षा आहे.

प्रशासनाने आपले निवेदन करावे अशी विनंती करते.

महापौरः- प्रशासनाने निवेदन करावे.

वाहतुक अभियंता (श्री.देशपांडे):- मा.महापौरजी, मा.सदन. वाहतुकीची कोंडी दूर व्हावी त्या अंतर्गत हे काम केले. त्याचा अभ्यास केला त्याच्या अगोदर आराखडा तयार केला त्या संदर्भात प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करुन महानगरपालिकेच्या अधिका-यांशी प्रत्यक्ष बैठक झाली होती. त्यानुसार १८ मीटर व त्याच्या वरचे रस्ते ऑनस्ट्रीट पार्किंगकरिता रिकमंड करावयाचे होते. १८ मीटर पेक्षा कमी रुंदीचे जर रस्ते असेल तर त्या रस्त्याच्या बाजूला आपण जर ऑनस्ट्रीट पार्किंग दिली तर वाहतुकीची कोंडी दूर होवू शकते. इंनडस्ट्रीयल एरियामध्ये जास्त डेनसिटी असल्यामुळे ऑनस्ट्रीट पार्किंग दिली तर वाहतुकीची कोंडी दूर होवू शकते. ऑफस्ट्रीट पार्किंग सुध्दा त्या एरियामध्ये डेव्हल्प करु शकतो याचा सुध्दा अभ्यास करुन ते देण्यास तयार आहेत.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, मा. देशपांडे यांनी निवेदन केले त्या कंपनीने वाहतुकीचा आराखडा तयार केला आहे परंतु ज्या ठिकाणी वर्दळ आहे, बाजारपेठा आहेत हा विषय थोडा वेगळा आहे. हा विषय वेगळा असला तरी ती कंपनी करणार नाही आहे काय? मा.महापौरजी, आपण प्रशासनाला निर्देश दयावे. प्रशासन घुमवाघुमवी करण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण प्रशासनाला स्पष्ट निर्देश दयावे, जेथे जेथे वाहतुकीची कोंडी आहे त्या ठिकाणचा वाहतुकीचा आराखडा तयार करावा.

वरील चर्चेनंतर संबंधित सदस्य ने पार्किंग के विषय पर सभागृह मे चर्चा की, नागपुर महानगरपालिका के रेव्हेन्यु जनरेट होने के दृष्टी से पार्किंग नितांत आवश्यक बाब है l नागरिक सुविधा के दृष्टी से भी नितांत आवश्यक बाब है l मुझे अच्छे से यह बात याद है की सभागृह मे सबसे पहले पार्किंग को लेकर विस्तृत अहवाल और विस्तृत प्रस्ताव मनुकुमार श्रीवास्तव वह नागपुर शहर के म्युनिसिपल कमिश्नर थे तब उस वक्त आया था l और उस समय से लेकर आज तक बारबार महानगरपालिका के सभागृह मे प्रस्ताव आता है और किसी ना किसी वजह से उसको निरस्त करके वापस भेज देते है और आर्थिक उत्पन्न के बहोत बडे स्तोत्र को और शहर की सुविधा के लिए उत्पन्न होने वाले एक रास्ते को कही ना कही हम रोकने का प्रयास करते है l इस समय भी यह विशेष सभागृह मे आया मेरी व्यक्तीगत मान्यता यह थी की जब तक नगरसेवक इस का व्यक्तीगत अध्ययन नही करते , उसको देख ना ले तब तक सभागृह के पटल पर नही रखना चाहिए l इसीलिए प्रशासन के माध्यम से हमने ऐसे निर्देश दिये की प्रत्येक झोन मे इसका प्रेझेन्टेशन होना चाहिए जिससे नगरसेवकों का पार्टीसिपेशन हो जाये और उनका कहना भी इसके अंतर्गत आ जाये l यह बहोत स्पष्ट तरीके से उल्लेखित है की इसमे ऑफ स्ट्रीट पार्किंग और ऑन स्ट्रीट पार्किंग ऐसे दो पार्ट है और ऑन स्ट्रीट पार्किंग वही हो सकती है जहां रस्तोंकी चौडाई ज्यादा हो, जहां रस्ते छोटे है वहा पर हमने ऑन स्ट्रीट पार्किंग की तो फिजीबल नही होगी l इस दृष्टी से बडे रस्तो का इसमे चयन किया गया, शहर के अंतर्गत

भाग मे जिसे मै इतवारी, गांधीबाग या महाल  जहां के रास्ते छोटे है, यहा पर ऑफ स्ट्रीट पार्किंग की ही व्यवस्था करनी पडेगी और वहां पर जगह उपलब्ध है तो ऑफ स्ट्रीट पार्किंग हो सकेगी ऐसी इस प्रकल्प की विषय की मुलधारणा है ।  वर्तमान मे इन्होने ऑन स्ट्रीट पार्किंग और ऑफ स्ट्रीट पार्किंग का आराखडा तैयार किया है उसका प्रदर्शन आप के पास हुआ । बाजार परिक्षेत्र अगर कही पर जगह उपलब्ध है और इस सुविधा को हम अच्छे तरीके से कर सकते है ऐसा अगर आपका सजेशन है तो सजेशन को इनकारपोरेट किया जा सकता है और इस प्रकल्प को और प्रभावी बनाया जा सकता है । लेकिन यह नही किया इसलिये इसे पुरे शहर मे लागू नही किया जाये, यह कही ना कही अच्छे विषय से दूर भागने वाली बात है । मै बडी संजिदगी से कहना चाहता हूँ की इस प्रकल्प को देखने को बात मैने कुछ सुचनायें दी, उन सुचनाओं को इनमे इनकारपोरेट उसमे किया गया । और मध्य नागपूर  के गांधीबाग झोन  के परिक्षेत्र मे जहां जहां पर इस सुविधा को कर सकते थे  उसका नियोजन भी उसमे किया गया । मेरा आपसे भी निवेदन है की सतरंजीपुरा झोन के परिक्षेत्र को लेकर कहां कहां पार्किंग हो सकती है इस दृष्टी से एक सकारात्मक प्रारुप लेकर आये और उसको हम इसमे समाविष्ट करके इसको आगे बढा सकेगें । यह जो संस्था है यह सरकार की संस्था है । कोई प्रायव्हेट एजन्सी नही है, और सरकार की संस्था को डायरेक्ट काम देने के निर्देश शासन के माध्यम से प्राप्त है इस दृष्टी से इसमे किसी भी भ्रष्टाचार की बु नही आती है  और जिओग्राफीकल कंडीशन को देखते हुऐ निर्णय लेना यह भी इसमे समाविष्ट है । इस कंपनी के प्रेझेन्टेशन की माध्यम से ऑन स्ट्रीट पार्किंग और ऑफ स्ट्रीट पार्किग के माध्यम से म्युनिसिपल कार्पोरेशन को मिनिमम  २३ सीआर की इन्कम अपेक्षित है इसप्रकार से उन्होने परिलक्षित किया ।  इस शहर की व्यवस्था मे सुधार हो, नागपुर शहर मे नो पार्किंग के नाम पर जो चालन होता है, लोग प्रश्न करते है की नागपुर महानगरपालिका क्या कर रही है ।  पोलीस विभाग और महानगरपालिका के माध्यम से 'नो पार्किग के बोर्ड लगे है वहां पर चालन नियमित हो सके तो शहर की वाहतुक व्यवस्था अच्छी होगी । पार्किंग की ऑफीशियल स्लॉट हम डिफाईन्ड कर दे तो कम से कम नो पार्किंग मे गाडी पार्क न करते हुए लोग पार्किंग मे गाडी पार्क करेंगे । इसलिये उन्होने जो प्रेझेन्टेशन दिया है उस प्रेझेन्टेशन सुधार की दृष्टी से  आप के जो भी सुझाव है वह प्रस्तुत किजीये । प्रशासन को मै निर्देश देना चाहूँगा की जिन क्षेत्र मे जिसे हम डेन्स पॉप्युलेटेट एरिया कहते है उस क्षेत्र के नगरसेवको की इस विषय को लेकर जो भी सुचनाये है, उस सुचनाओं को इसमे समाविष्ट करे और आनेवाले सभागृह मे १५ दिन के अंदर इन सारी सुचनाओं के साथ प्रस्ताव आ सके इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है । या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक  १८६/नोटीस क्रमांक २८</u>:-**
**(वित्त विभाग)**
**(मा. सौ. आभा पांडे)**

नागपूर महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय पत्र क्रमांक नामपा २०१९/प्र.क्र. ६२/नवि-२६ दि. ०८/१२/२०२० अन्वये नोटीस अटी व शर्तीचे अधिन राहून ७ वा वेतन आयोगानुसार सुधारीत  वेतनश्रेणी दि. ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यास व प्रत्यक्ष वेतन दिनांक ०१/०९/२०१९ पासून मान्यता

प्रदान केलेली आहे.

त्या अन्वये ७ वा वेतन आयोगाचे शिफारसीनुसार शासन निर्णय क्रमांक वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९ सेवा ३ दि. २८ मार्च २०१९ अन्वये सातव्या आयोगामध्ये तीन लाभाच्या सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या अनुज्ञेयबाबत नागपूर महानगरपालिकेतील सेवेत कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांना सदर शासन निणर्यानुसारच्या तरतुदीनुसार विचारार्थ व निर्णयास्तव सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार शासन निर्णय क्रमांक वेतन १९१९/ प्र. क्र.३/२०१९ सेवा ३ दि. २८ मार्च २०१९ अन्वये सातव्या आयोगामध्ये तीन लाभाच्या सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयबाबत नागपूर महानगरपालिकेतील सेवेत कार्यरत/ सेवानिवृत्त अधिकारी कर्मचा-यांना सदर शासन निर्णयानुसारच्या तरतुदीनुसार विचार्थ व निर्णयास्तव सभागृहात चर्चा करण्यासाठी नोटीस दिला आहे. मा.महापौरजी, शासनाचे परिपत्रक आहे. मागच्या महिन्यात आपण सगळया नगरसेवकांनी निर्णय घेतला होता आपण आता महानगरपालिकेमध्ये भरती सुरु केली पाहिजे आणि आपण सगळया अधिका-यांना अधिकार मिळाला पाहिजे याबाबत नेहमी आपण प्रयत्नशिल असतो. मा.महापौरजी, मला असे वाटते की आपण या विषयावर गंभीर असतो आणि त्या विषयावर गंभीर राहत नाही त्यामध्ये अधिका-याचे सुध्दा कसे नुकसान होत आहे ते मी आपणाला सांगू इच्छिते. मा.महापौरजी, याबाबत शासनाचे परिपत्रक आहे, केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी विचारात घेवून केंद्र शासनाने शासकीय कर्मचा-यांना आश्वासित योजने अंतर्गत या बाबी लागू केलेल्या आहेत. याच्यात राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हापरिषद आणि अन्य कर्मचारी यांना १०-२०-३० सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित सेवा प्रगती योजना लागू करण्यात येईल. ही शिफारस आणि अन्य शिफारसी लागू करण्याकरिता एक त्रिसदस्यीय समिती राज्य शासनाकडे गेल्या होत्या............

महापौर:- आपल्याला काय अपेक्षित आहे ते सांगावे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, माझे एवढेच म्हणणे आहे. ७ वा वेतन आयोग लागू झाला परंतु त्याच्या ज्या शिफारसी आहेत त्या लागू झाल्या नाहीत.

श्री.सुनिल अग्रवाल:- पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.सदस्यांने जिस शासन निर्णय का उल्लेख किया है, उसके बारे मे मैं प्रशासन से जानना चाहुंगा कि, उस संदर्भ मे कंडीशन इंपोस की गयी थी क्या ? इसके बासरे मे प्रशासन जानकारी दे।

महापौर:- प्रशासन निवेदन करे, शासन का जो परिपत्रक आया था वह कंडीश्नल था की

क्लिअरकट था, अगर कंडीशन थी तो क्या कंडीशन थी कृपया प्रशासन इसका उत्तर दे।

उपायुक्त, साप्रवि (श्री.जैन):-मा.महापौरजी, ७ वा वेतन आयोग नागपूर महानगरपालिकेला लागू करण्यासंदर्भात जो शासन निर्णय होता तो कंडीशनल होता ज्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत केलेली आहे. कंडीशन काय होती ती कॅफो साहेब माहिती देतील.

महापौर:- विषय अगदी स्पष्ट आहे. सेवा निवृत्त अधिकारी, कर्मचा-यांना सदर शासन निर्णयानुसार तरतुदीनुसार विचारार्थ व निर्णयास्तव सभागृहात चर्चा करणे. हमारे जो सेवा निवृत्त कर्मचारी है उनको ७ वे वेतन आयोग का बेनीफीट मिलना चाहिए यह विषय उन्होने रखा था इसीपर आपका वर्सन चाहिए।

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, ७ वा वेतन आयोग जुलैपासून निवृत्त कर्मचा-यांना सुध्दा आपण लागू केला आहे. मा.सदस्यांना प्रश्न होता की जो १०-२०-३० च्या बेनेफीटच्या संदर्भात होता तो या संबंधात नाही.

उपायुक्त, साप्रवि (श्री.जैन):-मा.महापौरजी, मा. सदस्यांनी ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने जी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ आहे. १०, २० आणि ३० वर्षानंतर तीन टप्प्यामध्ये देण्याचा त्याच्या संदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. दिनांक ३०.०७.२०२१ च्या मार्गदर्शन पत्रान्वये, सदर मार्गदर्शन अप्राप्त आहे शासनाचे या संदर्भात मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात अनुज्ञेय करता येईल.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मार्च २०२१ ला जी सभा झाली होती त्यामध्ये मा.महापौरजी यांनी निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने विभागाने जुलै २०२१ मध्ये लागू केले आहे. जैन साहेबांनी उत्तर दिले आहे त्यात त्यांनी काही क्युरी केल्या आहेत. त्या कुठल्या क्युरी आहेत आणि कशाच्या आधारावर केल्या आहेत ते सभागृहात सांगावे अशी विनंती करतो.

उपायुक्त, साप्रवि (श्री.जैन):-मा.महापौरजी, ७ वा वेतन आयोग महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना लागू करण्यात आलेला आहे. तथापि १०, २० आणि ३० हा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ आहे याच्या संदर्भात शासन निर्णय २०१९ अन्वये त्यामध्ये तीन लाभाच्या सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना आहे ही शिफारस स्वायत्त संस्था सोडून इतर कर्मचा-यांकरिता शिफारस संलग्न करण्यात आली आहे असा निर्णय आहे त्यामुळे हा स्वायत्त संस्थेच्या कर्मचा-यांना १०,२० आणि ३० हे लागू होईल किंवा नाही याबाबत संग्धितता असल्यामुळे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, हा जो जीआर आहे. त्यामध्ये स्पष्ट आहे. त्याचे मी वाचन करते (वाचले)

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, आभाताई पांडे यांनी जे वाक्य वाचले

ते मी ऐकले आहे की जिल्हापरिषद शिक्षक कर्मचा-यांसाठी आहे. त्याचे परत वाचन करावे.

श्रीमती आभा पांडे:- (वाचले)

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, हा जीआर महानगरपालिकेला प्राप्त झालेला आहे काय? प्राप्त झाला असेल तर तो महानगरपालिकेला लागू आहे काय? या संदर्भात प्रशासनाने निवेदन करावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त, साप्रवि (श्री.जैन):-मा.महापौरजी, या जीआर मध्ये महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना लागू होईल असा स्पष्ट उल्लेख नाही. १ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयात स्पष्टपणे म्हटले आहे की स्वायत्त संस्था सोडून इतर कर्मचा-यांकरिता केलेल्या शिफारसी स्विकारल्या आहेत असे म्हटले आहे त्यामुळे...

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या लेखा व वित्त विभागाने ८ जानेवारी २०२१ ला हे पत्र दिलेले आहे. त्याच्यामध्ये त्यांनी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग पत्र क्र. २०२१ त्याच्यामध्ये लिहिले आहे की.......

महापौर:- जैन साहेब १ जुलै २०१९ चा जीआर सांगत आहे त्यानुसार ते लागू होणार नाही.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, ८ जानेवारी २०२१ की जो नोट है उसमे लिखा है की (वाचले) मा.महापौरजी, हा जो विषय आहे त्यामध्ये त्यांनी शेवटच्या पॅरामध्ये स्पष्ट लिहिले आहे. उपरोक्त संदर्भाकित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की नागपूर महानगरपालिकेत कार्यरत सर्व कर्मचा-यांना आणि शिक्षकांना मागील सप्टेंबर २०१९ पासून सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्याकरिता विभागीय स्तरावर कार्यवाही करण्याचे वित्त विभागाचे २९.०९.२०१९ चे परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. (वाचले)

(बेल)

महापौर:- आभा ताई, आपने पुरा वाचन किया इसमे आश्वासित प्रगती योजना के बारे मे कहां उल्लेख है वह कृपया बताईयें।

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, मी जो प्रश्न केला आहे तो सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्याकरिताच केला आहे. त्याच्याच स्पष्ट असे होते की त्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू होईल.

वरील चर्चेनंतर या विषयावर प्रशासनाने खुलासा मागितला आहे. जर खुलासा आपल्या बाजूने आला तर शंभर टक्के लागू करु असे प्रशासनाला निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी

केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १८७ /नोटीस क्रमांक ३०</u>:-** नागपूर शहरात प्रलंबित असलेल्या गतिरोधकाच्या संदर्भाने
**(वाहतूक विभाग)** सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र
**(मा. श्री. तानाजी वनवे)** महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, नागपूर शहरात २०१७ ते २०२१ च्या दरम्यान किती नगरसेवकांनी स्पीड ब्रेकर लावण्यासाठी अर्ज केले आहे आणि त्याचे किती काम पुर्ण झालेले आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे

वाहतुक अभियंता (श्री.देशपांडे):- मा.महापौरजी, मा.सदन, रस्ता सुरक्षा समितीकडून या अगोदर २०१६ पासून आतापर्यंत १७४ हॉटमिक्स प्लॉटला स्पीड ब्रेकर लावण्याचे प्रस्ताव मिळाले आहे. ७६ ला उभारण्याची मान्यता मिळाली आहे. या प्रस्तावासाठी लोकेशनचे स्केचेस मागितले आहे. आता गड्डे बुजविण्याच्या कामाला सुरुवात झाल्यामुळे ते काम झाल्यानंतर या कामाला सुरुवात करण्यात येईल. १७ रस्त्याचे प्रपोजल प्राप्त झाले आहे ते रस्ता सुरक्षा समितीकडे पाठविले आहे. १४ रस्त्याच्या बाबतीत स्केचेस आणि नकाशा मागितले होते.

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, किती प्रस्ताव मंजुर झालेले आहे.

महापौर:- सध्या एकही झालेला नाही आहे. समितीकडे गेला आहे तिकडने एनओसी आली तर पुढे जाईल.

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे ४ वर्षापासून हे आपण दिलेले आहे. या ४ वर्षाच्या पिरेडमध्ये एकही प्रस्ताव मंजुर झालेला नसेल तर याला जबाबदार कोण आहे.?

वाहतुक अभियंता (श्री.देशपांडे):- मा.महापौरजी, रस्ता सुरक्षा समितीकडे पाठपुरावा करुन त्यांच्याकडून लवकरच मंजूरी प्राप्त करुन घेण्यात येईल.

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, निवडणुकीचे वर्ष आहे. महिन्याभरात आचारसंहिता लागण्याचे संकेत आहेत. ४ वर्षात एकही काम होत नसेल तर प्रशासन काय करीत आहे. देशपांडे आता आलेले आहेत मग याच्या पूर्वी काय सुरु होते. शहरामध्ये नगरसेवक स्पीड ब्रेकर लावण्यासाठी अर्ज करतात, प्रस्ताव पाठवितात. त्याच्या नंतर प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नाही. गड्डे बुजविण्याचे काम आता सुरु झाले आहे. माझी अशी माहिती आहे, या संबंधित ताबडतोब जे जे प्रस्ताव मंजूर झाले

असतील त्यासाठी एक वेगळी बैठक बोलाविण्यात यावी. त्या बैठकीत संबंधित पोलीस विभागाचे अधिकारी, महानगरपालिकेच्या प्रशासनातील अधिकारी आणि हे सगळे करुन नागपूर शहरात ब्रेकर लावण्याचे काम ८ किंवा १५ दिवसात लावण्याचे असे आपण निर्देश दयावे अशी माझी आपणांस आग्रहाची विनंती आहे.

वरील चर्चेनंतर प्रशासनाच्या स्तरावर या विषयावर एक बैठक बोलवावी, लवकरात लवकर जे थांबलेले प्रस्ताव आहेत ते संपुर्ण काढण्यात यावेत. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १८८ /नोटीस क्रमांक ३१:-</u>** संपूर्ण नागपूर शहरातील रस्त्यावर जागो जागी असलेल्या
**(हॉट मिक्स प्लॉन्ट विभाग)** गड्डयांच्या संदर्भाने सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.
**(मा. श्री. तानाजी वनवे)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयावर मागच्या सभागृहात चर्चा झालेली आहे करिता हा नोटीस मागे घेण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेची सभागृहाने एकमताने नोंद घेतली

**<u>ठराव क्रमांक १८९ /नोटीस क्रमांक ३२:-</u>** मालमत्ता करा व्यतिरिक्त इतर विभागामार्फत
**(स्थावर विभाग)** नागरीकांकडून वसूल करण्यात येत असलेले शुल्क जसे
**(मा. श्री. सुनील अग्रवाल)** की, बाजार विभागाचे वापर शुल्क, स्थावर विभागाद्वारा भु–भाडे रक्कम व जाहिरात –बोलपट विभागाद्वारा भु–भाडे व जाहीरात शुल्क इ. करीता थकीत असलेल्या रक्कमेच्या वसूलीकरीता शास्ती आकारण्यात येते काय? तसेच ज्या दराने शास्ती आकारण्यात येत आहे ते दर कोणत्या प्राधिकरणाने निश्चित केलेले आहेत याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.सुनील अग्रवाल:- मा.महापौरजी, इस विषय मे एक जानकारी चाहिये कि, यह दंड के ऊपर दंड वसुल कर सकते है क्या ?

महापौर:- नोटीस क्र. ३२ पर प्रशासन उत्तर दे।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, रक्कमेच्या वसुलीवर शास्ती करण्याबाबतची तरतूद दिनांक १३ सप्टेंबर २०१९ च्या नगररचना विभागाच्या अधिसुचनेप्रमाणे उपविधी प्रमाणे करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४३९ प्रमाणे तरतूद अशी आहे की वसुली अंतर्गत जी काही रक्कम आहे ती मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसुल करण्यात यावी त्यानुसार ती शास्ती आपण लावत असतो.

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, अभी जो देशमुख साहब ने जानकारी दी है वह मालमत्ता कर

के बारे मे है और सॅक्शन ४५१ जो है वह देशमुख साहब पढे ऐसा मैं निवेदन करता हॅु।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी,( सेक्शन ४४१ चे वाचन केले)

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, इस विषय मे स्थायी समिती ने कोई निर्देश दिये है क्या ? वहां से कोई रेट तय किये गये है क्या ? उस बात की जानकारी सभागृह मे दी जाये।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, १३ सप्टेंबर २०१९ जे पत्र आहे त्यामध्ये स्पष्ट शासनाने स्पष्ट निर्देश दिलेलेआहे कोणतीही रक्कम मग ती मालमत्ता कराची असो किंवा स्थावर विभागाची असो, कोणतीही बकाया वसुल करीत असतांना २ टक्के त्याच्यावर व्याजाची रक्कम आकारण्यात यावी असे शासनाचे निर्देश आहे.

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, , जो देशमुख साहब ने कहां सरसकट का जो है, उस परिपत्रक का वाचन करना चाहिये।

महापौर:- वाचन करण्यात यावे.

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, १३ सप्टेंबर २०१९ चे नगर विकास विभागाची जी अधिसुचना आहे त्यामध्ये स्पष्ट नमुद केले आहे की (वाचले) यह जीआर मालमत्ता प्लस जल, स्थावर जो भी कर है उसके लिए दिये गये है।

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, मैं इसी दृष्टीसे एक प्रश्न मे प्रशासन से जानकारी चाहुंगा कि, जो बिल्डर समय के ऊपर मे परमिशन नही लेता है, तो हम देखरहे है कि, उसके ऊपर भुर्दंड पड रहा है, तब ऐसी सूरत मे हम उसपर जो पॅनाल्टी आकारते है उसपर भी शासती ले रहे है, यह नियम के अंतर्गत है क्या ?

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, जे काही दंड घेत आहे ते नगर विकास विभागाच्या ज्या काही सुचना आहे त्या अंतर्गत आकारत आहे.

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, बिल्डर ने अगर परवानगी लेके नही किया है तो फ्लॅटवालो से कैसे आकारणी करेंगे। वह लोग शास्ती भरने के लिए तैयार है परंतु उसके उपर दंड इसकी जानकारी दे।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, जेव्हा बिल्डर आपल्याकडे परवानगीसाठी येईल

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, परमीशन लिया था परंतु पैसे भरना है यह फ्लॅट वालो को बताया नही है।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, मुळ बिल्डर आहे तो परवानगी घेण्याकरिता येईल.

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, अगर बिल्डर ने पैसे नही भरा और फ्लॅटधारको के इसकी जानकारी हुई और प्रोसेस के लिए आये तो ऐसे स्थिती मे प्रशासन की क्या भुमिका रहेगी।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, ज्यावेळेस बिल्डर येथे येतो त्याला परवानगी पाहिजे असेल तर तो तेवढे पैसे भरुनच परवानगी घेईल. काही वेळेस असेही होते की काही लोक परस्पर व्यवहार करुन नियमबाहय रित्या काम करुन घेतो. त्यावेळेस हा प्रश्न उपस्थित झाला असेल.

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, मेरा वही कहना है कि, बिल्डर परमिशन नही लेता और फलॅट ऑनर्स को अंधेरे मे फलॅट बेच देता है, जो फलॅट ऑनर्स रहता है वह जब ऑफिस मे पहुंचता है, फिर उसको बताया जाता है कि आपके बिल्डर्स ने परमिशन नही लिया है, इसलिये आपको दंड भरना पडेगा और दंड उस समय से लागु किया जाता है, और उसपर शास्ती लगाई जाती है, और कई जो फलॅट ऑनर्स है, मा.महापौरजी मेरा कहना है कि, बिल्डर ने परमिशन लेना था, वह परमिशन नही लेता है और फलॅट ऑनर्स को अंधेरे मे रखकर बेच देता है और जब फलॅट ऑनर्स को किसी काम से ऑफिस मे जाना पडता है तो जिस तारीख से बिल्डर ने परमिशन नही लिया, उस तारीख से बाकी पिरीअड का यह क्लेम करते है, यह कहां तक सही है, जितना दंड है वह लोग भरने को तैयार है लैकिन शास्ती भरने को वह तैयार नही है, तो इस दिशा मे आपने कुछ निर्देश देना चाहिये, ऐसा मैं आपसे निवेदन करता हुॅ।

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मा.सुनील भैयया ने विषय ठेवला त्या विषयाच्या अनुषंगाने ज्या प्रापर्टी हस्तांतरीत होतात आणि प्रापर्टी हस्तांतरीत झालयानंतर तो प्लॉन एडीटीपी विभागाकडे सॅग्शन करण्याकरिता जातो त्यावेळी टॅक्स रिसीप्ट घेण्याची आपल्याकडे पध्दत आहे. अशीच तरतूद पाण्याच्या संदर्भात अनेक लोकांना हा मुळ प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक लोकांचे वॉटर कनेक्शन हे डीसी राहते खुलं आणि ते प्रापर्टी ट्रान्सफर केल्यानंतर कुठल्याही प्रकारची नोंद आपल्या विभागाकडे राहत नाही त्याची माहिती मिळत नाही आणि हा प्रश्न निर्माण होतो. मा. महापौरजी, दुसरे एनआयटी ही स्थानिक अॅथारिटी झालेली आहे. आपल्या वतीने एनआयटीने सुध्दा महानगरपालिकेचा टॅक्स अद्यावत असल्याशिवाय कोणत्याही प्लॉनची परवानगी देवू नये असे आपल्या वतीने एनआयटीला सुचना निर्गमित करण्यात याव्यात.

वरील चर्चेनंतर वरिष्ठ नगरसेवक मा. सुनिल अग्रवालजीने जो प्रश्न उपस्थित किया ये मानवता की दृष्टी से अति गहन विषय है, प्रशासनाने अपने कार्यप्रणाली मे वस्तुत: सरसकट यह सब के लिए निर्णय नही ले सकते है। प्रशासन ने अपने स्तर पर तहकीकात करके इसमे जो नियमाअंतर्गत रिलीज किया जा सकता है उस दृष्टी से केस वाईज स्टडी करके इसपर निर्णय लेने के निर्देश प्रशासन को दिये जाते है

। मा.सदस्य विजय झलकेजी ने जो विषय कहां है की एनआयटी को महानगरपालिका के माध्यम यह सुचित किया जाये की वह किसी भी प्रकार से नक्शे का सॅग्शन महानगरपालिका के टॅक्स के पुर्ती के बगैर ना करे, इस प्रकार की सुचना एनआयटी को देने के निर्देश दिये जाते है, और इस की वैधानिकता चेक करने के लिए महानगरपालिका के संबंधित विभाग को पत्र दिया जाये । या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १९०/नोटीस क्रमांक ३३:-** प्रभाग क्र. 20 रामनगर स्लम कोड नं. 184 मौजा नागपूर ख.नं. 103, 145 घोषित झोपडपट्टी अंतर्गत मालकी हक्काचे पट्टे संदर्भात सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

**(स्लम विभाग)**

**( मा. श्री. दिपराज पार्डीकर)**

श्री.दिपक पार्डीकर:- मा.महापौरजी, हमारे प्रभाग कमांक २० मे एक लेंडी तलाव है, उस लेंडी तलाव के आजु बाजु मे पुरी झोपडपटटी है वह स्लम क्रमांक १८४ आता है, वह नोटीफाईड स्लम है, महाराष्ट्र शासन के मालकी हक्क के पट्टे के संदर्भ मे जो परिपत्रक निकला था, उस माध्यम से उस एरीआ का पुरा प्लेन टेबल सर्व्हे करवाया गया, ७४४ लोगो के फॉर्म भरवाये, लैकिन अभी तक मालकी हक्क के पटटे देने के बारे मे कोई कारवाई नही हुई है, मेरा कहना है कि, यह जगह नझुल विभाग की है, तो हम कलेक्टर ऑफिस मे गये, तो उन्हे कहां कि हमने यह पुरा प्रस्ताव नागपूर महानगरपालिका को वापस भेजा है, कोई कि, वह जगह तलाब की है, वहां पर तलाब था लैकिन वहां आजू बाजु झोपडे है, अच्छे पक्के मकान है, वहां शासकीय १३ इमारत है, वहां पर दवाखाना है, स्कुल है, समाज भवन है, और ७४४ घर है, उन लोगो को मालकी हक्क के पटटे मिलने के बारे मे जब हमने कलेक्टर ऑफिस मे पुछा तो उनका कहना था कि यहां पर तलाब होने के कारण हम महाराष्ट्र शासन ने तलाब सौंदर्यीकरण के संदर्भ मे डेव्हलपमेंट का निर्णय लिया है, लैकिन वहां पर आज तक कोई काम नही हुआ है, इससे पहले मा.आयुक्त साहब लेंडी तलाव का निरीक्षण करने आये थे, तब मैंने कहां था कि तलाव के आजु बाजु मे जो झोपडे बने है, तलाव अभी दस से बारा एकर खाली है, उस तलाव को कंपाउंड किया जाये, और बाकी जगह पर जो झोपडपटटी बैठी है, उन्हे मालकी हक्क के पटटे दिये जाये, ऐसा मेरा निवेदन है।

महापौर:- प्रशासन उत्तर दे।

उपायुक्त(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदस्य व तथा माजी उप महापौर यांनी नोटीस द्वारे प्रश्न उपस्थित केलेला आहे.त्या अनुषंगाने भुमिका अशी आहे शासनाचा ७ फेब्रुवारी २०१९ चा शासन निर्णय असो, १७ फेब्रुवारी २०१९ चा आणि ६ मार्च २०१९ चा असो, ८ मार्च २०१९ चा असो किंवा ११ सप्टेंबर २०१९ चा असो त्यामध्ये स्पष्ट तरतूद दिलेली आहे की स्थानिक स्वराज्य संस्थेत त्या क्षेत्रात ज्या संस्थेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण झालेले असेल १ जानेवारी २०११ च्या पूर्वी तर त्या

संस्थेनी त्यांना त्या अतिक्रमणीत जागेचे नियमाकुल करुन भाडेपट्टा द्यायचा आहे. महसुली विभागाच्या रेकार्डनुसार ही प्रापर्टी महाराष्ट्र शासनाच्या नावावर दर्ज आहे. नोडल एजन्सी म्हणून नागपूर महानगरपालिकेने खसरा क्र. १०३ आणि खसरा क्र.१४५ याचा सर्वे केला. शासनाच्या मालमत्ता विभागाच्या रेकार्डनुसार महाराष्ट्र शासनाच्या मालकीची जागा असल्यामुळे हा सगळा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाला दिनांक २०.०७.२०१९ ला सादर केला की ही पोलीस कार्यवाही पट्टेसंबंधीची आहे. शासनाच्या जीआरनुसार ६ मार्च २०१९ च्या जीआरनुसार मालकी हक्काच्या पट्टयासंबंधी कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाने करावी. जिल्हाधिकारी कार्यालयाने तो प्रस्ताव अमान्य केला. तो प्रस्ताव अमान्य करतांना तो प्रस्ताव परत पाठविला. तो प्रस्ताव परत पाठवितांनी एक आदेश जोडला तो १३.०६.२०१८ ला तत्कालीन कलेक्टर महोदयांनी आदेश पारीत केलेला होता की ही जागा आहे ती महानगरपालिकेला तलाव व सौदर्यीकरण करण्यासाठी विभागाने ती जागा मागणी केलेली होती .ती जागा आणि त्याचा आगाऊ ताबा महानगरपालिकेचा जो विभाग तलावाचे पुर्नजीवन आणि सौदर्यीकरण करतो त्याला अटी दाखल करुन परत पाठविला आहे की सदर जागा शासनाने ठरवून दिलेल्या अटीवशर्तीवर धारण करावी लागेल. राज्य शासनाच्या परवानगीशिवाय जमीनीची पोटविभागणी करता येणार नाही. शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय खाजगी व्यक्तीला भाडेपट्टयाने किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. सांगण्याचे तात्पर्य मा.महापौरजी एवढेच आहे, यांना मालकीचे हक्काचे पट्टे देता येणार नाही, त्याना आगाऊ मालकी ताबा दिलेला आहे पेंच प्रकल्प कार्यकारी अभियंता यांनी त्या जागेचे डिमार्केशेन करणे अपेक्षित आहे की तलावाची एकुण जागा किती? आणि तलावा व्यतिरिक्त जी जागा होती त्यावर अतिक्रमण झालेले आहे. त्या अतिक्रमण झालेल्या जागेचे सर्वेक्षण करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्याचे मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

श्री.राजेंद्र सोनकुसरे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, एक माहिती विचारावयाची होती. माझा प्रभागातील मानेवाडा झोपडपट्टी नोटीफाईड करण्यात आली होती. या जागेत वास्तव करणा-या लोकांनी मालकी हक्काचे पट्टे वितरीत करण्यासाठी पाठपुरावा केलेला आहे आणि प्रशासनाने देखील टेबल सर्व्हे केल्यानंतर शासनाशी पाठपुरावा केला किंवा नाही मंजुरी मिळाली किंवा नाही याचा करंट स्टेस्टस् काय आहे याबाबत माहिती पाहिजे होती.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदस्य सोनकुसरे यांनी त्या स्लमचे नाव सांगितले तर वस्तुस्थिती काय आहे हे लक्षात येईल.

श्री.राजेंद्र सोनकुसरे:- मा.महापौरजी, मानेवाडा गाव जुनी वस्ती आणि प्रभाग समिती हनुमाननगर

झोनमध्ये आलेल्या उत्तरामध्ये ही जमीन झुडपी जंगलमध्ये दर्शविलेली होती.

उपायुक्त(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, झुडपी जंगल होणार नाही.

विजय झलके:- मा.महापौरजी, मघाशी एनआयटीच्या संदर्भात जशी सुचना दिली तशीच कलम २२ अ अंतर्गत रजिस्टर आफीस मध्ये रजिस्ट्री होतेकम्पोटंट ॲथारिटी म्हणून महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या सर्व संबंधितऑफीसेसला अद्यावत टॅक्सची पावती भरल्याशिवाय कुठलेही कंम्पोन्ंट रजिस्टर्ड करु नये अशी सुचना निर्गमित करावी.

वरील चर्चेनंतर मा.सदस्य श्री. दिपराज पार्डीकर इन्होने जो विषय रखा उस विषय मे संबंधित जो पेंच का प्रकल्प विभाग है उस डिपार्टमेंट के माध्यम से उस जगह का डिमार्केशन करे। डिमार्केशन करने के बाद जो पट्टे के लिए अनुज्ञेय लोग है उन्हे पट्टे दिलाने की दिशा मे प्रशासन कार्यवाही करे और यथाशिघ्र वहा के रहिवाशीयों को न्याय दिलाने की दिशा मे कार्यवाही करे I या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १९१/नोटीस क्रमांक** ३४:- प्रभाग क्र. 23 अंतर्गत रामा स्टिल झाोपडपट्टी, स्मॉल फॅक्टरी
**(लोककर्म)** एरिया येथील समाजभवन शिकस्त झालेले आहे. हे समाजभवन
**(मा. श्री. नरेंद्र बोरकर)** तोडण्याची तक्रार परिसरातील नागरीक वारंवार करीत आहे. या समाजभवनाच्या भिंतीला जागो जागी भेगा पडलेल्या आहे. त्यामुळे हे समाजभवन केव्हा कोसळून पडले हे सांगता येत नाही. हे समाजभवन शिकस्त झाल्यामुळे केव्हाही जीवहानी होण्याची शक्यता टाळता येत नाही. त्यामुळे हे शिकस्त झालेले समाजभवन तोडणे आवश्यक आहे. याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री. बाल्या उर्फ नरेंद्र बोरकर:- मा.महापौरजी, माझ्या प्रभागात स्लम आहे. तेथे एक समाज भवन आहे ते शिकस्त झालेले आहे. त्या समाज भवनाची फाईल चव्हाण मॅडमकडे दिलेली आहे. त्यांना मी विनंती करतो की त्यावर त्यांनी काय निर्णय घेतला आहे ते त्यांनी सांगावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्य श्री.बोरकर यांनी सांगितल्याप्रमाणे शिकस्त समाज भवन पाडण्याबद्दलची एक नस्ती पाठविण्यात आलेली होती. सदर इमारतीचे १९९९ चे बांधकाम आहे त्याचे स्ट्रक्चरर ऑडीट करुन देण्याबाबत.....

श्री. बाल्या उर्फ नरेंद्र बोरकर:- मॅडम, स्ट्रक्चरर ऑडीट कोण करणार आहे?

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, स्ट्रक्चरर ऑडीट व्हीएनआयटी

किंवा आपल्या पॅनल वर असलेले स्ट्रक्चरर इंजिनिअर त्यांच्याकडून करुन घेतो.

श्री. बाल्या उर्फ नरेंद्र बोरकर:- महानगरपालिकेकडून आपण पैसे देवून काम करतो काय? की त्यांना आपण कामावर घेतलेले आहे.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, ते पॅनल आहे. त्या पॅनलवर १०-१५ स्ट्रक्चरर इंजिनिअर्स आहेत. त्यांना पैसे देवून आपण हे काम करुन घेतो.

श्री. बाल्या उर्फ नरेंद्र बोरकर:- मॅडम, आपल्या पॅनलचे इंजिनिअर कडून ते करुन घ्यायला पाहिजे. झोनमधील अधिकारी म्हणतात की व्हीएनआयटीचे लोकांकडून करणार आहे. मॅडम, ते समाज भवन १० बाय १० चे आहे आणि शिकस्त आहे त्यामुळे ते आपल्या पॅनलवरील इंजिनिअरकडून करुन घ्यावे अन्यथा त्या ठिकाणी काही दुर्घटना होवू शकते.

वरील चर्चेनंतर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

मो. जमाल:- मा.महापौरजी, स्कुल शुरु हो गयी है, दो दिन पूर्व शिक्षणाधिकारी ने निर्णय लिया है कि, टिचर स्टॉफ मे जिनकी दो व्हॅक्सीन हो गयी है, सिर्फ उनको स्कुल मे प्रवेश दिया जायेगा, अगर एक व्यक्ती ने एक व्हॅक्सीन ली है तो उसपर नंबर ८४ दिन के बाद मे दुसरी व्हॅक्सीन के लिये आयेगा, ऐसी सूरत मे उन्हे स्कुल मे अलाउ करना चाहिये।

महापौर:- महानगरपालिका के कर्मचारी शहर मे व्हॅक्सीन का अर्व्हनेस कर रहे है अगर उन्होने व्हॅक्सीन नही लिया तो वह कई न कई महानगरपालिका के निर्देश की अव्हेलना कर रहे है, इस संदर्भ मे शासन के निर्धारीत नियमो के अंतर्गत परिपत्रक निकाले गये है ।

श्री मोहम्मद जमाल :- मा.महापौरजी, जिसने एक व्हॅक्सीन लिया है, उसका सेकंड व्हॅक्सीन आने मे समय लगता है, ऐसी सूरत मे उन्हे स्कुल मे अलाव करना चाहिये।

महापौर :- जब शासन ने व्हॅक्सीन शुरु की तो उन कर्मचारीयो ने व्हॅक्सीन लेट क्यों ली, महानगरपालिका के कर्मचारीयो ने कोविड मे बहुत काम किया है, उनको पहले व्हॅक्सीन दी गयी है, मार्च महिने से यह काम शुरु किया गया था, फिर उन कर्मचारीयो ने व्हॅक्सीन क्यों नही ली, इस संदर्भ मे सभागृह कोई निर्णय नही ले सकता, आप निगम आयुक्त महोदय से मिलकर चर्चा करे।

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**